११ जानेवारी १९६९

मूल्य । चाळीस पैसे

# माणूस

उ त्त रा य ण प्रा रं भ : सं क्रां ति शु भे च्छा



तमसो मा ज्योतिर्गमय । मृत्योर्मा अमृतं गमय । असतो मा सद्गमय ।

समग्र साप्ताहिक

# माणूस

वर्ष : आठवे : अंक : तेहतिसावा

वार्षिक वर्गणी : वीस रुपये

परदेशची वर्गणी : चाळीस रुपये

संपादक

श्री. ग. माजगावकर

सहाय्यक : दिलीप माजगावकर, सौ. निर्मला पुरंदरे

स. न. डिसेंबर, २७

जवळजवळ गेले तीन महिने चालू असलेली सौ. उषा मनोहर खेर यांची जीवनपट उलगडून दाखविणारी प्रदीर्घ अशी मुलाखत २८–१२–६८ च्या अंकात संपली आहे. कागदावरील मुलाखत संपली असली तरी आमच्या मन:पटलावरून ती पुसली जाणार नाही. हे खरे म्हणजे ' माणूस ' व श्री. तेंडुलकर यांचे यश. उषाकिरण यांनाही याकरिता धन्यवादच !

इतर मासिकांतल्या मुलाखती आणि ' माणूस 'मधल्या मुलाखती यांत फरक आहे. ' प्रभात सिनेसंस्था '–हंसाबाई वाडकर–आणि उषाबाई खेर ह्या ' माणूस 'च्या चढत्या-वाढत्या श्रेणीच्या यशाच्या पायऱ्या होत.

मंजुनाथ नायक, ठाणे

स. न. डिसेंबर, ३०

' शुभं करोति ' हे सर्व लेख क्रमश: वाचले. आम्ही एक कादंबरीच वाचल्याचा आम्हांला भास झाला. त्याबद्दल श्री. विजय तेंडुलकर यांचे अभिनंदन.

त्याचप्रमाणे श्री. अनंत द. भालेरावलिखित ' आव्हान ' ही कथासुद्धा फारच पसंत. ' माणूस ' वाचून समाधान होते.

श्री. एकनाथ एम. मेस्त्री, सौ. अरुणा ए. मेस्त्री
(गोरेगाव)

मूल्य ४० पैसे
४१९ नारायण
पुणे २
दूरध्वनी : ५७३५१

प्रकाशित लेख, चित्रे, इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी ' माणूस ' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. कल्पित साहित्यातील पात्रे संपूर्णपणे काल्पनिक आहेत.

सु. ल. सोमण

# तोच चंद्रमा नभात !

कवींच्या लाडक्या चंद्राला दहा प्रदक्षिणा घालून आणि त्याचे अवघ्या सत्तर मैलां-वरून दर्शन घेऊन, बोर्मन, लॉवेल आणि ॲन्डर्स हे तीन अमेरिकन अंतराळ-वीर, ॲपोलो ८ ह्या अवकाशयानातून भूतलावर सुखरूपपणे परतले आणि त्यांनी एक अभूतपूर्व चमत्कारच घडवून आणला ! आजपर्यंतच्या मानवी इतिहासात ह्या तऱ्हेच्या नेत्रदीपक यशाला तोड नाही. पृथ्वीवरून अवकाशात उड्डाण, तिथून एका स्फोटाद्वारे गती घेऊन पृथ्वीच्या गुरुत्वाकर्षणातून बाहेर पडणे व चंद्राच्या गुरुत्वा-कर्षण कक्षेत प्रवेश करणे, पुन्हा दुसऱ्या स्फोटाद्वारे चंद्राभोवती वर्तुळाकार प्रदक्षि-णांना सुरुवात करणे, नंतर पुन्हा चंद्राच्या कक्षेतून बाहेर पडणे, काल्पनिक अडथळा (जेथे चंद्राचा गुरुत्वाकर्षणाचा जोर कमी होऊन पृथ्वीचा वाढतो) दूर सारून पृथ्वीच्या कक्षेत पुनः प्रवेश करणे आणि शेवटी पृथ्वीवर उतरणे—आणि हे सारे पूर्वीच आखून दिलेल्या कार्यक्रमानुसार, एखाद्या मिनिटाचाही फरक न होऊ देता पार पाडणे हे सारेच अफाट आहे, अचाट आहे ! ह्या कार्यक्रमाच्या यशस्वी सांगते-मागची अचूक गणिती आकडेमोड सर्वसामान्य माणसाला चकित करून सोडणारी आहे. आणि त्यामागचे खर्चाचे आकडे तर सर्वांनाच हतबुद्ध करून सोडतील. ॲपोलो ८ च्या उड्डाणाला अंदाजे १९० अब्ज रुपये इतका प्रचंड खर्च आला. थोडीशी तुल-नाच करायची झाल्यास आपल्या नेहमीच्या माहितीतले काही आकडे पुढे करता येतील. भारताची पंचवार्षिक योजना (चौथी) मूलत: १५० अब्ज रुपयांएवढी स्थूलपणे होती. ती तेवढ्या मोठ्या प्रमाणावर राबवायची का ह्यावर अद्यापही खल चालू आहे. भारताचे वार्षिक बजेट जेमतेम ३० अब्ज रुपयांच्या घरात असते, तर भारताला सर्वच राष्ट्रांकडून आजपर्यंत मिळालेली आर्थिक मदत १०० अब्जांच्या आसपास आहे. ह्याचाच अर्थ हा की, अवकाश संशोधनात गुंतलेली दोन बडी राष्ट्रे ह्या स्पर्धेत कोटचवधी डॉलर्स आणि रुबल्स अक्षरशः पाण्यासारखी उधळत आहेत. आणि अन्य राष्ट्रांना, तांत्रिक ज्ञान असले तरी सहसा आर्थिक कुवतीपायी ते जवळ-जवळ अशक्य आहे ! आजचा हा विजय शेवटी मानवाचा महान विजय आहे, ह्याचा वास्तविक प्रत्येक मानवाला निर्मळ आनंद व्हायला पाहिजे. परंतु ज्या पद्ध-तीने रशिया—अमेरिकेत अवकाशसंशोधनाबाबत सहकार्याऐवजी स्पर्धा चालली आहे, ज्या पद्धतीने साम्यवादी जगाने ह्या महान् वैज्ञानिक सामर्थ्याचे स्वागत केले आहे,

त्याकडे पाहिले की वाटते, हा विजय मानवाचा असला तरी, त्यामागचे मूळ इंगित आहे ते बड्या राष्ट्रांच्या पृथ्वीवरील सर्वश्रेष्ठत्वासाठी चाललेल्या स्पर्धेत, शीत-युद्धात ! ह्या प्रचंड वैज्ञानिक सामर्थ्याने अन्य राष्ट्रे स्तंभित होऊनच राहतात. त्या पलीकडे, स्वतःच्या असंख्य आर्थिक समस्या असताना, काही करणे त्यांच्या हातात राहतच नाही !

आणि शेवटी ह्या प्रचंड उद्योगांचा सर्वसामान्य मानवाला फायदा तो काय ? तीन्ही अंतराळवीरांनी जी वर्णने पाठवली त्यावरून प्लॅस्टर ऑफ पॅरिससारखा वाटणारा चंद्राचा भूभाग प्रचंड टेकड्यांनी, विवरांनी, खोल दऱ्यांनी भरलेला आहे. वातावरण, जीवसृष्टी तेथे अजिबात नाही. अॅन्डर्स म्हणतो त्याप्रमाणे चंद्रावर येऊन राहणे अशक्य आहे. ह्या शिवाय अधिक जास्त माहिती जूनमध्ये अॅपोलो ११ तले अंतराळवीर जेव्हा प्रत्यक्ष चंद्रावर उतरतील व तिथले दगड, वाळू वगैरे घेऊन ह्या भूतलावर परत येतील, तेव्हाच मिळू शकेल. परंतु चंद्रावरील स्वारीचा तसा सर्व-सामान्य दृष्ट्या काही फायदा नाही. परंतु चंद्राच्या टप्प्याचा उपयोग करून वैज्ञा-निक मंगळ वा अन्य ग्रहांवरील स्वारीचे बेत आखू शकतील. मंगळावरील वातावरण पृथ्वीसदृश्यच असावे व तेथे जीवसृष्टीही कदाचित् असण्याची शक्यता आहे असे अंदाज आहेत व साधारणतः १९८५ पूर्वी मानव मंगळावर असेल असे शास्त्रज्ञांना वाटते; अर्थात मंगळावर जाऊन येण्यात मानवी प्रयत्नांना संपूर्ण यश लाभले, तरी-देखील माणूस मंगळावर स्थायिक व्हायचा किंवा वस्ती करायचा प्रयत्न करीलसे वाटत नाही. शेवटी तो ह्या पृथ्वीवरच परतणार ! अमेरिका व रशिया ह्या राष्ट्रांना मिळणारी प्रचंड संपत्ती ते ज्या राष्ट्रांना मदती, कर्जे देतात त्यांच्याकडून व त्यांच्या स्वतःच्या जनतेच्या श्रमांतून मिळणाऱ्या पैशातून मिळते. थोडक्यात जन-सामान्यांच्या शोषणातूनच ह्या प्रचंड, दिङ्मूढ करणाऱ्या अवकाश सफरी घडत आहेत. तेव्हा ज्यांच्या शोषणातून त्या राबवल्या जातात त्यांच्या दृष्टीने त्यांचा तात्कालिक फायदा काय ? प्रत्यक्ष पृथ्वीच्या व सागराच्या पोटात अनंत रहस्ये, अफाट संपत्ती दडलेली आहे; व त्यांच्या संशोधनाचा मानवाला निश्चित काही उपयोग होईल. निदान अन्नदुर्भिक्ष कमी करण्यास त्यांचा काही हातभार नक्कीच लागेल. पण आश्चर्य हे की मानवाला अत्यंत फायदेशीर ठरू शकणाऱ्या ह्या संशो-धनासाठी, अंतराळ संशोधनाप्रीत्यर्थ होणाऱ्या खर्चाच्या एकदशांश रक्कमसुद्धा कुठे खर्च होत नाही ! म्हणूनच वाटते की वैज्ञानिक सामर्थ्याचे हे प्रयोग जागतिक वर्चस्वासाठी बडी राष्ट्रे योजतात ! ह्या अफाट सामर्थ्य–प्रदर्शनाच्या वेडापायीच फ्रँकवर मध्यंतरी आरिष्ट कोसळले, पौंड बिकटावस्थेत आहे व डॉलरही पहिल्या-इतका भक्कम नाही ! रुबल, येन सावरण्यासाठी व्यक्तिस्वातंत्र्याचे गळे चेपले जात आहेत !! हे सर्व लिहिताना, प्रसिद्ध भारतीय शास्त्रज्ञ, नोबेल पारितोषिक-

[पृष्ठ ६० वर पाहा]

# मुक्ताफळे

## हनुमंत आणि वानर !

पंधरा हजार नागरिकांच्या सभेत बोलताना धुळे येथे उपपंतप्रधान मोरारजीभाई देसाई यांनी चीन व पाकिस्तानला इशारा दिला–" आमची काही भूमी तुम्ही घेतली आहे. समजुतीने ती परत द्याल तर ठीक, नाहीतर शक्तीचा उपयोग करावा लागेल !" आयुबखान व माओ हे या धमकीने चांगले टरकले असतील, यात शंकाच नाही. समजुतीने भूमी परत दिल्याचे उदाहरण जगात नाही. समजुतीने भूमी देणारा भारत हा एकच देश आहे. आपले हे ऐतिहासिक कार्य त्याने चोखपणे बजावलेले आहे. पाकिस्तान दिले, बेरूबारी दिली, कच्छचे रण दिले...परंतु चीन वा पाकिस्तान यांनी भारताची भूमी समजुतीने परत देण्याकरता घेतली आहे, असे आम्हांस वाटत नाही; कारण ही घेतलेली भूमी त्यांचीच आहे अशी त्यांची समजूत आहे ! तेव्हा हे प्रकरण शक्तीच्या उपयोगावर शेवटी येणार हे उघड दिसते.

मोरारजीभाईंच्या घोषणेत दुसरी एक गंमत आहे. ही भूमी शत्रूने घेतली आहे याची स्पष्ट कबुली यात आहे. यातून प्रश्न निर्माण होतो, की ही कुणी घेऊ दिली? ही घेतली जात असताना ती परत मिळवण्याकरता सुरू झालेली लढाई मध्येच कुणी थांबवली ? हाजी-पीर सोडण्यापूर्वी, पाकव्याप्त कश्मीरातून सैन्य मागे घेतल्याखेरीज हाजी-पीर सोडणार नाही, असे खणखणीत सांगण्याचे काम कुणी केले नाही ? परंतु भूमी गेल्यानंतर हे प्रश्न आता कुणी विचारू नयेत हेच उत्तम. अडचणीचे प्रश्न शक्यतो विचारू नयेत. तात्पर्य एवढेच की, भूमी समजुतीने घेतली गेली नसेल तर ती समजुतीने परत मिळणार नाही ! ती हिसकली गेली आहे व हिसकूनच घ्यावी लागेल.

म्हणूनच शक्तीचा उपयोग करण्याची कल्पना सर्वांनाच फार आवडल्याशिवाय राहणार नाही. अमेरिकन अंतराळवीर आकाशात चंद्राला भेट देऊन परत येत असतानाच, माओने पुन: अणुबाँब फोडला ! हा अणुबाँब त्याने जेट विमानातून टाकून वरच्यावर त्याचा स्फोटही केला, यावरून अमेरिकन सरकारच्या सुरक्षित भितीलाही तिकडे आता तडे गेले आहेत असे कळते ! या अणुबाँबचा आवाज मोरारजीभाईंनी अर्थात ऐकलेला असणार. असे असूनही अणुबाँब जवळ नसताना, चीनला ज्या अर्थी मोरारजीभाई शक्तीने गेलेली भूमी परत मिळवण्याच्या धमक्या देत आहेत, त्यावरून मोरारजीभाईंचे नैतिक धैर्य किती थोर आहे याची कल्पना

येते ! "शक्तीचा उपयोग करावा लागेल"—असे ज्याच्या अंगात शक्ती असेल त्यानेच म्हणावे, असे सामान्य लोक समजतात. शरपंजरी पडलेल्या म्हाताऱ्या बापाने, हाताबाहेर गेलेल्या मुलाला—"मुस्कटात देईन" असे म्हटल्यावर आसपासची मंडळी घाबरतात. म्हातारा तिरमिरीत शक्ती नसताना उठला आणि झाला 'हार्टफेल' तर काय घ्या ? वानराने उड्या मारल्या की तो 'हनुमंत' होत नाही. आणि महाबळी नसलेल्या हनुमंताला रावणाची दाढी जाळता येणार नाहीच—करता देखील येणार नाही ! मोरारजीभाईंच्या या धमकीने म्हणूनच आयुबखान व माओ जसे टरकले असण्याची शक्यता आहे, तशीच सामान्य जनांत भीतीची लाट पसरली आहे. लोकांच्या समाधानाकरता मोरारजींनी आपल्या पुढच्या एखाद्या भाषणात ज्या 'शक्ती'चा ते उपयोग करणार आहेत ती शक्ती नेमकी कशात आहे ते सांगून जनतेला दिलासा द्यावा ! नाहीतर होईल काय—बिथरलेला माओ आणखी एखादी थप्पड मारील आणि आणखी काही भूमी देण्याचेच ऐतिहासिक कार्य तूर्त करावे लागेल.

मोरारजीभाई, तुम्ही 'शक्ती'चे मर्म एकदा सांगून टाकाच !

## चार शशीभूषण !

कर्नल बोरमन, कॅप्टन लोवेल व मेजर अॅन्डर्स या तीन अमेरिकन। तराळवीरांनी चंद्राभोवती दहा प्रदक्षिणा घातल्यामुळे जगाच्या कानाकोपऱ्यात त्यांचे कौतुक होत आहे. फार मोठे धाडस व शौर्य त्यांनी दाखवले असे म्हणतात ! अमेरिकन सरकारने या तिघांना 'शशीभूषण' ही पदवी बहाल करून वाटल्यास त्यांचे आणखी कौतुक करावे; परंतु या तीन शशीभूषणांपेक्षा थोर शशीभूषण भारतात आहे. फार मोठे कौतुकास्पद असे कार्य कांग्रेस खासदार शशीभूषण यांनी नुकतेच दिल्लीतील बिर्लाबंगल्यासमोर केले, त्याचे मात्र जगात व्हावे तेवढे कौतुक केले गेले नाही, ही दुःखाची गोष्ट आहे. म्हणजे कौतुक झाले. परंतु भारताबाहेर त्याची कुणी दखल घेऊ नये याचे आश्चर्य वाटते. महात्माजींसारख्या थोर माणसाच्या स्मारकासाठी प्राण पणाला लावून शशीभूषण उपासाला बसले होते. ३० जानेवारीला गांधीजी बिर्ला बंगल्यात बिर्लांचे पाहुणे म्हणून राहत असताना, बंगल्याच्या आवारात त्यांची हत्या झाली. आज २० वर्षे या गोष्टीला झाली. तरीही बिर्लांचा बंगला ताब्यात घेऊन कांग्रेस सरकारने त्यांचे तिथे स्मारक करू नये याचा अर्थ काय ? शशीभूषणांनी वाट तरी किती पाहावी ! उपसभापती र. के. खाडिलकर, खासदार चंद्रशेखर यांनी शेवटी शशीभूषणांना सांगितले— "बसाच हो तुम्ही उपासाला ! बेमुदत उपास जाहीर करा. सात—आठ दिवसांत काही तरी निर्णय लागेल." शशीभूषण म्हणाले—"या देहाची मला आसक्ती नाही. मरण यायचेच असेल तर गांधी—स्मारकासाठी येऊ दे...आता अन्न घेणे नाही !"

उपास सुरू झाला. शशीभूषण यांची प्रकृती दिवसेंदिवस खंगू लागली. पुण्याहून एस्. एम्. जोशी यांनी उपासाचा प्रसंग किती बाका असतो हे ओळखले. त्यांनी बिर्लांना कळवले " देशाला तुमचा बंगला देऊन टाका!"

बिर्ला गप्प! काही बोलेना. खाडिलकर-चंद्रशेखर विचारात पडले की, बिर्ला-बंगल्याच्या वेशीवर शशीभूषणचेच स्मारक करण्याची पाळी येते की काय? उपासाची प्रॅक्टिस नसलेला हा माणूस! तिथेच काही याचेच बरेवाईट झाले तर पंचाईत. वृत्तपत्रांनी शशीभूषण यांच्या १५ डिसेंबरला सुरू झालेल्या उपासाला शुक्रवारपर्यंत प्रसिद्धी दिली. मग त्यांनी कळवले की, तीन अमेरिकन शशीभूषण अंतराळात चालले आहेत. पुढचे सात-आठ दिवस या उपाशी शशीभूषणांची बातमी देता येईलच असे नाही! अंतराळवीर परत येईपर्यंत हे शशीभूषण शिल्लक राहिले तर मग फोटो-बिटो छापू. मामला गंभीर होऊ लागला. दिल्लीत ५०-६० काँग्रेस खासदार जमा झाले. सगळेजण खाडिलकरांकडे गेले. त्यांना त्यांनी आग्रह केला-'आमच्याबरोबर चला. शशीभूषण यांना आश्वासन देऊन उपास सोडायला लावणे आता भाग आहे, उद्यापासून वृत्तपत्रांनीदेखील उपासाची बातमी दिली नाही तर? देश गांधींना मुकला आहेच. शशीभूषणांनाही मुकेल.'

खाडिलकर विचारात पडले. सध्या पुण्याला डॉ. चपलाबाई खाडिलकरांच्या प्रसूतिगृहात एखादा महापुरुष जन्माला आला तर सगळे मॅटर्निटी होम स्मारकासाठी देशाला द्या म्हणतील! परंतु दे. भ. खाडिलकरांनी हा स्वार्थी विचार मनातून निपटून काढला. काँग्रेस खासदारांबरोबर ते शशीभूषण यांना भेटायला गेले. शशीभूषण यांनी क्षीण आवाजात म्हटले-" आम्ही आता जातो. हा देह सार्थकी लागला. शोक करू नका!"

रघुनाथराव खाडिलकर व जमलेले काँग्रेस खासदार या निरवानिरवीच्या भाषेने गलबलले. काहींना तर अश्रू आवरेनात. रघुनाथराव म्हणाले- " शशीभूषण, तुमची देशाला फार जरुरी आहे हो! तुम्ही जाऊ नका. सोडा हा अन्नत्याग. आम्ही बिर्लाभवनात गांधींचं स्मारक करूच करू असं आश्वासन देतो!"

शशीभूषण म्हणाले- " तुमच्या आश्वासनावर विश्वास ठेवावा असा धीर मला होत नाही. यासाठी झगडा करावा लागेल. राष्ट्रव्यापी आंदोलन करावे लागेऽऽल." पुढे त्यांना बोलवेना.

खाडिलकर, भूपेश गुप्ता, अरुणा असफअल्ली या सर्वांनी सांगितले- "शशीभूषण, आम्ही यासाठी राष्ट्रव्यापी आंदोलन करू. परंतु तुम्ही हा रस घ्या!"

शशीभूषण यांनी मुसुंब्याचा रस पीत सांगितले- " मला अंतराळात जाण्याची आता गरज वाटत नाही. तुमच्यासारख्या महान् लोकांनी आंदोलन केल्यावर बिर्ला घाबरल्याशिवाय राहणार नाही-"

सगळेच शशीभूषण अमेरिकेत आहेत असे आपण समजण्याचे कारण नाही!

# शंका !

भारतीय लोकशाहीला खूप धोके निर्माण झाले आहेत असे म्हणतात. आंतर-भारतीतर्फे झालेल्या व्याख्यानात मुंबई विद्यापीठाचे उपकुलगुरू प्र. बा. गजेंद्रगडकर यांनी या विषयाला तोंड फोडले. ते म्हणाले–

" लोकशाहीला धर्मवादाचा धोका निर्माण झाला आहे. आज देशात पुन: हिंदूंसाठी हिंदुस्थान ही भावना जागृत होऊ लागली आहे. ती लोकशाहीला मारक ठरल्याशिवाय राहणार नाही. निधर्मी राज्याची कल्पना सामाजिक किंवा आर्थिक व्यवहारांत धर्माला स्थान नसावे असे सांगणारी आहे. "


निधर्मी राज्याची कल्पना छानच आहे. माणसाचा धर्म महत्त्वाचा नाही. ती त्याची खासगी बाब आहे. परंतु इकडे पुण्याला गजेंद्रगडकर हे सांगत असताना तिकडे अनंतपूर येथे केंद्रीय अन्नमंत्री जगजीवनराम त्याच दिवशी सांगते झाले.

" अलीकडील काळात मिशनरी हे हरिजनांचे मोठ्या प्रमाणावर धर्मांतर घडवून आणीत असल्याचे आढळून आले आहे. धर्मांतरामुळे लवकरच भारतापुढे राष्ट्रीय प्रश्न निर्माण होतील. हे असेच चालू राहिले तर आणखी दहा ते पंधरा वर्षांत ख्रिश्चनस्थानाची मागणी पुढे आल्याशिवाय राहणार नाही. "

आली पंचाईत ! वस्तुत: धर्म ही जर खासगी बाब असेल तर ख्रिश्चनस्थानाची मागणी पुढे येईल ही भीती व्यर्थ असायला हवी ! परंतु ज्या अर्थी केंद्रीय मंत्री असलेल्या माणसालाच ती वाटते त्या अर्थी ती व्यर्थ आहे असे म्हणणे हा मंत्र्याच्या बुद्धीचा अपमान होय. राजकीय व्यवहारात धर्माला स्थान जर असेल तर या देशात हिंदूंचीच सबल बहुसंख्या राहावी, अशी भावना जागृत होणे हे लोकशाहीला नक्की मारक आहेच का हो न्यायमूर्ती ? पुढच्या खेपेला नॅशनल इंटिग्रेशन कौन्सिलच्या बैठकीला न्यायमूर्ती दिल्लीला जातील तेव्हा त्यांनी जगजीवनराम यांना भेटून त्यांचे विधान त्यांना मागे घेण्यास भाग पाडावे. आमचा समजुतीचा उगीच घोटाळा होतो ! निधर्मी राज्याची कल्पना ही जोपर्यंत कल्पना आहे तोपर्यंत तिला सर्वांनी खूप जपले पाहिजे, यात शंकाच नाही !

–ग्यानबा





# रसिक समाजसेवक

# भाऊसाहेब रानडे

सौ. शांता कुलकर्णी

काय हे ! अशी मूर्खासारखं कशी खेळतेस ? पाह्यलं नाहीस मघाशी मी हा रंग कट करून घेतलेला !

"पण भाऊ, मी खरंच विसरले."

"पण काय ? जेवायला नाही विसरली. एवढं कसं लक्ष नाही खेळताना ? आंधळ्यासारखी हाताला येतील ती पानं नुसती टाकतेस का ?"

खेळता खेळता एकाएकी भाऊंचा आवाज चढलेला पाहून आमच्या घरातले पाहुणे जरासे दचकलेच. पण मला मात्र मनाशीच हसायला आलं. मी बाहेरसुद्धा न पाहता ओळखलं की, भाऊंच्या भिडूनं चुकीची उतारी केलीय आणि भाऊंच्या हिशेबानं हातात खेळाच्या डावात काहीतरी गडबड झालीय. बारीक सारीक गोष्टी मना-

पासून करणारे भाऊ पत्तेही तन्मयतेनं खेळतात ह्यात नवल नाही. नव्हे, तो तर भाऊंचा आवडता खेळ. एखाद्या दर्दी खेळणाऱ्यासारखं भाऊ झालेल्या हाताचं विवेचन भिडूला समजावून सांगतील. गप्प गंभीर चेहरा करून ब्रिज खेळणं भाऊंना कधीच जमलं नाही आणि त्यातून कुणी चुकीचं खेळलं तर मग त्याची धडगत नाही.

भाऊंच्या त्या चढ्या आवाजाची पहिली सलामी मला पहिल्या भेटीतच घडली. सेवादलाच्या मेळाव्याच्या निमित्तानं भाऊंना पाहण्याचा योग आला होता, पण प्रत्यक्ष ओळख झाली ती मात्र लग्नानंतर आठ वर्षांनी! अच्युतराव आपटयांच्या घरी! आपटयांच्या नेहमीच्या सवयीप्रमाणे त्यांनी ओळख करून दिली. ह्या चंपूताई...सदूभाऊंची वहीण वगैरे वगैरे. ह्यावर भाऊंचा पहिला प्रश्न—सध्या काय करतेस? मीही अगदी सहजपणे सांगितलं बाहेरचं काहीच नाही. फक्त संसार! भाऊ एकदम ओरडले, आठ वर्षं पुण्यात राहून काही करत नाहीस आणि हे सांगायला काही लाज नाही का वाटत? अनुताई (लिमये) भेटल्या नाहीत वाटतं तुला! संसार काय सगळयाच जणी करतात! मग तुमचं काय वैशिष्ट्य? मागचं काम, वाचन, सगळं विसरलीस की वाऱ्यावर सोडलंस? थांब, तुला अनुताईंकडे नेतो. नाहीतर शाखेत तरी यायला लाग. हे झाल्यावर घरची सर्व चौकशी झाली. घरी कोण कोण आहे, घरचं वातावरण कसं आहे, काम करणं कितपत शक्य आहे ह्या व्यावहारिक बाजूंचीही चौकशी झाली.

स्त्रियांनी घराबाहेर पडावे, समाजकार्य करावे, पुढे यावे ह्याकरिता नुसते तळमळीने बोलून भाऊ थांबत नाहीत. संसार आणि बाहेरचे काम यांचा मेळ घालून वैयक्तिक अडीअडचणींतून मार्ग काढण्यासाठीही ते मदत करतील.

ह्या प्रसंगानंतर आठ-दहा दिवसांतच भाऊ, नानांना (डेंगळे) घेऊन आमच्या घरी आले आणि जेवायलाच थांबले. मला गोड आवडते हे पहिल्यांदाच सांगून टाकले. तुझ्या मुलांना काय आवडते? हेही विचारले. जेवणातली आवड समान मिळाल्याबरोबर मुलांशी आजोबांचे नाते त्या दिवशीच जडून गेले. खाण्याच्या बाबतीत भाऊ फार रसिक आहेत. सुग्रणपणाचे कौतुक भाऊंनीच करावे हे भाऊंच्या परिचित कुटुंबातील कोणतीही गृहिणी एकमताने सांगेल.

काम न करणे जसे भाऊंना आवडत नाही तसेच कोणतेही काम अर्धवट सोडलेले तर त्याहून आवडत नाही. मग ती अगदी साधी शर्यत असो वा एखाद्या सभेचे काम असो; शेवटपर्यंत आपले काम प्रत्येकाने केलेच पाहिजे. एकदा मुंबईच्या सेवादलाच्या कॅम्पच्या वेळेस प्रौढ बायकांच्यासाठी चालण्याची शर्यत ठेवली होती. तीसचाळीस बायकांनी भाग घेतला होता; पण आपण मागे पडू लागलो आहोत हे पाहताच पंधरा-वीस बायकांनी अर्ध्यातच शर्यत सोडली. एकतर शंभर पौंडांच्या वरच्याच बायकांची शर्यत म्हणजे बघणाऱ्याला गंमतच होती. सर्वांत मागे राहिलेल्या मला आपला दीडशे पौंडांचा देह सावरत जाताना पाहून लोकांना हसू येणे

स्वाभाविक होते. पण म्हटले पाहू या तरी एका दमात एवढे निदान चालता तरी येते की नाही ते ! म्हणून मी शर्यत ( अर्थातच सर्वांच्या शेवटी ) पुरी केली. भाऊंनी खास बक्षीस दिले शर्यत पूर्ण करण्याबद्दलचे !

अन्यायाविरुद्धची भाऊंची चीड इतकी तीव्र असते की, अनोळखी माणसालाही कमीअधिक सुनवायला ते सोडणार नाहीत. कोणत्याही मुलीचा लग्नाचा विषय निघाला की, भाऊ सरळ सांगतील–' हे बघ. काही झालं तरी हुंडा घेणाऱ्या मुलाशी लग्न करू नकोस आणि स्वतःचे छंद, खेळ लग्नानंतर सोडू नकोस.' खेळ आणि तब्येत ह्या गोष्टींना भाऊंच्या दृष्टीने फार महत्त्व आहे. लाज वाटते म्हणून मुलींनी खेळणे बंद करणे हे तर त्यांना कधीच पटत नाही. हाफ पँट घालून प्रत्येक मुलीने काही ना काही खेळलेच पाहिजे असा त्यांचा आग्रह. पोहणे, सायकल, शक्य असल्यास मोटर, स्कूटरसुद्धा मुलींना चालवायला आली पाहिजे. आमच्यासारख्यांच्या घरी ते आले तर आमच्या मुलींना पोहण्यापासून तो कोणत्याही खेळापर्यंत काहीही शिकवायला ते तयार असतात. अजूनसुद्धा एखाद्या लहान मुलीला पोहायला ते हौसेने शिकवतील. खेळाच्या बाबतीतल्या त्यांच्या तळमळीमुळे घडलेला एक प्रसंग माझ्या चांगला लक्षात आहे.

माझ्या नात्यातली एक मुलगी. ती आणि तिचे आई-वडील आमच्याकडे आले होते. त्या मुलीचे लग्न ठरत होते. परन्तु त्या मुलाची इच्छा की, मुलीने लग्नानन्तर खेळणे सोडावे. वास्तविक, ही मुलगी खेळात प्राविण्य-पदके मिळविलेली आणि तब्येतीने चांगली म्हणूनच त्या मुलाला आवडली होती. पण मुलाचे आई-वडील जुन्या वळणाचे आहेत म्हणून मुलीने खेळू नये असे त्याला वाटत होते. मुलीचे आई-वडील समजूत काढत होते की पुढे परवानगी मिळेल किंवा नाही मिळाली तरी काय बिघडते ! कुठे सगळ्याच जणी खेळतात आणि मग वेळही मिळत नाही. पण हे त्या मुलीला फारसे पटत नव्हते. ह्याच वेळी योगायोगाने भाऊ घरी आले होते. त्यांना हा पेचप्रसंग कळल्यानन्तर भाऊ एकदम उठले आणि त्या मुलीचा हात धरून त्या मुलीच्या आई-वडिलांच्या जवळ तिला नेऊन म्हणाले ' ही इतकी खेळणारी मुलगी हिचा हा कणखर हात तितक्याच बळकट हातात द्या ! असल्या आई-वडिलांना भिऊन स्वतःच्या बायकोला खेळ सोडायला सांगणाऱ्या भित्र्या मुलाची अशा मुलीशी लग्न करायची योग्यताच नाही. आपला भ्याडपणा आई-वडिलांच्या नावावर घालून हुंडा पाहिजे, खेळ सोडा, असल्या अटी घालणाऱ्या मुलांची मने काय मेलीत ? ह्यांना स्वतःचा विचार, मने काही नाहीत ? असल्या गुणी मुलीला तसाच गुणी मुलगा पाहिजे. हवे तर मी पाहतो तिच्यासाठी.' आजही ती मुलगी भाऊंना शतशः धन्यवाद देत असते.

स्वच्छता, टापटीप आणि वेळ काटेकोरपणे पाळणे याबद्दल भाऊंचा कटाक्ष. जे जे भाऊंच्या संगतीत आले आहेत त्या सगळ्यांना हे सतत लक्षात राहण्याइतके जाणवले

आहे. ग्राऊंडसारख्या ठिकाणीसुद्धा कपटे पडलेले दिसले तर भाऊ जाता जाता सहज गोळा करून पेटीत टाकतील. सभेच्या वेळेस चपला कशाही फेकणे हे सर्व-सामान्यपणे होतेच. पण भाऊ सभेला असतील तर तेच चपला ओळीत ठेवायचे काम करतील ह्या भीतीने सगळेजण ओळीत ठेवतील. भाऊ येणार असे आधीच कळले तर अनुताई 'काकाकुवा'ची गॅलरीच काय पण जिनेदेखील स्वच्छ दिसण्याची काळजी घेतील. त्यासाठी स्वत: दोन तास आधी येतील. सेवादलाची मुले खेळतात ते ग्राऊंड लोळावेसे वाटेल इतके सुरेख नेहमीच ठेवले जाते.

भाऊंचा वेळ पाळण्याच्या बाबतीतल्या शिस्तीमुळे एकदा मजेशीर प्रसंग घडला कलापथकाचा कार्यक्रम एकदा 'अलका'मध्ये सकाळी आठ वाजता होता कलापथक वेळेच्या बाबतीत अत्यंत वक्तशीर–अर्थात भाऊंची शिस्त ! पण जसा कलाकारांना नियम तोच दंडक प्रेक्षकांनाही ! पात्रांनी जसे वेळेच्या आधी पाच मिनिटे विंगमध्ये तयार पाहिजे तसेच प्रेक्षकांनीही पहिल्या घंटेपासून ते तिसरी घंटा होईतो आत येऊन बसले पाहिजे. कार्यक्रम सुरू झाल्यावर आतबाहेर केलेले त्यांना चालत नाही. कार्यक्रम बरोबर सुरू झाला पण काही बडे लोक–त्यात एस्. एम्., कै. काकासाहेब गाडगीळ वगैरे लोकही उशीरा आले होते. आत नमन सुरू झाले होते आणि थिएटरची दारे बंद होती भाऊ स्वत: बाहेर थांबले होते. नमन-पूर्ण होईपर्यन्त कोणालाही आत जाता आले नाही. भाऊंनी सांगितले, 'आता या घटकेला कोणापेक्षाही कलावन्त मोठे आहेत. कार्यक्रम सुरू असताना जा-ये करणे म्हणजे कलावन्तांचा अपमान आहे. कलावन्तांच्या कलेचा मान आपण राखलाच पाहिजे.'

कलापथकाचे सुरुवातीचे कार्यक्रम जास्तकरून खेड्यातच होत असत आणि मुली तर दोन–चारच असत. कलापथक आणि लोकनाट्य अशी सभ्य नावे होती तरी खेडेगावात लोक सेवादलाचा फड नाही तर तमाशाच म्हणत. एकदा नगर


# पुरंदऱ्यांची नौबत

ब. मो. पुरंदरे

मूल्य साडेतीन रुपये

राजहंस प्रकाशन

४१९ नारायण, पुणे २

भागातील एका खेडेगावात कलापथकाचा कार्यक्रम चालू होता. मुली स्टेजवर आल्या आणि लोकांनी तमाशातल्यासारख्या शिट्ट्या वाजवायला सुरुवात केली. आणि शेवटी तर नाणी स्टेजवर यायला लागली. मुली आधीच घाबरलेल्या. त्यातून हे असे प्रकार! एकीने तर रडायलाच सुरुवात केली. भाऊंनी ताबडतोब कार्यक्रम थांबवला आणि लोकांना, हा तमाशा नाही, ह्या मुली किती चांगल्या घरांतून आलेल्या आहेत, लोकांचे वर्तन कसे असभ्य आहे हे समजावून दिले. शेवटी बजावले की योग्य आदर ठेवून जर लोक कलास्वाद घेणार असतील तरच कार्यक्रम पुढे चालू होईल, नाही तर हा कार्यक्रम इथेच थांबेल. नंतर कार्यक्रम सुरळीतपणे पार पडला. भाऊंच्या प्रेरणेने सुरू झालेल्या ह्या कलापथकात अनेक कलावंत हौसेने भाग घेऊन गेले आणि आताही नवे लोक येत आहेत.

इतर अनेक गोष्टींप्रमाणेच आंतरजातीय-धर्मीय विवाहाला भाऊंचा जोरदार पाठिंबा. त्याचबरोबर अशातून काही वैषम्य निर्माण झाले तर त्या मुलांच्या पाठीशी भाऊ उभे राहतील आणि सर्वतोपरी साहाय्य करतील. अडचणीत सापडलेल्या मुलाला किंवा मुलीला ते आपल्या एखाद्या मानसकन्येच्या हाती सोपवतील आणि हक्काने हे काम झालेच पाहिजे म्हणून सांगतील आणि भाऊंची मुलगीही भाऊंच्या आज्ञेचे पालन करायला तत्परतेने तयार असेल! सार्वजनिक कामात सर्वांत महत्त्वाची गोष्ट भाऊंच्याकडून मी शिकले ती म्हणजे चोखपणा आणि विशेषत: पैशाच्या बाबतीत तर फारच! केवळ गाफिलपणामुळे काहीही कारण नसतानासुद्धा एखाद्याच्याबद्दल गैरसमज होतात. त्यामुळे पावती देणे आणि घेणे दोन्ही बाबतींत भाऊ स्वत:ही दक्ष राहतील आणि दुसऱ्यालाही राहायला लावतील. एकदा अनुताईंना मी पैसे देत होते, तेव्हा त्यांच्याजवळ पावतीपुस्तक नव्हते. पावती मग देईन असे त्या म्हणाल्या-बरोबर भाऊंनी सांगितले की, पैसे पण मगच घ्या! विश्वास कितीही असला तरी पावतीसाठी जागरूकच राहायला हवे दोघांनीही!'

गुणग्राहकतेच्या बाबतीतही भाऊ फार रसिक आहेत. अगदी साध्या गोष्टीतही विशेष गुण पाहतील आणि आवर्जून बोलूनही दाखवतील. माझ्या एका मैत्रिणीचे घर अगदीच लहान, पण त्यात तिने आपल्या लहान मुलाची सोय फारच छान केली होती. कॉटमागच्या शेल्फमध्ये गादी ठेवून त्यावर मच्छरदाणी लावायचीही सोय केली होती. ही कल्पना भाऊंना एवढी आवडली की, त्यांनी प्रत्येकाला 'संजूची झोपायची खोली पाहिलीत? नसेल तर अवश्य पाहा-किती सुंदर आहे ती', असं सांगितले.

बारीक सारीक गोष्टींतही असे आवर्जून लक्ष देऊन पाहिले म्हणजे एकदम उलगडते की माझ्यासारख्या सामान्य बाईपाशीही सांगण्यासारख्या आठवणी भाऊ कशा नकळत ठेवून जातात ते!

O

चंद्रशेखर । मराठे

# कोरडवाहू शेती अधिक उत्पादक कशी होईल?

शेतीची उत्पादकता वाढविणे व शेतीमधील अनिश्चितता कमी करणे, हे भारतीय शेतीक्षेत्रापुढील दोन महत्त्वाचे प्रश्न आहेत. या दोन्ही प्रश्नांची सोडवणूक वातावरणातील व जमिनीमधील कोरडेपणा कमी करण्यावर आधारित आहे. वातावरणामध्ये उष्ण व कोरडी हवा आणि पावसाचा अभाव यांमुळे कोरडेपणा निर्माण होतो, तर जमिनीमधील कोरडेपणा दमटपणाच्या अभावामुळे निर्माण होतो. जेथे पाणीपुरवठ्याची सोय करणे नैसर्गिक दृष्ट्या व आर्थिक दृष्ट्या शक्य आहे तेथे ती केली जात आहेच; परंतु देशातील एकूण लागवडीच्या क्षेत्रापैकी किमान ३० टक्के क्षेत्र तरी असे आहे की, तेथे पाणीपुरवठ्याची हमखास सोय करणे नैसर्गिक दृष्ट्या अशक्यच आहे.

त्यामुळे कोरडवाहू जमिनीत, सध्याचे तांत्रिक ज्ञान व साधनसामग्री लक्षात घेऊन जास्तीत जास्त उत्पादन कसे वाढवता येईल हा भारतीय शेतीपुढील एक महत्त्वाचा प्रश्न आहे. याबाबत शेतीशास्त्रज्ञांनी अनेक आडाखे बसविले असून त्यांपकी काही खाली दिले आहेत.

**जमिनीचा कस व पातळी**

जमिनीतील दमटपणा जास्तीत जास्त टिकवून कसा धरावा व त्याचा जास्तीत जास्त विनियोग कसा करावा हा जिराईत जमिनीचा एक प्रश्न आहे. यासाठी जमीन समपातळीत असणे वा करून घेणे अत्यावश्यक आहे. म्हणजे पावसाचे पाणी चटकन वाहून जाऊ शकणार नाही. जमिनीच्या आतील अगदी जवळचा भाग (सब सरफेस) जर ढिसूळ अशा ढेकळांचा बनविला तर जमिनीत पाणी खोल व विस्तृत भागामध्ये मुरण्याला चालना मिळेल. यासाठी खोल नांगरट करणे जरुरीचे आहे. आपल्याकडील जमिनीची रचना कित्येक वर्षांच्या उथळ नांगरटीमुळे दोषयुक्त झाली आहे. यामुळे जमिनीच्या खाली १० ते १५ सेंटिमीटर अंतरावर एक जाड थर (सोल) निर्माण झाला आहे. या थरामुळे खोल मुळे असलेली कापसासारखी पिकेदेखील चांगली मुळे धरू शकत नाहीत. त्यामुळे पिकांना केवळ जमिनीच्या नजीकच्या पृष्ठभागातील दमटपणावरच गुजराण करावी लागते. पावसाळ्यात पावसाचे पाणी या जाड थरांमुळे केवळ वरवर राहते वा थरांमधील खळग्यांमधून

एकदम अगदी खालच्या थरात ( जेथे मुळे जाऊ शकत नाहीत ) गडप होते. त्यामुळे खोल नांगरट केल्यास जमिनीत अधिक दमटपणा टिकून राहील व पृष्ठभागावरून पाणी वाहून जाणे कमी होईल.

**सुधारलेली बियाणी**

कोरडवाहू जमिनीतील पिके आजवर त्यांच्या उत्पादकतेपेक्षा चिवटपणाकडे लक्ष देऊन लावली जात असत. बंगाल हरभरा, केसरी डाळ वगैरे पिके कोरडवाहू जमिनीत लोकप्रिय आहेत; कारण वातावरणातील कोरडेपणास दाद न देण्याचा त्यांचा चिवटपणा होय. शिवाय त्यांना लागणारा नैट्रोजन ती स्वत:च तयार करतात.

नवीन बीजशास्त्रीय प्रयोगांना अशा सुधारलेल्या जाती निर्माण करण्यात यश मिळाले आहे, की ज्या वातावरणाचा कोरडेपणा सहन करू शकतील. शिवाय जास्त उत्पन्नही देऊ शकतील. इंडियन अॅग्रिकल्चरल रिसर्च इन्स्टिटयूटमध्ये गव्हाच्या अशा जाती शोधून काढलेल्या आहेत की, मुख्य ताटास जास्त दाणे धरतील, मुळे अधिक कार्यक्षम असतील व सुमारे सात पाने जमिनीशी समांतर राहून दमटपणा अधिक टिकवून धरतील. या जातीपैकी कल्याण सोना व छोटी लेर्मा या जाती अगदी वैराण प्रदेशातसुद्धा टिकाव धरू शकतात. तायचुंग नेटिव्ह १ भात, सी. एस. एच. १ ज्वारी व एच. बी. १ बाजरी या जातीही पावसाच्या अभावातसुद्धा चांगल्या उत्पन्न देतात. सी. एस. एच. १ ज्वारीच्या पिकाची मुदत कमी असल्याने व उत्पन्न जास्त असल्याने आंध्र प्रदेश, म्हैसूर व महाराष्ट्र या प्रदेशांतील दुष्काळी भागात या जातीने शेतकऱ्यांस चांगला हात दिला आहे.

**दुबार पीक पद्धती**

कमी पाऊस असलेल्या बहुतेक प्रदेशांत जमिनीतसुद्धा दमटपणा टिकविण्याचे प्रयत्न केले तर दोन पिके घेता येतात. वातावरणातील उष्णता वाढण्याच्या आत ज्या पिकांचा दाणा तयार होईल, अशी पिके निवडणे हिताचे आहे. मुख्य धान्ये व ज्वारी-बाजरी वगैरे पिकांसाठी आता कमी मुदतीच्या व फोटो इन्टेक्टिव्ह जाती उपलब्ध आहेत. मार्च ते जून हा काळ वगळून त्यांची पिके घेता येतात. जमिनीचा कस वाढण्यासाठी भात वा गहू ( सिरियल्स ) व नंतर कडधान्य असा क्रम लावणे आवश्यक आहे.

**खतपुरवठा**

कमी पावसाच्या भागातील पिकांस नेहमीच्या पद्धतीने खत देता येत नाही. ' फॉलियर फीडिंग ' (Foliar feeding ) या पद्धतीनेच या पिकांस खत देता येईल, असे प्रयोगाअंती आढळून आले आहे. पस्तीस टक्क्यांपर्यंतचा युरिया, जर त्याचे कण अधिक बारीक केले तर या पिकांना देता येतो. या पद्धतीमुळे हवेतून या पिकांवर खत टाकण्याची शक्यता निर्माण झाली आहे. याबाबतची पद्धती जर सुसूत्र केली, तर कमी पावसाच्या भागातील पिकांस मोठ्या प्रमाणावर खत देता

येईल. जमिनीचा कस वाढविण्यासाठी डाळीची धान्ये घेण्याची सध्याची पद्धती योग्य आहे; पण सध्याच्या जास्त मुदतीच्या जातींऐवजी कमी मुदतीच्या जाती वापरणे आवश्यक आहे. जमिनीतील व हवेतील दमटपणा टिकवून धरणे ही जिराईत शेतीच्या यशाची गुरुकिल्ली आहे. वरीलपैकी काही पद्धती अंमलात आल्या तर पन्नास सेंटिमीटर वृष्टी असलेल्या प्रदेशांत वर्षाला दर हेक्टरमध्ये तीन टन धान्य उत्पादन निर्माण होईल. शेतकऱ्यांना या पद्धतीची माहिती व्हावी यासाठी राष्ट्रीय प्रात्यक्षिकांचे एक सत्र आयोजित करण्यात आले आहे. बागाईत शेतीच्या वैभवाने डोळे दिपू न देता, अत्यंत कष्टाळूपणाने व चिकाटीने देशातील जिराईत शेतीची उत्पादकता वाढविण्यावर यापुढील शेतीचे यश अवलंबून आहे. ○

## औद्योगीकरणाचे समाजशास्त्र

संस्कृतीचा मानवी व्यक्तिमत्त्वावर होणारा परिणाम या विषयाचा विशेष अभ्यास केलेले एक अमेरिकन समाजशास्त्रज्ञ डॉ. जेरोम मॅनिस हे गेले एक वर्ष सिंगापूर विश्वविद्यालयात शिकवीत होते आणि 'तंत्रज्ञानातील फरकाचा समाजावर होणारा परिणाम' या विषयावर संशोधन करीत होते. नुकतेच ते सिंगापूरहून भारत-मार्गे अमेरिकेला परतले. तेव्हा त्यांनी दिल्लीच्या मुक्कामात औद्योगीकरणानंतरही मानव असंतुष्ट का, हे स्पष्ट केले. जगात आज जो असंतोष दिसतो त्याचे एक मोठे कारण म्हणजे औद्योगीकरणाची प्रक्रिया जेवढी फलदायी होईल अशी अपेक्षा होती तेवढी ती झाली नाही. जगात सध्या अनेक ठिकाणी 'वाढत्या अपेक्षाभंगाची क्रांती' चालू आहे. ज्या ज्या देशांत औद्योगिक क्रांती झाली त्या त्या देशांतल्या जनतेला वाटले, की आता नोकऱ्या मिळतील व आपले जीवनमान सुधारण्याची संधी मिळेल. परंतु ही अपेक्षा निष्फळ ठरल्याचे अनेक आशियायी देशांत स्पष्ट दिसते. यातून एक सकृद्दर्शनी सोपा दिसणारा मार्ग म्हणजे त्या त्या देशांतील सरकारांनी आपापल्या जनतेकडे अधिक लक्ष पुरविले पाहिजे. ते म्हणतात, "मी अर्थशास्त्रज्ञ नाही, तेव्हा पोलादाचे कारखाने महत्त्वाचे आहेत की नाहीत हे मी सांगू शकणार नाही; परंतु जनतेची स्थिती ताबडतोब सुधारण्याच्या योजना अगदीच पाठीमागे ढकलल्या जाऊ नयेत असे मला वाटते."

तंत्रज्ञानातील प्रगतीमुळे समाजावर होणारा परिणाम इष्ट असतो की अनिष्ट? अमेरिकेत जो परिणाम झाला आहे तो फारसा इष्ट वाटत नाही. सिंगापूर सध्या संक्रमणावस्थेतून जात आहे, पण तेथे तंत्रज्ञानातील बदलाला तोंड देण्यासाठी जनतेची तयारी करण्यात येत आहे. सिंगापूरमधील एक-चतुर्थांश लोकसंख्या सरकारने बांधलेल्या घरांतून राहत आहे. हा पैशाचा सदुपयोग झाल्याचे आढळून येत आहे व दुसऱ्या देशांपुढे एक अनुकरणीय उदाहरण ठेवले गेले आहे. ◻



नागपूरच्या दुसऱ्या रघुजी महाराजांना शिकारीचा भारी शौक. शिकार म्हटली की दिवस नाही आणि रात्र नाही. दरबारचे काम नसले की महाराज हटकून शिकारीस जात. ती त्यांची एक मर्दानी करमणूक होती. सक्करदऱ्यावर तर हरणे आणि चित्त्यांकरिता खास रमणे बांधले होते. बाभुळखेड्याला पिंजऱ्यात दोन मोठाले वाघ धरून ठेवलेले असत. रघुजी महाराजांना वाघाचा एक शौकच होता, म्हटला तरी हरकत नाही. कारण त्यांच्या वाड्याच्या मागच्या बाजूस नजर बागेतही वाघ ठेवला होता. सोनेगावला पण पिंजऱ्यात वाघ होता.

**गो. मा. पुरंदरे**

महाराजांना शिकारीस वेळ नसला की ते हटकून वाघाची झुंज लावीत. नजरबागेत मोकळ्यावर वाघ सोडून त्याच्या अंगावर पाच-दहा शिकवलेली कुत्री सोडून मग वाघ चिडला म्हणजे मोठी मौज येई. घडीभर खाशांचा वेळ मजेत जाई. कधी, कधी मग महाराजांची लहर लागली, की वाघाची ही गंमत किंवा तमाशा फार

मोठ्या प्रमाणावर होई. अशा वेळी महाराजांच्या आज्ञेवरून तमाशा पाहण्यास गावातील झाडून सारे शौकीन बाभूळखेडयाच्या मोकळ्या पटांगणात जमा होत. हत्तीखान्यातून शिकाऊ हत्ती मोकळ्या जागी आणला जाई. महाराज स्थानापन्न झाले की वाघाचा पिंजरा मजूर ओढून आणीत. खाशांबरोबर अशा वेळी नाना घाटगे, भवानी काळू आणि बाबूराव वैद्य हटकून असत. पिंजऱ्याचे दार उघडल्याबरोबर, डरकाळ्या फोडीतच ते कोंडलेले जंगलचे जनावर बाहेर पडे. हत्तीची आणि वाघाची अहीनकुल मैत्री ! हत्ती पाहिल्यावर वाघ चवताळून झेप टाकी आणि हत्तीच्या शेपटीकडून, सोंडेवरून वर चढण्याचा प्रयत्न करी, तेव्हा झुंजीस खरी सुरुवात होई. पण हत्तीचा अवतार त्याच वेळी खरा पाहण्यासारखा होई. वरून शांत दिसणारे हे जनावर अशा वेळी आपला खास रुद्रावतार प्रकट करी. वाघाला सोंडेने लपेटून पायाखाली चिरडण्याचा त्याचा प्रयत्न पाहून वाघाच्या डरकाळ्या आसमंतात उठत आणि जेव्हा तो चिडलेला हत्ती सोंडेने वाघाचे ते धूड हवेत उंच

# अरं पाहता काय? वाघ मेला!

धरून जमिनीवर आपटी तेव्हा झुंजीस खरा रंग येई. वाघ हवेत फेकला गेल्यावर प्रेक्षकांनी श्वास रोखून न धरल्यास नवल ! ही दोन बलाढ्य मल्लांची कुस्ती पाहावयास लहानांपासून मोठ्यांपर्यंत, अगदी आयाबायासुद्धा तमाम गर्दी करीत. ह्या झुंजी अगदी अंधार पडेपर्यंत चालत. वाघाच्या डरकाळ्या आणि हत्तीचे चीत्कार सक्करदऱ्यावरील महालात चांगले ऐकू येत. एखाद्या वेळेस ही झुंज फारच रंगात येई. मग महाराज माहुतास खुष होऊन कधी मंदिल तर कधी शिरपाव तर एखादे वेळेस सोन्याचांदीचे कडे बक्षिसी म्हणून देत. कारण, महाराज शूरांचे खरे चाहते होते.

एकदा सोनेगावचाच प्रसंग. सोनेगावी बाबूराव वैद्यांना खास बगीचा दाखविण्याकरिता खासे घेऊन आले. बाबूरावांना खासे बहु मानीत. कारण, बाबूराव काही झाले तरी पुणे दरबारचे प्रतिनिधी. खाशांची स्वारी सोनेगावला महालासमोर हत्तीवरून उतरते न उतरते तसे कुशावा चिटणिसाने गावच्या शिवारात वाघ आल्याचे सांगितले. झाले, महाराज तसेच हत्तीवर चढले. हुजऱ्याला महालातून शस्त्र आणण्याचा हुकूम झाला. डोळ्याचे पाते लवते न लवते तोच हुजऱ्याने शस्त्रे अंबारीत आणून ठेवली आणि माहुताने हत्तीला अंकुश रोवला.

त्या दिवशी योग फारच जोरदार म्हणावयाचा ! कारण हिंगण्याच्या दिशेने रानात हत्ती अर्धा कोस जातो न जातो तोच झाडीतून वाघ चालत आला. जनावर

फार मोठे होते. वाघाने हत्तीच्या मागच्या बाजूने हल्ला केला; पण वाघाने हत्तीच्या पायावर पंजा रोवला न रोवला तोच हत्तीने एक झटका देऊन तोंड फिरवले. वाघपण जबरदस्त होता. वाघाने हत्तीच्या सोंडेवरून सरळ गंडस्थळावरच झेप घेतली. प्रसंग बाका होता. पण माहुताने निभावून नेले. साऱ्या शक्तिसामर्थ्यानिशी त्याने भाला वाघाच्या जबड्यात फेकला. एक डरकाळी देऊन वाघ खाली आला. पण आता ते जखमी जनावर चवताळलेले होते. माहूतपण सावध होता. वाघ जसा परत हत्तीच्या समोरच्या पायांवरून वर चढला तसा पुन्हा एकदा सगळी ताकद एकवटून त्याने भाला वाघाच्या जबड्यात फेकला. भाल्याचे टोक जबड्याच्या आरपार बाहेर पडले. एक कर्णकर्कश डरकाळी देऊन वाघ जमिनीवर कोसळला तो परत उठलाच नाही. खासे अंबारीतच होते. माहुताने मान मागे वळवताच खाशांनी स्वतःच्या गळ्यातला कंठा काढून एकदम माहुताच्या गळ्यात घातला.

सोनेगाव, बाभुळखेडा ह्या ठिकाणी हत्ती आणि वाघाच्या झुंजीचे कार्यक्रम वारंवार होत. तशा कोरडीच्या जंगलात मामुली शिकारी नेहमी होत, पण केवळ जनावर मारण्यात महाराजांचं मन रमत नसे; कारण मुळात तसे ते धार्मिक वृत्तीचे. एकदा आदाश्याजवळच्या जंगलात महाराजांना एक भला मोठा सांबर सापडला. सोबतची माणसे आज मस्त मेजवानी झडणार म्हणून खुशीत होती. इतक्यात बाबूराव वैद्य खाशांना म्हणाले, आजची तर द्वादशी आहे. झाले, महाराजांची कर्मठ प्रवृत्ती आड आली आणि आज्ञा झाली, "आजची द्वादसी आज पसु मारनं नाही. सांबर सोडून द्यावा. खेळ रंगला. बहु झालं." शिकारीत त्यांना केव्हाही लढाईची मौज वाटत असे.

आजही असाच उमरावतीच्या रस्त्यावर व्याहाडच्या रानात शिकारीचा मांड मांडला गेला होता. त्याचे कारणही तसेच होते. परवाच्या दिवशी नागपूरजवळच्या वाडी या खेड्यातली काही शेतकरी माणसे महालात दाद लावावयास आली. व्याहाडच्या जंगलात एका नरभक्षक वाघाने बराच धुमाकूळ घातला. आजूबाजूच्या गावात एकच हाहाःकार उडाला होता. वाडीपासून तो हिंगण्यापर्यंत पंधरा दिवसांत त्याने कुणाची मुलगी, तर कुणाचा बाप, तर कुणाची सून अशी पाच–दहा माणसे मारली. खेड्यातल्या माणसांना आटोपायला जनावर तसे जबरदस्त होते. शिवाय जनावर माणसाच्या रक्ताला चटावलेले असल्यामुळे केव्हा कुणावर झडप घालील ह्याचा काही नेम नव्हता. शेवटी राजा हाच 'तारी किंवा मारी' म्हणून वाडीची काही माणसे हिंमत धरून महालावर आली. ती माणसे खऱ्या हिंमतीची आणि चिकाटीची म्हणून त्यांना खाशांच्या कानावर गोष्ट घालण्यात यश मिळाले. नाहीतर त्यांना प्रथम शुक्रवार दरवाजावरच रखवालदाराकडून उडवाउडवीची उत्तरे मिळून माघारी पाठवण्याचा प्रयत्न झाला होता. शुक्रवार दरवाजातून माणसे कशीबशी

आत निसटली तर पुढे मुख्य दरवाजावर अडली. शेवटी तेथे पण अनेक नंदींच्या शेपट्यांना हात लावत, लावत ती कारभाऱ्यांपर्यंत पोहोचली. मात्र कारभाऱ्यांनी तत्काळ ती बातमी खाशांच्या कानावर घातली आणि मग काय विचारता ! खाशांनी पळाचाही विलंब न लावता आज्ञा दिली "वाघाले पकडून माझ्यासमोर उभा करा." आहे की नाही गंमत !

वाघाला पकडून खाशासमोर आणणे म्हणजे काय गावातला एखाद्या चोर भामट्याला पकडण्यासारखे होते ? अगोदरच व्याहाडच्या जंगलात वाघाला टिपणे किती कठोर काम ! आणि त्यातून वाघोबा माणसाच्या रक्ताला चटावलेले ! रानात दुरून जरी माणसाचा वास आला तरी त्याची शंभर वर्षे भरली समजावयाची ! पण हे सर्व सांगायाचे कुणी आणि कुणाला ? कारण प्रत्यक्ष सेनासाहेब सभा रघुजी महाराजांची ती आज्ञा ! त्यांचा राग सर्वांना माहीत. त्यापेक्षा वाघाला सामोरे जाणे एक वेळ परवडले. पण समोरची माणसे चुप राहिलेली पाहून खासे समजले. 'अरे हट बायल्यांनो' असे म्हणताना खाशांच्या चेहऱ्यावर स्मित झळकले. तितकाच समोरच्या लोकांचा जीव भांड्यात पडला. "लेक हो, वाघाले काय भेता ! जा रानात वाघरा लावा आणि जनावर गावला की खबर द्या. आम्ही आलोच पाठोपाठ !"

झाले, मग महालातून सर्व सूत्रे हालवली गेली. पाच-पन्नास माणसे जय्यत तयारीनिशी व्याहाडच्या जंगलात संध्याकाळपर्यंत जाऊन पोहोचली. बरोबर लांब पात्याच्या तरवारी, बिचवे, भाले, बंदुका सगळे साहित्य तयार ठेवले होते. खासे जाणार म्हणून हत्तीखान्यातून दोन हत्ती पण व्याहाडकडे रवाना झाले. व्याहाडला माणसे पोहोचली तशी फुटाल्या तलावाजवळ वाघाने मागच्या अर्ध्या रात्री उघड्यावर झोपलेली एक म्हातारी उचलून नेल्याचे समजले. दिवस वैशाखाचे. दिवसा सूर्यनारायण पूर्ण तेजाने तळपे. व्याहाडच्या जंगलात कसे सगळे भकास जाणवत होते. तलाव, विहिरी, नाले या सर्वांत पाणी तर अभावानेच सापडावयाचे.

जंगलात एके ठिकाणी दाट जाळी होती तिथेच वाघरा बांधायचे नक्की झाले. वाघरा म्हणजे भल्या जाडजूड दोरखंडाचे जाळेच. जनावर झेप टाकीत जाळ्यात असे काही गुरफटत असे, की त्याला त्यातून निघणे मुष्कील व्हावे. वाघरा बांधला आणि हाका सुरू झाला. डफडी आणि ढोलक्यांनी व्याहाडचे जंगल जागून उठले, पण जनावराचा काही मागमूस लागेना. ढोलकीवाले घामाने चिंब भिजले आणि हाकेवाल्यांचे घसे बसण्याची वेळ आली. जनावर जणू काही त्यांची गंमतच पाहत होते. ते एका जाळीत दबा धरून बसले होते. पण शेवटी त्याचेच नशीब खोटे ठरले. शेपटीला काहीतरी डसल्यामुळे त्याने शेपटी जोरात जमिनीवर आपटली. जाळीत काहीतरी हालल्यासारखे एका हाकेकऱ्यास दिसले, "अरं, इथं झाडीतच तर जनावर दब्लंय" त्याने ओरडून आपल्या सोबत्यांस सांगितले आणि मग काय हाकेवाल्यांना जोर

चढला. वाघऱ्याच्या नेमक्या उलट बाजूने ते अशा काही जोराने ढोलकी वडवू लागले की त्याच्या आवाजाने वाघाच्या कानांचे पडदेच फाटायचे. अखेरीस वाघाने एक भली मोठी डरकाळी दिली. डरकाळीने हाका कसा एकदम थंड पडला. इतकेच काय पण हाकेवालेसुद्धा थंड पडायला आले. जनावर कोणत्या दिशेने उडी घेईल आणि कोणाच्या अंगावर उडी घेईल, ह्याचा नेम नव्हता. पण त्यांचे तकदीर बलवत्तर म्हणून वाघाने नेमकी उलटचा बाजूने झेप घेतली. दहा ते बारा हात छलांग मारीत जनावर सपाटचाने वाघऱ्याच्या दिशेने चालले होते. हाकेवाल्यांनी ते पाहिले आणि त्यांच्या आनंदाला आकाश ठेंगणे झाले. वाघाने एक झेप घेतली आणि तो नेमका वाघऱ्यात अडकला. वाघऱ्यातून सुटण्याकरिता त्याने हातपाय झाडले. पण त्याने जसे जसे हातपाय झाडावे, तसा तसा तो जाळचात अधिकच गुरफटत जावा. वाघऱ्याजवळ काही माणसे अगोदरच दडून होती. त्यांनी लोखंडाच्या साखळचा बाघाभोवती टाकून त्याला पक्के जखडून टाकले. वाघाने काही वेळ खूप जोराने आरडा ओरडा केला आणि मग स्तब्ध पडला.

दोन घटकांच्या आत वाघ पकडला गेल्याची बातमी सक्करदऱ्यावर खाशांना समजली, तसे ते निघाले. वाटेत तेलंखेडीच्या महादेवाचे दर्शन घेण्याकरिता घटकाभर थांबून घोडचाला टाचा दिल्या. बरोबर निवडक पद्रा-पंधरा माणसे धूळ मागे फेकीत दोन घडी रात्रीला महाराजांबरोबर व्याहाडच्या जंगलात जिथे वाघ जखडला होता, तिथे पोहोचली. वाघ पाहून खाशांची तब्येत अगदी खूष झाली. वाघाच्या डोक्यावर कौतुकाने त्यांनी एक थाप मारली, तसे ते जंगली जनावर हातपाय झाडून गुरगुरू लागले; पण वाघ बिचारा इतका करकचून जखडला गेला होता, की त्याला हातपाय हलवणे मुष्कील होते. खाशांनी ते पाहून काही साखळचा दूर करायला लावल्या.

वाघ पकडला तर खरे. पण पुढे काय! सगळेजण खाशांच्या हुकमाची वाट पाहत होते– "हत्तीवर लादून वाघ नजरबागला आणा." राजाज्ञा झाली. मग काय राजा बोले आणि दळ हाले. दोन हत्ती तेलंखेडीला तयार होतेच. पहाट फुटण्याच्या अगोदर शुक्राची चांदणी दिसते न दिसते तोच एक हत्ती जंगलात जागेवर पोहोचला. हत्तीला पाहून वाघोबाच्या अंगात परत वारे शिरल्यासारखे होऊन, तो झटके देऊ लागला. पण करतो काय बिचारा! अगोदरच रात्रभर हातपाय झाडून त्याचा अर्धा दम संपत आला होता. पहाटेच्या सुमारास खाशांनी स्वत: त्याला पाणी पाजले म्हणून तो थोडा चळवळ तरी करीत होता. हत्ती समोरचे दोन पाय मोडून खाली बसला. गजराजाच्या अंगावर आता हे जंगलचे राजे जाणार कसे? पण अडचण सांगून का थकणार होते? खासे जातीने उभे होते. त्यामुळे वाघाला नीट वाडचात नेणे भाग होते. कारण वाघ म्हणजे त्यांचा जानी दोस्त, शूरांचा दोस्त शूर आणि मर्दाचा दोस्त मर्द असतो. एक भूपती तर

दुसरा अरण्यपती. व्याहाडच्या जंगलातला हा वाघ जसा वाघरा तोडू पाहत होता, तसा नागपूरप्रांतीचा हा शार्दूलपग तैनाती फौजेच्या साखळचा मानेपासून सदैव दूर ठेवीत होता.

होता, होता वाघऱ्यासकट जनावर ओढून हत्तीच्या पाठीवर चढवले गेले. केवढी बिचाऱ्याची दुर्दशा ! जनावर हत्तीवर चढलेले पाहून खासे निघाले. मोठ्या मुष्किलिने माहूताने हत्तीला उठवले. पण हत्ती हालला तसा वाघ बिचकला. परत जोरजोराने पाय झाडू लागला तशा वाघऱ्याच्या दोन दोऱ्या तटातट तुटल्या. दोऱ्या तुटल्या तशी माणसे घाबरली. जरा का वाघ तिथून सुटला तर खाशांशीच गाठ ! त्यापेक्षा तो नरभक्षक त्यांना दयाळू होता. अखेरीस माहुताने हत्ती खाली बसवला. मघा खाशांनी वाघाला जे थोडे मोकळे केले होते ते माणसांनी परत करकचून जखडले. हत्ती परत उभा झाला मग डुलत डुलत बाघोबाची ही मिरवणूक रानातून बाहेर पडू लागली. ह्या वेळेपर्यंत सूर्य अस्ताला गेला होता. वारा अजिबात बंद होता रानात झाडाचे पानदेखील हलत नव्हते. अंगाची नुसती लाही लाही होत होती. माणसांच्या अंगातून घामाच्या धारा बाहेर पडत होत्या. वाघोबाची मिरवणूक वाडीपर्यंत पोहोचली तसा सक्करदऱ्यावरील तोफेचा आवाज माणसांच्या कानी आला. आकाशात अष्टमीची चंद्राची कोर खलून दिसत होती चांदणी न् चांदणी आकाशात खुलून दिमाखाने मिरवीत होती.

वाघोबाची हालचाल हळूहळू कमी होत होती. त्यामुळे सोबतची माणसे निर्धास्तपणे रमत गमत वाट तुडवत होती. राहता, राहता फुटाला तलाव एका हाकेवर असता एका माणसाने सहज शंका काढली, 'कारं वाघ तर शेपूट बी हलवत नाही ?' त्यावर 'अरं तो थकून झोपला असंल' म्हणून त्याच्या साथीदाराने त्याची समजूत काढली पण शंका काढणाऱ्याला न राहवून त्याने काडीने वाघाच्या पेकाटास ढोसले पण वाघ चिपच. आता मात्र माणसे जरा बेचैन झाली. कुणी शेपटी ओढली कुणी त्याचे डोळे चाचरडले पण वाघ काही झोपेतून उठेना. शेवटी माहुताला सांगून हत्ती खाली बसवला. त्याचे साखळदंड सोडले आणि वाघऱ्याचे दोर सैल केले. एकानं तर न राहवून सडकून एक लाथ वाघाच्या डोक्यात मारली पण वाघ गप्पच झाला. आता मात्र सगळ्यांना बिलकुल सुन्नच व्हायची वेळ आली. इतक्यात त्यातला एक म्होरक्या ओरडला, "अरं पाहता काय ? वाघ मेला !" आणि खरोखरीच करकचून बांधला गेल्यामुळे आणि अतिशय गर्मीमुळे गजराजावर त्या शार्दुलाने जिवंत समाधी घेतली होती.

# नाव छापायचं नाही

**त्र्यं. न. कुलकर्णी**

हे तीन गुंड माझ्या जर्मन वर्गाच्या दाराशी कशाला उभे आहेत ? माझं नाव का काळजीपूर्वक वाचताहेत ? नाव वाचून पुढे जातील. पलीकडच्या डॉक्टरकडे जाऊ इच्छिणारे ते कुणीतरी रुग्ण असावेत.

पण ते माझ्याच वर्गात घुसले.

माझा रविवारचा वर्ग भरला होता. शिकवायला मी सुरुवात करणार होतो.

" तुमी आमाला जर्मणला पाठवाल का ?" म्होरक्याने विचारले.

हा म्होरक्या गिड्डेलासा होता. दाढी चार-सहा दिवसांत केलेली नव्हती. अंगातला काळ्या-तांबड्या चौकड्यांचा सदरा कधीकाळी धुतला होता कोण जाणे ! पँटलाही धुणं, इस्त्री वगैरेंचा स्पर्श झालेला नव्हता. पायातली चप्पल अनेक ठिकाणी जोडलेली होती.

नमस्कार-चमत्काराची त्याला जरुरी वाटली नाही. " मी आन् माझं हे दोघं भिडू मिळून जर्मणला जाणार म्हंतो. तिकडं कामं लई मिळत्यात असं म्हणतात. आमाला पाठविता तुमी ?" त्याने पुन्हा विचारले.

त्याच्या भिडूंचाही अवतार त्याच्यासारखाच; पण ते तरुण होते. म्होरक्या मात्र पन्नाशी ओलांडून गेलेला असावा.

मला माझ्या वर्गाचे काम सुरू करायचे होते. त्या अडाणी लोकांबरोबर बोलायला मला वेळ होता कुठे ? तेव्हा काहीतरी करून त्यांना वाटेला लावण्याकरता मी म्हणालो,

" हे बघा, तुम्ही अगोदर पासपोर्ट मिळवा, मग माझ्याकडे या. मग पुढचं बघू !"

" पासपोर्ट कसा मिळेल, कुटं मिळेल ?"

" तुमच्या ओळखीचे कोणी मंत्री किंवा पुढारी आहेत का ?–आहेत ना ! छान. त्यांना जाऊन भेटा, म्हणजे तुमचं काम होईल......"

त्यांना काहीतरी करून निरोप देण्याच्या तयारीला मी लागलो.

इतक्यात चक्क जर्मन भाषेत म्होरक्या म्हणाला; " मग आम्हांला जर्मन शिकवाल तुम्ही ?"

जर्मन शिकणाऱ्या माझ्या विद्यार्थ्यांनाही आश्चर्याचा धक्का बसला.

माझा तर त्यावर विश्वासही बसेना. मी स्वप्नात तर नाही ? मराठी-इंग्रजीचे फाटकेही ज्ञान नसलेला हा माणूस चक्क एक तरी जर्मन वाक्य ठसक्यात बोलला होता !

मी नरमलो नि त्यांना म्हणालो,

" बसा बसा ना ! जर्मनीत होता वाटतं काही दिवस ?"

" होतो की दीड-दोन वर्सं !"

" ते कसं काय ?"

" आवो, नेताजींच्या सैन्यात होतो मी. नेताजी सुभाषचंद्र बोसांच्या अगदी पहिल्या तुकडीत होतो मी ! कोणत्या सालची गोष्ट बरं......"

तो रंगात येऊन सांगू लागला. त्याच्या काही गोष्टी ऐकता ऐकता आम्हीही रंगून जाऊ लागलो. माझ्या विद्यार्थ्यांना मी म्हटले,

" आज आपला वर्ग रद्द ! यांचं भाषणच ऐकू या आपण !"

" उत्तम !" माझ्या वर्गाने संमती दिली.

म्होरक्याला मी वर्गासमोर आणून माझी खुर्ची दिली व मी वर्गात विद्यार्थ्यांबरोबर बसलो. त्याचे भिडूही वर्गात बसले. म्होरक्याचे नावगाव आम्हांला कळले. तो कोकणातला मूळचा.

सुभाषबाबूंच्या पहिल्या तुकडीत हातापायाच्या बोटांवर मोजता येतील एवढीच माणसे होती. त्यांतला हा. नेताजींच्या अगदी निकट सान्निध्यात आलेला. त्या वेळच्या इतर काही सहकाऱ्यांची, अधिकाऱ्यांची नावेही त्याने सांगितली. हा गडी एक साधा शिपाई होता, पण पहिल्या तुकडीत होता ही कौतुकाची गोष्ट नाही का ?

आता पुढचा भाग ऐका. पण वाचकांच्या सोयीसाठी मी तो त्याच्या रांगड्या भाषेत मुद्दामच देत नाही. आमच्या या म्होरक्याच्या लक्षात आता सारा भूगोल-इतिहास नाही, हेही साहजिकच आहे. सनावळ्या, तारखा वगैरेंचा गोंधळ होता. तेव्हा तोही भाग मी सोडून देतो.

" केव्हा नि कुठं सामील झाला तुम्ही नेताजींना ? तुमची ही सारी हकीकत प्रसिद्ध करीन मी ! हं, सांगा सारं !"

म्होरक्याला जोर आला. त्याची भीड मोडली व तो बोलू लागला, " छापा, छापा, सारं वर्तमानपत्रांत, अगदी माझ्या नावासकट छापा !"

एखाद्या वक्त्याच्या ऐटीत तो सांगू लागला,

" मी आफ्रिकेत इंग्रजांच्या सैन्याबरोबर जर्मनांशी लढत होतो तेव्हा जर्मनांच्या तडाख्यात सापडलो. हां, तर मी मूळचा इंग्रजांच्या सैन्यातला. पुण्याला येऊन भरती

झालो होतो. आपल्याला काय राजकारण कळत नव्हतं. पोटासाठी काय तरी करायला हवं म्हणून इंग्रजांचा शिपाई झालो होतो. तर असा जर्मनांच्या हातात घावलो मी. त्यांनी मला थेट पाठविला जर्मनीला. बर्लिनच्या पलीकडे एक गाव आहे तिथं. तिथं मला नेताजींचे लोक भेटले, नेताजी भेटले अन् मला पटलं की मरायचं तर आपल्या मातृभूमीच्या स्वातंत्र्यासाठी मरायला पाहिजे !"

"जर्मन कुठं शिकला ?" कुणीतरी विचारले.

"अहो शिकलो कुठं ? आमचे शिक्षक जर्मन, आम्हांला जेवायला वाढणारे जर्मन, गावात कुठं फिरायला गेलो तरीही कानांवर जर्मन भाषाच पडायची. जर्मन लोक केव्हा केव्हा आम्हांला घरी जेवायला बोलवायचे. तर असं सरावानं बोलायला यायला लागलं. झालं. आता विसरलं सारं म्हणा ! चार-दोन वाक्यं येतात तशी ! तर सांगायचं म्हणजे हळूहळू शेकडो भारतीय सैनिक नेताजींच्या सैन्याला येऊन मिळाले. आमची स्वतंत्र इंडियन नॅशनल आर्मी तयार झाली. आम्हांला सुभाषबाबू फार प्यारे होते. त्यांच्या शब्दांकरता आम्ही काहीही करायला तयार होतो. आम्हांला प्राणांची पर्वा बिलकूल नव्हती. नंतर आम्ही इंग्रजांबरोबर लढू लागलो अन् फ्रान्समध्ये मी इंग्रजांच्या तावडीत सापडलो !"

## इंग्रजी तुरुंग

"मग इंग्रजांनी खूप छळ केला असेल तुमचा !"

"ते काय विचारू नका. आम्हांला इंग्लंडमधल्या एका छावणीत ठेवण्यात आलं. तिथं आमच्यावर बंदुका रोखून सांगत, या कागदावर सह्या करा. त्या कागदावरचा मजकूर साधारण असा होता– मी इंग्रजी सैन्यात शिपाई होतो, पण फितुर होऊन जर्मनांच्या सैन्यात गेलो आहे, वगैरे वगैरे. आम्हांला ते मान्य नव्हतं. आमचं म्हणणं होतं की, आम्ही सुभाषबाबूंच्या लष्करातून भारताच्या बाजूने लढत होतो... आम्ही त्यांच्या म्हणण्याप्रमाणं सह्या केल्या असत्या तर आमच्यावर कोर्ट मार्शलचा इलाज करता आला असता; पण आमचं म्हणणं, आम्ही इंडियन नॅशनल आर्मीचे सैनिक ! आमचा फार फार छळ केला इंग्रजांनी. आम्हांला त्यांनी खूप झोडपून काढलं, आमची उपासमार केली......आम्हीही डोकं चालविलं. आमच्या पहाऱ्यावर एकदा अमेरिकन निग्रो आले होते. त्यांच्यामार्फत आम्ही अमेरिकन लष्कराकडे तक्रार केली की, हे इंग्रज आम्हांला फार छळतात. तेव्हा अमेरिकनांनीच आमचा पहारा करावा असं ठरलं. त्या वेळी इंग्लंडातही अमेरिकेचा वरचष्मा होता !

"आता इथून मात्र खूपखूप गंमती करायला मिळाल्या आम्हांला राव ! हे निग्रो शिपाई आमचे दोस्त बनले. त्यांना कुठलं आलंय् इंग्रजांबद्दल प्रेम ? तर कधी कधी ते न्हायचे तुरुंगातले कैदी. त्यांचा युनिफॉर्म घालून आम्ही अधूनमधून गावातून हिंडून यायचो. कोण सिनेमाला जायचे, कोण नव्यानव्या "मैत्रिणींना" भेटून यायचे. एकदा आमच्यापैकी काहीजणांनी बंदुका चालवून थोडे इंग्रजच

रस्त्यावर लोळवले...अन् आले पुन्हा छावणीत. परत कपडे बदलले. गुन्हेगार सापडणार कसा ? तर अशा गंमती ! "

" किती दिवस होता त्या छावणीत ? "

" चार-सहा महिने. पुढं आम्हांला एका बोटीतून हिंदुस्थानला पाठविण्यासाठी एका बंदरात आणण्यात आलं. आमच्याकरता जी बोट उभी होती तिच्या आजूबाजूला भोकंच भोकं होती. कसली तरी जुनाट बोट होती. आम्ही इंग्रजांचा डाव ओळखला.

" सुभाषबाबूंच्या सैन्यातल्या आम्हा पाचसहाशे सैनिकांना समुद्रात जलसमाधी द्यावयाचा त्यांचा बेत उघड दिसत होता. आम्ही त्या बोटीवर चढायला साफ नकार दिला नि खूप दंगा चालविला. इंग्रज शिपायांनी आमच्यावर बंदुका रोखल्या. त्यांना आम्ही भिणार ? आम्ही तर प्राणावर उदार झालेले. केव्हा तरी मरणारच ! आम्हीच उलट त्यांना तंबी भरली, " एक माणूस तरी मारून बघा, मग दिसेल आमचा इंगा ! " इतक्यात आमचा दंगा अमेरिकन लष्कराच्या कानांवर गेला. त्यांनी आमचं म्हणणं ऐकून आम्हांला अमेरिकन बोट दिली. तिच्यात आम्ही चढलो...तर असे हे अमेरिकन त्या वेळी आमच्या बाजूला असायचे.......

" पुढं दिल्लीजवळच्या एका छावणीत आम्हांला ठेवण्यात आलं. तिथंही आमचा खूप छळ केला इंग्रजांनी. एका दुष्ट इंग्रज कर्नलला तर मग आम्ही छावणीतच लोळविला. आमच्यावर नंतर खटला झाला, वगैरे गोष्टी तुम्हांला माहीत आहेतच ! " म्होरक्या स्तब्ध झाला.

" नंतर भारताला स्वातंत्र्य मिळालं, तेव्हापासून तुम्ही आनंदात असाल ? " मी विचारलं.

" अर्थातच ! भारताला स्वातंत्र्य मिळविण्याकरताच तर नेताजींच्याबरोबर आम्ही कसलीही साहसं करायला उद्युक्त झालो, ते स्वातंत्र्य आता प्राप्त झालं आहे. आम्ही प्राणही द्यायला तयार होतो. पण प्राणही शिल्लक आहेत. का आनंदात असू नये मी ? " त्याच्या डोळ्यांतून आनंदाश्रू ठिपकले.

आम्ही खाजगी माहिती विचारली.

" बायको कोकणात असते. मला इथं मुंबईत एका सरकारी हपिसात शिपायाची नोकरी आहे. हे दोन मिडू, आणखीन् चार-सहाजण व मी मिळून एका खोलीत राहतो. वर्षातून एकदा गावी जाऊन येतो पंधरा दिवस. तेवढीच बायकापोरांची भेट ! "

" म्हणजे, सरकारनं तुम्हांला सहकुटुंब राहायला लहानशी जागाही दिली नाही ? आश्चर्य आहे ! तुमच्यासारख्या स्वातंत्र्यवीरांची ही परवड ? " माझा एक विद्यार्थी म्हणाला.

" मुलं किती, केवढी आहेत ? "

" माझं लग्न १९२८ साली झालं. आम्ही दोघंही फार लहान होतो त्या वेळी. पुढं हे असं झालं सारं. मला पहिलं मूल १९५२ साली झालं. त्यावरून ओळखा सारं म्हणजे झालं ! कसलं आलंय् संसारसुख नि काय राव ! "

" तुमचं नाव देऊन सारं छापतो हे सारं ! सरकारला काही तरी वाटायला पाहिजे ! " मी म्हटलं.

" अवश्य छापा ! " म्होरक्या म्हणाला.

" त्या भानगडीत मात्र पडू नका हं. उगाच त्रास होईल तुम्हांला, तुमच्या सरकारी नोकरीत ! " माझ्या एका विद्यार्थ्यानं सावधगिरीचा इशारा दिला. त्याला सरकारी कामकाजाची रीत चांगली परिचित होती, " एका शिपायानं अशी एका वर्तमानपत्राला मुलाखत द्यायची म्हणजे काय ? तुमचीच चौकशी सुरू होईल ! "

" हे मात्र खरं ! एखाद्याचं भलं करायला जावं नि त्याच्यावरच आफत यावी ! नको बुवा, तुमचं नाव छापणं ! " मी म्हणालो.

" तेही खरंच आहे ! " म्होरक्यानं मान डोलावली. प्राणावर उदार होऊन भारताच्या स्वातंत्र्याच्या लढ्यासाठी लढणारा शूर वीर एकदम खिन्न झालेला दिसला.

" काय हो, सुभाषबाबू आज भारतात मंत्री असते, तर ही पाळी तुमच्यावर आली असती काय ? " एक विद्यार्थी.

" मुळीच नाही ! " टेबलावर मूठ आपटून म्होरक्या म्हणाला, " आम्हांला असं उकिरड्यावर टाकून नेताजी गाद्यागिरद्यांवर कधीच लोळत पडले नसते ! जयहिंद ! ! ! " ○







# यानंतर मला पुन्हा मूल केव्हा व्हावे

बालकाच्या विकासाच्या दृष्टीने त्याच्या जीवनातील पहिल्या चार पाच वर्षांचा काळ फार महत्त्वाचा असतो असं डॉक्टर्स सांगतात. मातेच्या आरोग्याच्या दृष्टीनेही, पहिल्या अपत्याचा पाठीवर तिला निदान तीन-चार वर्षांनंतरच पुन्हा मूल होणे इष्ट असते.

संतती नियमनाच्या अनेक साध्या व परिणामकारी पद्धती आजमितीस उपलब्ध आहेत. आता अपत्यजन्म ही योगायोगाची अथवा नशिबाची गोष्ट राहिलेली नाहीं. पाहिजे तेव्हाच आपणांस अपत्य होऊ देणे आता तुमच्या हातचे आहे.

मोफत सल्ला व सहाय यांच्यांसाठी नजीकच्या कुटुंब नियोजन केंद्रात विचारणा करा.

आणि लक्षात ठेवा :



दोन वा तीन मुले पुरेत.




davp 68/289

# तो मी नव्हेच!



ॲड. माधव कानिटकर

अंबाला पोलीस स्टेशनवरून भरधाव निघालेली जीप सबइन्सपेक्टर इन्द्रसिंगांनी सरदार लाभसिंगांच्या घराजवळ थांबवली. ती पूर्ण थांबण्या-पूर्वीच ते उडी मारून खाली उतरले. त्यांच्या उजव्या हातात भरलेले पिस्तुल होते ! त्यांच्या पाठोपाठ उतरलेल्या: कॉन्स्टेबल्सनी त्यांच्या हातातल्या बंदुका सज्ज, तयार ठेवल्या होत्या ! तरीदेखील सरदार निर्मलसिंग पुढे यायला तयार नव्हते ! त्यांच्याकडे वळून पाहत इन्स्पेक्टर इन्द्रसिंगांनी त्यांना धीर दिला, " घावरू नका ! चला पुढं ! आम्ही आहोत ना बरोबर ! दाखवा कुठं आहे तो अमरिकसिंग ?"

पोलीस पार्टी लाभसिंगांच्या घराच्या दिशेने चालू लागली ! वाटेतच इन्स्पेक्टर साहेबांनी कॉन्स्टे-बलसना हुकूम दिला, " सगळ्यांनी एकदम पुढं जाऊ नका. विभागून जा, घराला वेढा द्या ! मी त्याला सामोरा जातो ! त्याच्या हातात पिस्तूल दिसलंच तर त्याच्या हातां-वर गोळी मारून पिस्तूल उडवून द्या ! आणि त्यानं पळून जायचा प्रयत्न केलाच तर पायावर गोळी मारा ! "

जीव मुठीत धरून इन्स्पेक्टर इन्द्रसिंगांबरोबर चाललेले सरदार निर्मलसिंग अंगणात आल्याबरोबर

## लेखांक : २

दचकले ! आणि थांबले ! जयपालकौर जिन्याच्या तोंडाशीच अस्ताव्यस्त पडली होती ! ओटयावर सरदार लाभसिंगांचा कोथळा बाहेर आला होता ! अंगणात सरदार अमरनाथ रक्ताच्या थारोळयात वेडेवाकडे हातपाय झाडीत होते आणि सरदार लाभसिंगांच्या जवळच कोसळून पडला होता स्वतः अमरिकसिंग ! त्याचे तोंड जमिनीकडे होते आणि त्याच्या उजव्या हातात अजूनही पिस्तूल होते. इन्स्पेक्टर साहेबांचा दंड घट्ट पकडून सरदार निर्मलसिंगांनी बोट दाखवीत कसेबसे सांगितले,

"साहब ! वो देखो ऽ ! वहाँ पडा है ना ? वही है अमरिकसिंग !"

इन्स्पेक्टर इन्द्रसिंग क्षणभर थांबले ! एकदम पुढे जायचे का ? कशावरून तो नाटक करीत पडून राहिला नसेल ? आपण जवळ गेल्यावरोबर एकदम उठून गोळी मारणार नाही ? पण ते काही होणार असले तरी पुढे जायलाच हवे ! पोलीस अधिकारीच असे घाबरायला लागले तर बघायलाच नको ! उजव्या हातातले पिस्तूल अमरिकसिंगावर रोखून धरून ते पुढे झाले. ओटयाच्या पायऱ्या चपळाईने चढले ! आणि खाली पडलेल्या अमरिकसिंगाच्या रिव्हॉल्व्हर घेतलेल्या उजव्या हातावर आपल्या

*'दि ट्रिब्यून 'मध्ये ' वधू पाहिजे ' अशी जाहिरात वाचल्यावर सरदार लाभसिंगांना जणू देव भेटल्याचाच आनंद झाला. रीतसर मुलगी पाहण्याचा कार्यक्रम झाल्यावर जयपालकौरचे अमरिकसिंगाशी लग्न लागले. तिचे दुर्दैव तिला भेटले. दिल्ली-अंबाला येथे ' मधुचंद्रा 'चे दिवस घालवून हे नवे दांपत्य मद्रासला परतले. लवकरच जयपालला आपला नवरा अमरिकसिंग कोण आहे ? कसा आहे ? काय करतो ? हे कळून चुकले. पण फार उशीर झाला होता. ताबडतोब तिने पत्राने सर्व गोष्टी घरी कळवल्या व संधी मिळताच तिने मद्रास सोडले व ती अंबाल्याला गेली. अमरिकसिंगाला हे कळल्यावर तो खूप चडफडला व दीर्घ मुदतीची रजा काढून तोही अंबाल्याला गेला. सरदार लाभसिंगांच्या घरी ' आत्ताच्या आत्ता जयपालला माझ्या ताब्यात द्या ' असा आरडाओरडा त्याने सुरू केला. ' तिची तब्येत ठीक नाही, तोपर्यंत ती येणार नाही ' असे लाभसिंगांनी ठणकावून सांगितल्यावर अमरिकसिंग परतला, अर्थात पुढील बेत आखूनच. त्याच्या दृष्टीने आता तडजोड संपली होती. जयपालला आयुष्यातून उठवणे हाच एकमेव मार्ग त्याच्यापुढे होता.*

*आणि अखेर १५ फेब्रुवारीचा तो दुर्दैवी दिवस उजाडला, ज्या दिवशी सरदार लाभसिंगांच्या राहत्या घरात खुनाचे ते भीषण नाटच त्याने घडवले होते. सरदार लाभसिंग, जयपाल, सरदार अमरनाथ व स्वतः अमरिकसिंग रक्ताच्या थारोळ्यात पडलेले असतानाच इन्स्पेक्टर इंद्रसिंगांची जीप तेथे पोचली.*

जाडजूड बुटाचा पाय दाबून धरला! इतर कॉन्स्टेबल्स भराभर पुढे झाले! अमरिकसिंगाच्या हातातले रिव्हॉल्व्हर काढून घेतले! हेड कॉन्स्टेबलने ते आपल्या रुमालात गुंडाळून घेतले! अमरिकसिंगाच्या शर्टाची कॉलर पकडून इन्स्पेक्टर साहेबांनी त्याला सुलटा केला! त्याचे सर्व तोंड रक्ताने भरलेले होते! तो उलटा असताना त्याने जिथे कपाळ टेकले होते तिथे रक्ताचे तळे झाले होते! एखाद्या मुक्या माणसाने "आँऽऽआँ" करून बोलावे तसा तो बोलण्याचा प्रयत्न करीत होता पण समजत काहीच नव्हते! त्याला तसाच सोडून इन्स्पेक्टर-साहेब सरदार लाभसिंगांकडे वळले! त्यांची बाहेर-पडलेली आतडी पाहूनच साहेब समजले की, हा जगत नाही हे नक्की! जिन्याशी पडलेली जयपालकौर अर्धवट बेशुद्धावस्थेत विव्हळत होती!

(She was uttering low moans in a state of semi-consciousness)

पण हे काय? तिच्या छातीत गोळी लागलेली असताना दोन्ही मांड्यांखालून इतके रक्त का ओघळत होते? त्यांनी तिच्या मांड्यांना हात लावून पाहिला आणि ते चरकले! जयपालकौरच्या दोन्ही मांड्यांमध्ये तिचे अपुऱ्या दिवसांचे झालेले आणि गेलेले मूल पडले होते! आठवा लागल्यानंतर छातीत गोळी घुसल्यामुळे, जिन्यावरून गडगडत खाली पडल्यामुळे जयपालकौरचे मिसकॅरेज झाले होते! अरेरे! काय ही विटंबना! इन्स्पेक्टर साहेब लगबगीने उठले आणि त्यांनी सरकारी हॉस्पिटलला इथले पेशंट आणि त्यांची स्थिती ताबडतोब कळवली. टाकोटाक हॉस्पिटलची ॲम्ब्युलन्स सरदार लाभसिंगांच्या घराच्या दिशेनं घंटानाद करीत निघाली! इन्स्पेक्टर साहेबांनी आपले पुढचे काम सुरू केले! त्यांनी केस डायरी लिहिली. इतकी सोपी केस त्यांना गेल्या कित्येक वर्षांत मिळाली नव्हती! आरोपीने गोळ्या झाडताना अनेक लोकांनी प्रत्यक्ष पाहिले होते! आरोपी येतानाच पिस्तुल घेऊन आला होता! हेतू निश्चित होता! आणि त्यांना आरोपी अमरिकसिंग विशेष यातायात न करता अलगद सापडला होता! बस्? आता काय राहलंय? नुसती साक्षीदारांची स्टेटमेंट्स रेकॉर्ड करायची, पंचनामा करायचा की लटकलाच अमरिकसिंग फाशी! वरवर बघता इन्स्पेक्टर इन्द्रसिंगांचे विचार बरोबर होते! पण पोलीस ऑफिसरलासुद्धा दैवगती नसते का? त्यांना त्या वेळी काय कल्पना की, हा खटला पुढे इतका गुंतागुंतीचा होत जाणार आहे की, परिणामी त्यांची नोकरीसुद्धा धोक्यात येऊ शकेल! भविष्यात काय होणार आहे हे कुणालाच पाहता येत नाही तेच बरे! काही काळ तरी मनुष्य खूष असतो! त्याच खुषीत इन्स्पेक्टर इन्द्रसिंगांनी पिस्तुलाचा पंचनामा केला! आणि त्यांनी अमरिकसिंगाची झडती घेतली! त्याच्या खिशातून त्याचे आयडेंटिटी कार्ड बाहेर पडले! त्या कार्डावर अमरिकसिंगाचा फोटो होता! त्याच्या डाव्या हाताचा स्पष्ट अंगठा

होता! उंची लिहिली होती पाच फूट नऊ इंच! शरीराच्या खुणा लिहिलेल्या होत्या! डाव्या डोळयाच्या भुवईवर सुमारे १।। इंच जुन्या जखमेचा व्रण आहे! उजव्या पायाच्या नळीवर पुढच्या बाजूला १"×३/४" व्रण आहे! तसेच उजव्या हाताच्या करंगळीजवळच्या बोटावरही एका जखमेची खूण आहे! हे कार्ड त्याला सिव्हिल गॅझेटेड ऑफिसर म्हणून इंडियन आर्मीकडून दिले गेलेले होते. आणि ते कार्ड अधिकृत असल्याची ग्वाही दिली होती खाली सही केलेल्या कॅप्टन के. व्ही. मेनन या सैन्याधिकाऱ्याच्या सहीने!

( The card was attested and signed by Capt. K. V. Menon in token of its genuineness )

...द्रुत गतीने घंटा वाजवीत सरकारी हॉस्पिटलची अॅम्ब्युलन्स सरदार लाभसिंगांच्या अंगणात येऊन उभी राहिली! हॉस्पिटलचे कामगार झटपट कामाला लागले! चार स्ट्रेचर्स खाली काढले गेले आणि जयपालकौर, सरदार लाभसिंग, सरदार अमरनाथ आणि अमरिकसिंग यांना अॅम्ब्युलन्समध्ये ठेवले गेले. त्यांच्यापैकी प्रत्येकजण भयानक चीत्कार करीत होता. इन्स्पेक्टर इन्द्रसिंग त्यांच्या पाठोपाठ अॅम्ब्युलन्समध्ये चढले आणि अमरिकसिंगाच्या बाजूला बसले. जखमी असला म्हणून काय झाले! त्याला आता ते तसा सोडणार नव्हते. हॉस्पिटलमध्ये सर्जन्स तय्यार होऊन बसले होते. सबइन्स्पेक्टर इन्द्रसिंगांनी डॉक्टरसाहेबांना अगोदरच सांगून टाकले, "ह्यांच्यापैकी अमरिकसिंग नावाचा जो पेशंट आहे ना? त्यानेच हा सर्व प्रकार केलेला आहे! मी केस रजिस्टर केली आहे! आरोपीवर कडक लक्ष ठेवा! तुमची ट्रीटमेंट होण्यापूर्वीच माझे कॉन्स्टेबल्स इथे येतील आणि डॉक्टरसाहेब! त्याला काही विशेष झालं नसलं तरी त्याला डिस्चार्ज देऊ नका! त्याला इथून परस्परच मी पोलीस कस्टडीत नेणार आहे!"

...बाकीच्या डॉक्टरांचे काम झपाट्याने चालू होतेच. भराभर चौघांचे 'एक्सरे' घेण्यात आले! गोळया शरीराच्या कुठल्या भागांत आहेत त्या जागा नक्की करण्यात आल्या! डॉक्टरांच्या मते सरदार लाभसिंग यांचे ऑपरेशन करण्यात काहीच अर्थ नव्हता! ते जवळजवळ गेल्यातच जमा होते! जयपालकौरची स्थिती चिंताजनक होती! ऑपरेशन यशस्वी झाले तर कदाचित ती वाचेल! सरदार अमरनाथ नक्की वाचतील. कारण त्यांच्या छातीत घुसलेल्या गोळीने आत घुसल्यावर फार नासधूस केलेली नव्हती. ती बरगडीत अडकली होती! आणि शरीराच्या जखमेपेक्षा त्यांनी मनाने घेतलेला धसकाच मोठा होता! अमरिकसिंगाच्या शरीरात गोळया नव्हत्याच! त्याने स्वत:वर दोन गोळया झाडून घेऊन आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला होता ही गोष्ट खरी! पण एकतर त्या वेळी जगण्याच्या दुर्दम्य लालसेने आयत्या वेळी त्याचा हात हलला असेल किंवा मरायला तयार झालेल्या माणसाच्या मनातदेखील प्रबळ अशी जी जगण्याची सुप्त इच्छा-

शक्ती असते, त्यामुळे असेल, अमरिकसिंगाने स्वत:ला मारून घेतलेली एकही गोळी याच्या कुठल्याही हाडाला लागली नाही ! त्याने हनुवटीखाली मारून घेतलेली गोळी सरळ मांसल भागातून प्रवास करीत वर गेली आणि त्याच्या तोंडातून बाहेर पडली ! आणि डाव्या कानशिलाजवळ मारून घेतलेली गोळी डाव्या गालातून आत शिरली आणि उजव्या गालातून बाहेर गेली.

( There was no doubt that he had intended to kill himself, but either the intensity of his passion, shook his hand or the overpowering instinct of self-preservation unconsciously deflected the aim of his weapon from vital parts of his body. The fact remains that he suffered very little damage ! )

इतके करून अमरिकसिंग जगला ! डॉक्टर त्याच्या जखमांवर उपचार करून त्याला पूर्ण बरा करणार होते ! कशासाठी ? सरदार लाभसिंगांचा खुनी म्हणून त्याला फाशी देण्यासाठी ! अमरिकसिंगाने इतरांना सुखाने जगू दिले नव्हते आणि इन्स्पेक्टर इन्द्रसिंग त्याला आता सुखाने मरू देणार नव्हते ! त्यांच्या मनात येत होते, जयपालकौरचा इतका तळतळाट घेणारा, वृद्ध सासऱ्याचा सहज खून करून टाकणारा हा माणूस आता असातसा मरणार नाही ! ' फाशीची फळी खेचली गेली की, खड्ड्यात लोंबकळत राहील ! गुदमरेल ! घशातून जीभ बाहेर येईल ! दोन्ही डोळे बाहेर पडतील, चार चार इंच ! ह्याला असाच मारला पाहिजे ! हा असाच मेला पाहिजे !

डॉक्टरसाहेबांचे अंदाज तंतोतंत खरे ठरले ! ऑपरेशन झाल्यानंतर सरदार लाभसिंग अवघ्या एका तासात मरण पावले ! मृत्यूपूर्वी त्यांनी काय घडले, कसे घडले, याची थोडक्यात जबानी इन्स्पेक्टर इन्द्रसिंगांना दिली होती. अमरिकसिंगाविरुद्ध आणखी पुरावा दिला होता ! कारण, भारतीय कायद्याप्रमाणे सेशन्स जज्ज असे धरून चालणार होता की, मरणारा माणूस मरता मरता सहसा खोटे बोलत नसतो !

( Sardar Labhsingh succumbed to his injuries, after he had made a brief statement about the incident and according to Indian Law, dying declarations are presumed to be true ! )

दुसऱ्या दिवशी सकाळच्या वर्तमानपत्रांत बातमी झळकली !

" संतप्त जावयाकडून सासऱ्याचा भीषण खून !"

" पंचांचा निर्णय पटला नाही म्हणून रक्तपात ! एक खून–तीन जखमी !"

" आत्महत्येचा प्रयत्न करणाऱ्या पिसाट खुन्यास अटक !"

योगायोगाची गोष्ट म्हणजे पंजाबच्या " दि ट्रिब्यून " या प्रसिद्ध इंग्रजी वर्तमानपत्रात मथळा झळकला.



**थांब ! अमरिकसिंग ! तू कुठही जाऊ शकत नाहीस.**

" Furious son-in-law commits murder. "

होय ! तोच तो " दि ट्रिब्यून " की ज्या " ट्रिब्यून "मध्ये अमरिकसिंगाने त्याच्या लग्नाबद्दल जाहिरात दिली होती ! तोच तो " ट्रिब्यून " की ज्यातील ती जाहिरात वाचून सरदार लार्मासिंगांनी पत्रव्यहार केला होता; आणि आपल्या लाडक्या जयपालचे लग्न अमरिकसिंगाशी लावून दिले होते ! एक दिवस असा

होता की, एकीकडे " ट्रिब्यून " वाचत असताना ते म्हणाले होते, " वाहे गुरूची कृपा ! ग्रंथसाहेबाची कृपा ! किती भाग्यवान मी ! " त्या वेळी त्यांना कल्पना तरी होती का की, आपल्या स्वतःच्या खुनाची बातमी–आणि तीसुद्धा जावई अमरिकसिंग ह्याच्या हातून ! –ह्याच " ट्रिब्यून " मध्ये पहिल्या पानावर येईल म्हणून?

जयपालकौरचे ऑपरेशन यशस्वी झाले ! छातीतून गोळी बाहेर काढण्यात डॉक्टर यशस्वी झाले ! मात्र आधीच मानसिक त्रास ! त्यात गर्भारपण ! त्यात छातीत गोळी लागलेली आणि नंतर झालेले मिसकॅरेज यानंतर हे कठीण ऑपरेशन ! स्त्रीच्या शरीराचे इतके हाल कोणी पाहिले नसतील. मग सहन करण्याचे बाजूलाच राहिले ! त्यानंतर सतत सात महिने जयपालकौर हॉस्पिटलमध्ये पडून होती ! शारीरिक हाल सहन करीत होती !

( For nearly seven months, she lay in hospital unable to pursue the normal course of her life ! )

सरदार अमरनाथ यांच्यावरचे ऑपरेशनदेखील यशस्वी झाले ! गोळी बाहेर काढली गेली ! इन्स्पेक्टर इन्द्रसिंगांनी या दोन्ही गोळ्या आपल्या ताब्यात घेतल्या ! आणि शस्त्रास्त्र तज्ज्ञाकडे पिस्तुलासकट पाठवून दिल्या ! ह्या दोन्ही गोळ्या अमरिकसिंगाच्या पिस्तुलातूनच बाहेर पडल्या असल्या पाहिजेत असा त्यांचा ठाम अभिप्राय त्यांनी मिळवला ! ' फिंगर प्रिंट एक्सपर्ट 'चा रिपोर्ट त्यांनी अगोदरच मिळवला होता की, पिस्तुलावर उठलेले बोटांचे ठसे हे अमरिकसिंगाच्या बोटांचे आहेत !

अमरिकसिंगावर अवघे आठ दिवस उपचार करावे लागले आणि अमरिकसिंग पूर्ण बरा झाला ! मात्र सरकारी डॉक्टरांनी त्यांची कामगिरी चोख बजावली होती ! अमरिकसिंगाच्या जखमांचे स्वरूप आणि वर्णन त्यांनी इतक्या विस्ताराने आणि अचूक लिहून ठेवले होते की, ज्याचा पुढे कोर्टामध्ये उपयोग झाला !

डॉक्टरसाहेबांनी पूर्वीच्या सर्व व्रणांचा आणि जखमांचा उल्लेख करून पिस्तुलाच्या दोन गोळ्यांनी झालेल्या नवीन जखमांचे वर्णन केले होते !

( He recorded his observations very precisely giving the exact measurements of injuries and their location, as also the distance between the wounds of entry and the wounds of exit in each case ! )

त्याला जखमा कुठे कुठे झाल्या, दोन नवीन जखमांमधील अंतर किती, त्या किती इंच आहेत आणि का झाल्या, याचे सविस्तर वर्णन त्यांनी आपल्या मेडिको–लीगल रिपोर्टमध्ये केले होते !

अमरिकसिंग आता चांगलाच बरा झाला होता ! त्याला केव्हाही डिस्चार्ज द्यायला हरकत नव्हती ! डॉक्टरसाहेबांनी इन्स्पेक्टर इन्द्रसिंगांना तसे कळवले !

आणि दुसऱ्या दिवशी सकाळी अमरिकसिंगाला डिस्चार्ज द्यावा असे ठरले !

सकाळचे नऊ-सव्वा नऊ झाले असतील, अमरिकसिंगाला डॉक्टरसाहेबांनी सांगितले होते की, "तुला उद्या डिस्चार्ज देतो!" तो खुशीत होता ! त्याला कल्पनाही नव्हती की तो "आजारी" असतानादेखील त्याच्या वॉर्डसमोरच्या व्हरांड्यात दोन साध्या वेषातले पोलीस त्याच्यावर सतत नजर ठेवून होते म्हणून ! साडेनऊ वाजता इन्स्पेक्टर इन्द्रसिंगांची जीप हॉस्पिटलच्या आवारात शिरली ! डॉक्टरसाहेबांशी त्यांचे बोलणे झाले ! आणि डॉक्टर हसत हसत अमरिकसिंगाच्या वॉर्डमध्ये शिरले ! त्याच्या पाठीवर थाप मारून डॉक्टर म्हणाले, "हॅलोऽऽ ! अमरिकसिंग ! हाऊ आर यू ? ऑल राईट ? आता तू बरा झालास. तू आता कुठेही जाऊ शकतोस !

"थँक्स डॉक्टर !"

अमरिकसिंगाने हॉस्पिटलचा वेष बदलला आणि आपले कपडे घालून तो वॉर्डच्या बाहेर पडला ! लॉबीमधून आवाज आला, "थांब ! अमरिकसिंग ! तू कुठेही जाऊ शकत नाहीस !"

अमरिकसिंगाने मागे वळून पाहिले ! सबइन्स्पेक्टर इन्द्रसिंग मागे पूर्ण गणवेषात उभे होते ! त्यांच्यावरोबर कॉन्स्टेबल्स होते ! त्यांच्या हातांत बेड्या होत्या ! सबइन्स्पेक्टर इन्द्रसिंग पुढे झाले ! अमरिकसिंगाच्या दोन्ही हातांत बेड्या ठोकता ठोकता ते म्हणाले, "मी सबइन्स्पेक्टर इन्द्रसिंग, अंबाला पोलिस स्टेशन ! सरदार लाभसिंग यांचा जाणून बुजून आणि हेतुपुरःस्सर खून करणे, सरदार अमरनाथ आणि मिसेस जयपाल अमरिकसिंग यांच्या खुनाचा प्रयत्न करणे आणि स्वत: आत्महत्या करण्याचा प्रयत्न करणे या तीन गंभीर आरोपांखाली मी तुला अटक करतो आहे ! चलो !"

...आणि कडेकोट बंदोबस्तात आरोपी अमरिकसिंग त्या दिवशी पोलीस कोठडीत बंद झाला ! सबइन्स्पेक्टर इन्द्रसिंग रात्र होण्याची वाट पाहत होते. त्यांचा नेहमीचा शिरस्ता होता की, आरोपीला बेदम ठोकायचा तर रात्री दीड वाजल्यानंतर ! त्या वेळी पोलीस स्टेशनवर कुणी नसते आणि आरोपी ओरडलाच तर कुणी ऐकायला नसते ! पोलीस लफड्यात येत नाहीत !

रात्रीचा एक वाजून गेला होता ! सबइन्स्पेक्टर इन्द्रसिंगांनी हुकूम सोडला, "हवालदार ! आरोपी अमरिकसिंगाला इन्क्वायरी रूममध्ये घ्या !" मध्यरात्री अमरिकसिंगाला पोलीस स्टेशनच्या मागच्या खोलीत नेला गेला ! इन्स्पेक्टर इन्द्रसिंग आत गेले आणि त्यांनी अमरिकसिंगाला दोन अशा भडकावून दिल्या की, मध्यरात्री त्याच्या डोळ्यांसमोर काजवे चमकले ! काकुळतीने त्याने इन्द्रसिंगांना विचारले, "साहेबऽ ! का मारता मला?" सबइन्स्पेक्टर इद्रसिंग आणखी भडकले. त्याच्या डोक्याचे केस धरून त्यांनी अमरिकसिंगाचे डोके भिंतीवर दाण्कन आपटले.

" उगाच मारतो असं वाटलं तुला ? बोलऽऽ ! खरं खरं काय असेल तर चटाचट बोलऽऽ ! नाहीतर आणखी मार खाशील !"

" मी काय झालं, कसं झालं आणि का झालं ते कबूल करायला तयार आहे !"

" खरं ?"

" अगदी खरं !" अमरिकसिंग रडायला लागला !

इन्स्पेक्टर इन्द्रसिंगांना दया आली ! पुरावा भरपूर होता ! उगाचच त्याला आणखी मारण्यात अर्थ नव्हता ! तरीदेखील त्यांनी अमरिकसिंगाला सुखा दम दिला, " हे बघ ! अमरिकसिंग, तुझं स्टेटमेंट मी घेऊन फायदा नाही ! उद्या मॅजिस्ट्रेटसाहेबांसमोर सगळं खरं कबूल कर ! नाहीतर याद राख माझ्याशी गाठ आहे !"

" करीन ! सगळं खरं कबूल करीन !"

इन्स्पेक्टर इन्द्रसिंगांनी दुसऱ्या दिवशी मॅजिस्ट्रेटसाहेबांना सादर करण्यासाठी इंडियन पीनल कोड कलम ३०२, ३०७ आणि ३०९ खाली रिमांड अॅप्लिकेशन तयार केला आणि त्यात शेवटी लिहिले की, आरोपी अमरिकसिंग हा गुन्ह्यांचा कबुलीजबाब द्यायला तयार आहे !

सबइन्स्पक्टर इन्द्रसिंगांनी हवालदारला हाक मारली,

" १५३५७ !"

" यस सर !"

" इसको अंदर बंद करो !"

सकाळी मॅजिस्ट्रेटसाहेबांच्या कोर्टात काय होईल ते बघू असा विचार करून सब-इन्स्पेक्टर इन्द्रसिंग घरी गेले !

आणि आपले भवितव्य कठीण आहे, याची जाणीव झालेला अमरिकसिंग ! एके काळचा सिव्हिल गॅझेटेड ऑफिसर ! B. A. LL. B. ! खुनाच्या खटल्यातला आरोपी म्हणून पोलीस कोठडीतल्या अंधारात ढळढळा अश्रू गाळीत बसून राहिला !

२० एप्रिल १९५० हा दिवस ! आज आरोपी अमरिकसिंगाला फर्स्ट क्लास मॅजिस्ट्रेटपुढे हजर करण्यात येणार होते ! कशी कोण जाणे, पण अमरिकसिंगाला आज कोर्टात आणणार आहेत, ही बातमी हां हां म्हणता सबंध अंबाल्यात पसरली. कोर्टाची वेळ अकराची होती. पण सकाळी नऊ-साडे नऊपासूनच लोकांच्या झुंडीच्या झुंडी मॅजिस्ट्रेट कोर्टाच्या आवारात शिरल्या. कोर्टाचा दरवाजा उघडला गेल्याबरोबर लोक आत घुसले आणि ' जागा धरून ' बसले ! त्यांना अमरिकसिंगाला पाहायचा होता !

...कडेकोट पोलीस बंदोबस्तात दोन्ही हातांत हातकड्या घातलेल्या अमरिकसिंगाला कोर्टात आणण्यात आले. कुणीतरी तो अमरिकसिंगच याची खातरजमा करून घेतली !...आणि कोर्टात " आला ऽऽ ! आला ऽऽ ! तो बघा अमरिकसिंग !" म्हणून गलबला सुरू झाला. बंदोबस्ताच्या शिपायांची धांदल उडाली ! ' जनते 'च्या वाणीला पुराव्याची जरुरी नसते ! जुन्या आणि नव्या अशा असंख्य जखमा अमरिकसिंगाच्या चेहऱ्यावर होत्या ! त्याचा चेहरा सामान्य माणसाचा चेहरा वाटत नव्हता ! त्याला नुसता पाहूनच लोक एकमेकांना सांगू लागले, " अरे ! यानेच खून केला असला पाहिजे ! यानेच त्या गोळ्या झाडल्या असल्या पाहिजेत ! दिसतोच बघाना कसा तो स्साऽऽऽ ला !"

पोलिसांनी कोर्टात शांतता प्रस्थापित केली ! लोकांना दम दिला, " गडबड केलीत तर सगळ्यांना बाहेर काढावं लागेल !" मॅजिस्ट्रेटसाहेब यायची वेळ झाली होती. अकरा वाजले आणि कोर्टाचा शिपाई एकदम आत आला. त्याच्या " सायलेऽऽऽन्स !" ने सर्वांना समजले की मॅजिस्ट्रेटसाहेब आले ! लोकांनी उभे राहून त्यांचा मान राखला आणि ' कोर्ट ' बसल्यावर ते खाली बसले ! कोर्टाचे कामकाज सुरू झाले. अनेक पोलीस स्टेशनच्या अनेक आरोपींना मॅजिस्ट्रेटसाहेबांपुढे उभे करण्यात आले. आरोप सांगितले गेले. साहेबांनी कुणाला जामीन दिला, कुणाला नाकारला ! ज्युडिशियल क्लार्कने " अंबाला पोलीस स्टेशन. रिमांड. " असे म्हटल्याबरोबर सबइन्स्पेक्टर इन्द्रसिंग लाकडी पिंजऱ्यात शिरले, त्यांनी मॅजिस्ट्रेटसाहेबांना शिस्तीत सलाम ठोकला. कॉन्स्टेबल पुन्हा एकदा मोठ्याने ओरडला, " अमरिकसिंग तेजासिङ्ग ! " अमरिकसिंगाला मॅजिस्ट्रेटसाहेबांसमोर आणण्यात आला....आणि सबइन्स्पेक्टर इन्द्रसिंगांनी हळूच मॅजिस्ट्रेटसाहेबांना सांगितले,

" Arrested under Sec. 302, 307 and 309 I. P. C. Sir !"

नुसते पीनल कोडाचे ते सेक्शन्स ऐकूनच काही न बोलता मॅजिस्ट्रेटसाहेबांनी अमरिकसिंगाला अधिक चौकशीसाठी चौदा दिवस पोलीस कोठडीत ठेवण्याचा हुकूम दिला. कोर्टाचा कॉन्स्टेबल ओरडला, " आगले महिने का चार तारीख, पोलीस कस्टडी !" सरकारी वकील त्वरित उभे राहिले. त्यांनी कोर्टाला विनंती केली, " युवर वर्शिप ! आरोपी अमरिकसिंग कबुलीजबाब द्यायला तयार आहे ! तो आजच रेकॉर्ड केला जावा !"

मॅजिस्ट्रेटसाहेबांनी कागद पुढे ओढले, सबइन्स्पेक्टर इंद्रसिंग पुन्हा एकदा सलाम ठोकून खाली उतरले आणि आरोपी अमरिकसिंग पिंजऱ्यात शिरला. मॅजिस्ट्रेटसाहेबांनी त्याला विचारले,

" अमरिकसिंग ! तू गुन्ह्यांचा कबुलीजबाब द्यायला तयार आहेस हे खरं का ?"

" मी कुठलाही गुन्हा केलेला नाही साहेब ! मी फक्त त्या दिवशी खरं काय

घडलं ते सांगायला तयार आहे !"

" ठीक आहे ! तू जे काही सांगशील ते पुरावा म्हणून सेशन्स कोर्टात तुझ्याविरुद्ध वापरण्याचा अधिकार सरकारला आहे हे तुला माहीत आहे का ?"

" नाही साहेब !"

" आता ठाऊक झालं ना ? तरीदेखील तुला माझ्यासमोर काही सांगायचंय ?"

" यस् सर ! कारण, मी खरं काय आहे तेच सांगणार आहे !"

" तुझी तब्येत ठीक आहे ना ?"

" उत्तम आहे !"

माझ्यासमोर तू स्टेटमेंट केलंच पाहिजेस, अशी सक्ती तुझ्यावर कायद्याने करता येत नाही. तुझ्यावर कोणी दडपण आणलंय का ?"

" नाही साहेब !"

" म्हणजे तू जे काही सांगशील ते तू आपणहून, मनापासून सांगणार आहेस ? "

" होय साहेब !"

" ठीक आहे !"

मॅजिस्ट्रेटसाहेबांनी सर्व पोलिस अधिकाऱ्यांना आणि कॉन्स्टेबलसना कोर्टाच्या बाहेर जाण्याचा हुकूम दिला ! इतर लोक आणि वकील मंडळी कान टवकारून ऐकू लागली ! मॅजिस्ट्रेटसाहेब मध्येच अमरिकसिंगाकडे बघत एकीकडे लिहून घेऊ लागले. अमरिकसिंग सांगत होता,

" अंबाल्याच्या " दि ट्रिब्यून " या वर्तमानपत्रात,–२४ नोव्हेंबर १९४८ च्या अंकात–मी " वधू पाहिजे " अशी जाहिरात दिली होती ! त्याला सरदार लाभसिंग यांच्याकडून उत्तर आले. त्यानंतर सरदार लाभसिंग यांची माझी प्रत्यक्ष भेट अंबाल्याला झाली, त्या वेळी मी त्यांना स्पष्टच सांगून टाकले की, ' माझी तुम्हांला फसवण्याची इच्छा नाही (!) मी केवळ हौस म्हणून दुसरं लग्न करतोय ! माझी पहिली पत्नी बलजीतकौर ही जिवंत असून मला दोन मुलंही आहेत.' त्यावर सरदार लाभसिंग म्हणाले की, ' मी आमच्या मंडळींना विचारून काय ते तुम्हांला कळवतो '. त्या वेळी मी गुरुद्वारमध्ये उतरलो होतो. दुसऱ्या दिवशी सकाळी सरदार लाभसिंगांच्या घरून मला बोलावणे आले म्हणून मी त्यांच्याकडे गेलो. घरात सरदार लाभसिंग आणि त्यांच्या पत्नी रामरखी अशी दोघंच होती ! मी विचारलं, ' मग तुमचा काय विचार ठरला ?' त्यावर माझ्या सासूबाई रामरखी म्हणाल्या, ' आमची काहीच हरकत नाही ! पुष्कळ पंजाबी शीख हौस म्हणून दोन दोन लग्नं करतात आणि दोघीही सुखाने नांदू शकतात ! जयपालकौर आम्ही तुम्हांला द्यायला तयार आहोत.मात्र आमची अट इतकीच की, सध्या आमची आर्थिक परिस्थिती चांगली नाही म्हणून तुम्ही आम्हांला २००० रुपये रोकड द्यावेत !" मी ती अट मंजूर केली ! त्यानंतर मी जयपालकौरला प्रत्यक्ष पाहिली ! मला ती पसंत पडली !

मी सरदार लाभसिंगांना २००० रुपये रोकड दिले. त्यानंतर माझे जयपालकौरशी रीतसर लग्न लागले. लग्नानंतर मी जयपालकौरला घेऊन सात-आठ दिवस दिल्लीला ' हनीमून 'साठी गेलो आणि त्यानंतर तिला रीतसर पंधरा दिवस अंबाल्याला माहेरी पाठवली. दिल्लीहून नंतर मला मद्रासला जावंच लागलं. कारण माझी रजा संपत आली होती ! त्यानंतर जयपालकौर मद्रासला आली आणि पहिल्याच दिवशी रात्री तिने मला ' दिवस गेल्याचे ' सांगितले ! मला रास्त शंका आली. आमच्या लग्नाला फक्त तीन आठवडे झाले होते ! त्यांतले दोन आठवडे ती माहेरी होती. आणि महिना पूर्ण होण्यापूर्वीच जयपालकौर मला सांगत होती की, मला दिवस आहेत म्हणून. तेव्हा कुठे माझ्या डोक्यात प्रकाश पडला की, माझ्यासारख्या लग्न झालेल्या एवढंच नव्हेतर दोन मुलांचा बाप असलेल्या माणसाला आपली मुलगी देण्याची सरदार लाभसिंगांना घाई का होती ते ! मी त्यांना फसवलं नाही साहेब. त्यांनी मला फसवलं ! कारण माझ्याशी लग्न होण्यापूर्वीच जयपालकौरला दिवस होते ! "

...अमरिकसिंगाला कल्पनाही नव्हती की सत्य हे अखेर सत्य ठरते ! त्याने खूप डोके वापरून एका पाठोपाठ एक खोटी विधाने केली. दिवंगत सरदार लाभसिंगांना बदनाम केले. पण सेशन्स कोर्टात हीच सगळी विधाने खोटी ठरली ! फाशीचा दोर अमरिकसिंगाने आपणहून आपल्या गळयाभोवती ओढून



' मी कुठलाही गुन्हा केला नाही साहेब. मी फक्त त्या दिवशी खरं काय घडलं ते सांगणार आहे. '

घेतला ! या स्टेटमेंटमुळे ! मॅजिस्ट्रेट हुशार होता ! त्याच्या एक गोष्ट सहज लक्षात आली की हा हरिश्चंद्राचा अवतार जर दुसरे लग्न करताना कुणालाही फसवू इच्छीत नव्हता, तर त्याच्या लग्नाला त्याची पहिली पत्नी हजर असणारच! मॅजिस्ट्रेटसाहेबांनी हा महत्त्वाचा प्रश्न आरोपीला विचारला,

" अमरिकसिंग, तुझ्या दुसऱ्या लग्नाला तुझी पहिली पत्नी बलजीतकौर मुलाबाळांसह हजर होती ?"

" नाही साहेब ! त्या वेळी ती माहेरी गेली ही. मी तिला बोलावलं, पण ती येऊ शकली नाही. "

मॅजिस्ट्रेटसाहेबांनी हे उत्तरदेखील रेकॉर्ड केले ! म्हणतात ना ? आधी जाते बुद्धी आणि मग जातो पैसा! अमरिकसिंगाच्या बाबतीत ही म्हण बदलावी लागली. आधी जाते बुद्धी आणि मग जातो जीव ! अमरिकसिंगाच्या प्रथमच लक्षात आले की आपले काहीतरी चुकतेय् ! त्याने आपली कपोलकल्पित कहाणी पुढे अचानक बदलली.

( At this stage Amriksingh gave an incredibly base and ignominious turn to his story ! )

तो पुढे सांगू लागला,

" जयपालकौरला लग्नाच्या अगोदरच दिवस होते हे कळल्यावर मी अंबाल्याला याचा जाब विचारण्याकरिता गेलो. माझ्या सासूबाई रामरखी ह्या डोळयांत पाणी आणून पुढे झाल्या. माझ्यापुढे त्यांनी पदर पसरला. म्हणाल्या, ' जावईबापू ! माफ करा आमच्या मुलीला ! तिच्या हातून ते घडलंय खरं ! पण आता आमची अब्रू ती तुमची अब्रू ! मेहेरबानी करा ! पण जयपालकौरचं हे लफडं चार भिंतींच्या बाहेर जाऊ देऊ नका ! ' मीही त्या वेळी विचार करून मन मोठं केलं (!) माझी अडचण मी सासूबाईंना सांगितली. मी म्हटलं, ' सासूबाई ! तुम्ही मला आईच्या ठिकाणी आहात ! (!) बघा ! सध्या माझी पहिली पत्नी बलजीतकौर माहेरी गेल्ये ! दुपारी मी तर ऑफिसला जातो. मधल्या वेळात तुमची मुलगी कुठे शेण खायला जाते, तिच्याकडे कोण येतो हे मला कसं कळणार ? तिच्यावर लक्ष ठेवायचं कुणी ? तेव्हा त्या बाबतीत काय करायचं ते सांगा म्हणजे मग मीदेखील तुमची आज्ञा शिरसावंद्य मानून तुमच्या सांगण्याप्रमाणं तुमच्या मुलीची ही 'भानगड' चार भिंतींबाहेर जाऊ देणार नाही ! पाहा ! विचार करा ! माझ्यासारखा जावई दुसरा कोणी मिळणार नाही !' ( खरोखरच नाही ! ) त्यावर सासूबाई म्हणाल्या की, ' एवढीच जर का तुमची अडचण असेल तर जयपालकौरची धाकटी बहीण हरबीरकौर हिला मी तुमच्याकडे पाठवते. ती जयपालवर लक्ष ठेवील ! ' मी ते मान्य केलं ! त्यानंतर मी, माझी बायको आणि माझी मेव्हणी (!) असे सर्वजण सत्तावीस मे १९४९ ला मद्रासला परत गेलो ! मद्रासला माझी मेव्हणी

हरवीरकौर हीच माझ्या खाण्यापिण्याकडे विशेष लक्ष पुरवीत असे ! पुढे पुढे तर मी ऑफिसला जायला निघालो की, मला टायची नॉट मारून देत असे, तीदेखील माझी मेव्हणी ! एकदा मी माझ्या मेव्हणीला विचारले, 'हरबीरकौर ! तू माझं इतकं का करतेस ?' ती म्हणाली, 'इतके दिवस इथे राहून माझी खात्री पटली आहे की, तुम्ही फार फार चांगले आहात ! आमच्या ताईमुळंच तुम्हांला मनःस्ताप होतो याबद्दल माझी खात्री पटली आहे ! आणि म्हणूनच नकळत माझं तुमच्यावर प्रेम बसलं आहे !" आणि खरं सांगू मॅजिस्ट्रेटसाहेब ! माझी मेहुणी दिसायला फार देखणी आहे ! माझ्या बायकोपेक्षा सुंदर आहे ! तिचं शरीरसौष्ठव प्रमाण-बद्ध आहे. तशातच अशी ही माझी मेहुणी माझी सेवा (!) मनापासून करीत होती ! माझ्या मनात तिच्याबद्दल अगोदरच प्रेम उत्पन्न झाले होते ! तिच्याकडून असा प्रतिसाद मिळाल्याबरोबर आमचे जमले ! त्यानंतर माझ्या मेव्हणीचे आणि माझे संबंध वाढतच गेले. इतके की, 'मी माझ्या मेहुणीबरोबर तिच्या परवानगीने संभोग घेतला !' माझा माझी पत्नी जयपालकौर आणि माझी मेहुणी हरबीरकौर या दोघींशी संबंध होता !

(I enjoyed both the sisters ! and cohabitated with them !)

मॅजिस्ट्रेटसाहेब यात तुम्हांला पाप वाटेल ! पण खरं सांगतो ! की उगाच कुठल्यातरी असहाय्य स्त्रीवर बलात्कार करणारा मनुष्य मी नव्हे ! मी सुशिक्षित आहे ! डबल ग्रॅज्युएट आहे ! B.A. LL.B आहे ! Civil Gazetted officer आहे ! माझ्या मनात त्या वेळी असं आलं, की काय हरकत आहे ? मेहुणी तयार आहे ! आणि आपल्याला ती हवीच आहे ! आपण जबरदस्ती थोडीच करीत आहोत ? शिवाय मॅजिस्ट्रेटसाहेब तुम्हांला ठाऊकच आहे की, आपल्या देशात थोरल्या बहिणीचा नवरा आणि धाकटी मेहुणी यांचे सबंध नेहमीच 'जवळचे' आणि संशयास्पद मानले जातात !

अमरिकसिंग इतक्या तळमळीने आणि सहज बोलत होता की त्याचे स्टेटमेंट रेकॉर्ड करणाऱ्या फर्स्टक्लास मॅजिस्ट्रेटच्या मनातदेखील आपल्या धाकट्या मेहुणी-बद्दल काही गो ऽ ऽ ऽ ड विचार येऊन गेला असेल ! त्यांच्या मनात कदाचित येऊन गेले असेल की, 'हात् ते ऽ री की ! इतका कायदा पढलास ! फर्स्टक्लास मॅजिस्ट्रेट झालास ! पण मेहुणीबद्दलचे हे साधे 'रूलिंग' तुला कळले नाही ? अंमलात आणता आले नाही ? धिःकार ! धिःकार असो तुझा !'

अमरिकसिंग पुढे बोलू लागला, "त्यानंतर माझी पहिली बायको बलजीत-कौरची मला आठवण झाली ! मी जयपालकौर आणि हरबीरकौर या दोघींना सांगितलं की 'तुम्ही दोघी आता अंबाल्याला जा ! मी बलजीतकौरला बोलावून घेतो ! आणि त्यानंतर जयपालकौर तू एकटीच इकडे ये ! माझ्या सांगण्या-प्रमाणे दोघी बहिणी अंबाल्याला परत गेल्या ! आणि चोवीस जुलै १९४९ या

दिवशी माझी पहिली पत्नी बलजीतकौर माझ्याकडे आली ! त्यानंतर एकतीस जुलै १९४९ ला मी माझी दुसरी पत्नी जयपालकौर हिला टेलिग्राम पाठवला की, 'तावडतोब निघून ये !' पण तिचे उत्तर आले नाही ! त्यानंतर सतत पाच दिवस मी दररोज तिला टेलिग्राम पाठवला की, 'तावडतोब निघून ये !' माझ्या तिसऱ्या टेलिग्रामनंतर जयपालकौरचे मला पत्र आले (की जे पत्र अमरिकसिंग कुठल्याच कोर्टापुढे हजर करू शकला नाही !) की, 'माझी मेहुणी हरबीरकौर हिने तिचा आणि माझा काय संबंध होता ते तिच्या आई-वडिलांना सांगितले आहे ! ते तडजोड करायला तयार आहेत ! पण त्यांना आणखी २००० रुपये हवे आहेत ! मला खात्री होती की माझ्या मेहुणीला माझ्यापासून दिवस नाहीत ! म्हणून मी तडजोडीला नकार दिला व जयपालकौरला फक्त साठ रुपये परतीच्या प्रवासखर्चा-साठी पाठवले. त्याप्रमाणे तीस ऑगस्ट १९४९ ला जयपालकौर मद्रासला परत आली. आल्याबरोबर तिने माझ्याबरोबर तिच्या धाकट्या वहिणीशी माझा संबंध होता व त्याबद्दल मी तिच्या वडिलांना २००० रुपये द्यावेत यावरून भांडण सुरू केले व नंतर या भांडणामुळे माझ्यावर रागावून सहा सप्टेंबरला ती घरातून पळाली ! जाताना तिने बलजितकौरचे दागिने आणि कपडे चोरले. मी पोलीस स्टेशनवर त्याप्रमाणे कंप्लेंटदेखील केली होती. मग मी विचार केला की 'जाऊ दे ! पोर अजून लहान आहे ! आपण तिला समजावून सांगू की तुझ्या वहिणीबरोबर माझी जी भानगड झाली तिला मी एकटाच जबाबदार आहे का ? तुझ्या तरण्या-ताठ्या वहिणीची त्यात काहीच चूक नाही ? तिला समजत नव्हतं आपण काय करतोय ते ? तेसुद्धा मोठ्या मेव्हण्याबरोबर ? मग मी एकट्यानेच शिक्षा म्हणून सरदार लाभसिंगांना २००० रुपये का द्यायचे ? तू माझी बायको ना ? मला सम-जून घे ! (!) आणि घरी चल !' त्याप्रमाणे मद्रास गाडी भोपाळला पोचण्या-पूर्वीच मी विमानाने भोपाळला गेलो ! (जयपालकौरला समजावण्यासाठी !) तिला सगळं समजावलं ! तिला ते पटलं ! ती माझ्याबरोबर मद्रासला परत आली ! घरी आल्याबरोबर मला म्हणाली, 'अहो ऽ ! कित्ती कित्ती चांगले आहात तुम्ही. आता मी तुम्हांला कध्धी म्हणून कध्धी सोडून जाणार नाही ! "

अमरिकसिंगाला ठाऊक नव्हते की सगळ्याच गोष्टी नाकबूल करणे अंगाशी येते ! असे करणे म्हणजे घडलेल्या गोष्टींची अप्रत्यक्ष कबुलीच असते !

( The story he narrated was true in part only, the rest was a piece of pure fantasy. )

अमरिकसिंगाचे हे अजब स्टेटमेंट लिहून घेणाऱ्या मॅजिस्ट्रेटची तेव्हाच खात्री पटली की, 'ह्यात काही दम नाही !' सरदार लाभसिंगांच्या कुटुंबाला बदनाम करणे एवढा एकच हेतू आहे !

( The story of this horrible orgy was invented for no other

purpose than to vilify and calumniate his unfortunate wife and her family. The account is so palpably absurd that it has only to be read to be disbelieved ! )

तरीदेखील मॅजिस्ट्रेटसाहेबांना पुढे लिहून घ्यावे लागले. कारण अमरिकसिंग सांगत होता.

" साहेब ! त्यानंतर मी घरात नसताना माझी सासू रामरखी मद्रासला आली आणि तिने जयपालकौरला अंबाल्याला पळवून नेली !

( Abducted her ! )

" माझ्याकडून हरबीरकौरप्रकरणात २००० रुपये उकळण्यासाठी ! त्यानंतर मी रजा घेतली आणि अकरा फेब्रुवारी १९५० ला अंबाल्याला गेलो त्या वेळी माझ्याबरोबर माझा मित्र हरनामसिंग होता. (की जो हरनामसिंग सेशन्स कोर्टात बचावाचा साक्षीदार म्हणून अमरिकसिंग आणू शकला नाही ! ) त्या वेळी माझा सासरा सरदार लाभसिंग आणि त्यांच्या घरातल्या सर्व लोकांनी मला शिव्या दिल्या ! सासरा म्हणाला, ' २००० रुपये आणले असलेत तर पायरी चढा नाही तर चालते व्हा ! ' मी शांतपणे (!) त्या दिवशी परत गेलो ! नंतर पंधरा फेब्रुवारी १९५० ला मी जयपालकौरला नेण्यासाठी आणि जमलं तर सासऱ्याचा माझ्याबद्दलचा गैरसमज दूर करण्यासाठी ( To remove the misunderstandings, if any ! ) त्यांच्याकडे गेलो ! या वेळी मात्र मला शिवीगाळ करून त्यांनी हाकलले नाही. कारण त्यांचा हेतू वेगळाच होता ! माझे सासरे सरदार लाभसिंग यांनी मला ' जरा बसा ' म्हणून सांगितले आणि ते बाहेर पडले ! येताना त्यांनी आपले बरेच नातेवाईक गोळा करून आणले ! मला मारण्यासाठी ! जयपालकौरला बोलावणे पाठवले. ती आली आणि जिन्यात बसली ! मेव्हणीच्या आणि माझ्यात जे काही घडले त्याबद्दल मला पश्चात्ताप झाला होता ! मी जयपालकौरजवळ गेलो आणि तिला म्हटलं, ' जयपाल ! माझ्या मेहुणीबरोबर मी जो व्यवहार केला ती माझी चूक झाली ! पण त्यावरून तुझ्यात नि माझ्यात भांडण कशाला ? खरं सांगतो तू समजतेस तेवढा मी नीच नाही ! घडतं माणसाच्या हातून असं एखाद वेळी ! मला क्षमा कर ! खरं सांग ! मेव्हणीशी माझा संबंध असतानादेखील मी तुला कधी वाईट वागवलं का ? तू उगाच डोक्यात राख घालून इकडे आलीस ! माझ्या कृत्याची जबाबदारी मला समजते. तुझी हरकत नसली तर हरबीरकौरशी लग्न करायला तयार आहे मी ! तू, हरबीरकौर, बलजीतकौर आणि मी (!) असे चौघं मजेत राहू ! पण तुझी जर अशीच इच्छा असली की मी मेव्हणीशी लग्न करू नये, तर नाही करणार ! पण तू परत चल ! कारण हरबीरकौरशी मी काहीही व्यवहार केला असला तरी तुझे गुण विसरलो नाही. माझं खरं खरं प्रेम तुझ्यावरच जयपाल ! खरं प्रेम तुझ्यावर आहे ! ' जयपालकौर

काहीच बोलत नव्हती ! मला वाटलं आता काय करू म्हणजे तिच्या विरहानं तडफडणारं माझं अंतःकरण तिला दिसेल ? (वा: !) मी खिशातून रिव्हॉल्व्हर बाहेर काढलं आणि तिच्यापुढं करीत म्हटलं, 'जयपाल ! बोल ऽ ! एक शब्द तरी बोल गं माझ्याशी ! तू न येण्याचंच ठरवलं असलंस तर खरं सांगतो मी तुझ्याशिवाय जगू शकणार नाही ! त्यापेक्षा घे ऽ पिस्तूल आणि मारून टाक या हतभाग्याला ! ' मॅजिस्ट्रेटसाहेब, मी पिस्तूल बाहेर काढून जयपालकौरशी काही-तरी बोलतोय एवढेच फक्त सरदार लाभसिंगांच्या नातेवाईकांनी पाहिले ! ते माझ्यावर तुटून पडले ! कोणीतरी माझ्या हातातले रिव्हॉल्व्हर हिसकावून घेतले आणि माझ्या चेहऱ्यावर त्याने दोन गोळ्या मारल्या ! मी बेशुद्ध पडलो ! त्या नंतर कोणी कोणाला गोळ्या घातल्या मला माहीत नाही ! सरदार लाभसिंगांना, सरदार अमरनाथना व जयपालकौरला त्या गोंधळात कोणी गोळ्या मारल्या ते मी सांगू शकणार नाही. कारण मी अगोदरच बेशुद्ध पडलो होतो. "

अमरिकसिंगाचे स्टेटमेंट हे असे होते ! त्यातला प्रत्येक शब्द म्हणजे त्याच्या इरसाल आणि बेरक्या स्वभावाची साक्ष होती !

( Every word of this statement makes manifest the essentially base, perfidious and vicious nature of Amriksingh ! )

विशेषतः त्यातले शेवटचे वाक्य म्हणजे त्याने स्वतःच केलेल्या गुन्ह्यांची अप्रत्यक्ष कबुलीच होती ! अमरिकसिंगाचे स्टेटमेंट संपले होते ! अधिक पुरावा गोळा करण्यासाठी पोलिसांनी रिमांड मागून घेतला होता ! तारीख पडली होती ! कडेकोट पोलीस बंदोबस्तात त्याला पोलीस व्हॅनमध्ये चढविण्यात आले आणि......
त्याच्या मागोमाग चालणाऱ्या लोकांच्या घोळक्यात गप्पा सुरू झाल्या ! जीवनाच्या अपवित्र मूल्यांचं अनुभवसिद्ध ज्ञान असलेले लोकच फौजदारी खटल्यात जास्त इंटरेस्ट घेतात ! कोर्टात खटला ऐकायला आलेल्या बहुसंख्य लोकांत कित्येक असे असतात की, आरोपीने केलेला गुन्हा त्यांनीसुद्धा केलेला असतो. फक्त ते सापडलेले नसतात ! त्याना आरोपीबद्दल एकप्रकारची सहानुभूती असते. त्यांच्यापैकी खरोखरच सज्जन जीवन जगणारा एकजण सहज बोलला, " काय लेकाचा थापा मारतो हा अमरिकसिंग ! म्हणे मी मेहुणीबरोबर संभोग घेतला ! आणि तरीदेखील माझं बायकोवर प्रेम आहे ! मेहुणी असं करू देईल ? असं कुठं असतं काय ! "

त्याच्या दोस्ताने त्याच्या पाठीवर थाप मारून सांगितले, " अहो भगवान शंकर ! तुम्ही एक भोळे आहात ! तुला वाटतात तितक्या पोरी सरळ नसतात ! अरे, माझ्या शेजारीच एक मनुष्य आहे. त्याची मेहुणी त्याला लागू आहे ! मी बघतोना सगळं. दोघी बहिणींना घेऊन फिरतो ! दोघींना घेऊन पिक्चर्स बघतो ! दोघींच्या साड्यासुद्धा सारख्या ! एकदा तर मी त्याच्या मेव्हणीलाच 'काय वहिनी ऽ ! ' म्हणून हाक मारली ! आणि तिला ती चालली ! यांत काय ते समज !

—अमरिकसिंगाचे काम झाले होते ! सरदार लाभसिंग आणि त्यांच्या दोन अश्राप पोरी बदनाम झाल्या होत्या ! आणि स्वतःच्या व्यक्तिगत जीवनात थोडी-फार वेडीवाकडी वळणे घेणाऱ्या असंख्य लोकांची सहानुभूती त्याने मिळवली होती ! अशा पामर लोकांना वाटत होते की अमरिकसिंगाचे स्टेटमेंट खरे आहे ! तो सच्चा आहे !

अमरिकसिंग पोलीस कोठडीत येरझारा घालीत होता ! आणि त्याचे दैव त्याला ओरडून सांगत होते की, 'अमरिकसिंग ! भ्रम आहे तुझा ! न्यायमूर्तिपदावर बसणारा माणूस पामर नसतो ! तो फार बुद्धिमान असतो ! आज मॅजिस्ट्रेटपुढे तू जे स्टेटमेंट केलेस ते कुठल्या न्यायमूर्तीला खरे वाटेल ? विचार कर ! विचार कर ! वेळ फार थोडा आहे !

(क्रमशः)


ज्वलंत राष्ट्रवादाच्या भयानक दीप्तीचा ललितभव्य आलेख

नाझी भस्मासुराचा उदयास्त

रा. म. शास्त्री

मूल्य पंचवीस रुपये

'माणूस'मधून प्रसिद्ध झालेल्या
प्रदीर्घ लेखमालेची सुधारित ग्रंथावृत्ती.

राजहंस प्रकाशन
४१९ नारायण पेठ, पुणे २.

# भिंतीच्या वेंबुड्या

सुधाकर राजे

## □ राजकारणात शिरलेले मांजर

बोलण्याचा मक्ता फक्त राजकीय पुढारी, बायका आणि मिठू पोपट यांच्याकडे दिला आहे, अशी आतापर्यंतची सार्वत्रिक समजूत तुर्कस्थानातल्या एका मांजराने खोटी ठरवली असल्याचे परवा वर्तमानपत्रांत वाचले. ही माऊ नुसते " मी येऊ ?" एवढेच विचारीत नाही तर आई, बाबा, ताई, बाहेर जायचंय् इत्यादी शब्ददेखील अगदी स्पष्ट बोलते. कमाल आहे ! थोड्या दिवसांनी ही मनी उंदरांच्या सभेत " संतति-अनियमनाची आवश्यकता " या विषयावर जाहीर भाषणेदेखील करायला लागायची. निदान गोड गोड बोलून व ' उंदीर-मांजर भाई-भाई ' अशा घोषणा करून ती उंदरांना भुरळ पाडण्याचे काम तरी नक्की करील.

या तुर्की मांजराप्रमाणे हिंदुस्थानातले मांजर बोलू लागले तर ते अगदी पहिली गोष्ट करेल ती म्हणजे राजकारणात शिरेल. कारण, इंडिया दॅट इज भारत दॅट इज हिंदुस्थानात राजकारणाचा धंदा करायला जेवढे शब्दांचे भांडवल लागते तेवढे इतर कुठल्याच धंद्यात लागत नाही. शिवाय आपल्या राजकारणात दोन दोन बैल अगदी जोडीने वावरू शकतात तर एखादे मांजर चोरपावलाने शिरायला काय हरकत आहे ? अन् मुंबईत तर वाघोबानेही राजकारणात उडी मारली आहे, तेव्हा त्याच्यावर लक्ष ठेवायला वाघाची मावशी हवीच. आणि एक वेळ राजकारण सोडले तरी एकदा बोलता येऊ लागल्यावर कोणतीही मनी जगातल्या एकूण परिस्थितीवर सडेतोड मतप्रदर्शन केल्याखेरीज राहणार नाही, याबद्दल माझी खात्री आहे. उदाहरणार्थ......काय ब्राई तरी प्रत्येक गोष्टीत भेसळ माजली आहे ! मेल्या बशीभर दुधात अर्धी बशी पाणी ! ते काही नाही. प्रत्येक लबाड दूधवाल्याला चांगला दहा-दहा बशा भरून धारोष्ण दुधाचा दंड केला पाहिजे......परवा छोटू एक इंग्रजी कविता म्हणत होता की, एक मांजरी नशीब काढायला लंडनला गेली. तिथे तिला राणीच्या खुर्चीखाली उंदीर दिसला. पण आपल्याकडे तर कारकुनाच्या खुर्चीखालीदेखील उंदीर दिसायची मारामार. नाही म्हणायला औरंगजेबाच्या काळी एक मांजर शंभर उंदीर खाऊन मक्केच्या यात्रेला गेली म्हणतात. पण औरंगजेबाच्या जमान्यात मुसलमान मांजराची चैन होती यात नवल काय ? उलट आताच्या सेक्युलर दिवसांत एखाद्या हिंदू मांजराला एकादशीचे पारणे फेडायला उंदराचे पिलूदेखील गवसत नाही......अन् तो मोत्या नि त्याचे टोळभैरव मित्र

हल्ली फारच फाजील झाले आहेत– सारखे आपले माझ्या अन् इतर मांजरींच्या मागे लागलेले असतात. चारित्र्य म्हणून कसं ते राहिलंच नाही......

## ☐ फरान्सपर्यंत उडालेली हिंदुस्थानी वावडी

बसल्या बसल्या वावड्या उडविणे हा हिंदुस्थानातल्या मंडळींचा आवडता खेळ आहे. हिंदुस्थानातली वावडी उडत उडत फ्रान्सपर्यंत पोचेल याची कल्पना नव्हती. पण अखिल भारतीय हस्तकला मंडळाच्या अध्यक्ष कमलादेवी चट्टोपाध्याय यांनी नुकतीच माहिती दिली की, हाताने तयार केलेल्या ज्या वस्तू भारतातून परदेशी निर्यात होतात त्यांत पतंगही पाठविले जातात. आपण पॅरीसमध्ये भारतीय पतंग उडताना पाहिल्याचीही त्यांनी ग्वाही दिली. शाब्बास ! "काऽऽऽटी है !" ही संक्रांतीच्या दिवशीची भारतीय रणगर्जना आता पॅरीसच्या आकाशातही घुमणार म्हणायची !

पण पतंग उडविणे हे विमान उडविण्याइतके सोपे नाही, हे फ्रेंच मंडळींनी विसरू नये. विमानात ऑटो–पायलटला जेवढे महत्त्व असते तेवढेच पतंगात 'कन्नी 'ला असते, तेव्हा ती नेमकी कशी बांधली म्हणजे तो चांगला उडतो याचे टेक्निकल नो-हाऊ पॅरीसच्या पोरांजवळ आहे काय-? त्यातून पतंगाला शेपटी असावी की नाही, असल्यास तिकोनी की लांब व लांब असल्यास किती लांबीची असावी या सर्व तांत्रिक समस्या सोडविण्याइतके एरोडायनॅमिक्सचे ज्ञान फ्रेंचांजवळ आहे काय ? अन् पतंग म्हटला की मांजा आलाच. तेव्हा दहातारी मांजा तयार करण्यासाठी लागणारी 'लुब्दी' कशी तयार करायची याचा सीक्रेट फॉर्म्युला भारताने फ्रान्सला देण्याचे कबूल केले आहे काय ? आणि शेवटी म्हणजे दुसऱ्याचा काटलेला पतंग हवेतल्या हवेत आपल्या पतंगात अडकवून खाली उतरविण्याचे अवघड कसब शिकायचे असेल तर फ्रेंच मुलांना ॲडव्हान्स ट्रेनिंगसाठी हिंदुस्थानात आल्याशिवाय गत्यंतर नाही, मात्र त्यांना शिकविण्यासाठी भारतीय तज्ज्ञांची वाण पडणार नाही. आपल्या कुठल्याही गावातल्या कुठल्याही गल्ली–बोळातली पोरं हे काम करू शकतील.

## ☐ पार्लमेंटमधली "कारवारी कडक " चर्चा

एका बंगाली पार्लमेंट-सभासदाने नुकतीच अशी सूचना केली आहे की, पार्लमेंट-मध्ये रसगुल्ले मिळण्याची सोय असावी. कल्पना खरोखरीच गोड आहे. विशेषत:, ही सूचना एका विरोधी पक्षीयाने केली आहे यावरून असे म्हणायला हरकत नाही की, पार्लमेंटच्याबाहेर विरोध प्रकट करताना होणारा अंडी फेकण्याचा प्रकार यापुढे निदान पार्लमेंटच्या आत गोड स्वरूपात पाहायला मिळेल; किंवा रसगुल्ल्याने रसवंतीला गोडवा आला तर पार्लमेंटमधल्या चर्चेतली कटुता बरीचशी निघून जाण्याचाही संभव आहे ! पण सारखे गोड खाऊनही तोंडाला मिठी बसते, तेव्हा चर्चेला तिखट-मिठाची लज्जत आणण्यासाठी चौपाटीची भेळ किंवा एखाद्या

क्षुधाशांतिगृहातली भजी मुद्दाम मागविण्यात यावीत अशी मागणी एखाद्या महाराष्ट्रीय सभासदाने करणे रास्तच होईल.

इतकेच नव्हे तर पार्लमेंटमध्ये कशी चर्चा होणार आहे, हे तेथल्या कॅंटीनमधला "आजचा पदार्थ" पाहून सांगणेदेखील अशक्य नाही. उदाहरणार्थ, सोलापुरी चिवडा असेल त्या दिवशी चर्चा खमंग होणार हे नक्की. उलट गुलाबजाम असतील त्या दिवशी गुलगुलीत गोड शब्दांची खैरात होणार. तुपात बुडविलेली सुरती घारी असेल तेव्हा वातावरणात भरपूर स्निग्धता असणार. उलट "कारवारी कडक" बुंदीचे लाडू असतील तेव्हा खडाजंगी उडणार असे खुशाल समजावे. श्रीखंड असले तर वादविवाद मराठी माणसासारखा थोडा आंबट, थोडा गोड होणार, उलट, कुरकुरीत डोसा असला तर चुरचुरीत प्रश्नोत्तरांची फैर झडणार. पण पार्लमेंटमध्ये होणाऱ्या वाद-विवादातून फलनिष्पत्ती व्हायला नेहमीच वेळ लागतो. ती ताबडतोब होण्याचा एक मार्ग आहे —इन्स्टंट कॉफी !

## ☐ सौंदर्यावर जकात

सिलोनच्या एका मंत्र्याने अशी अफलातून कल्पना काढली आहे की, गरीब शेतकऱ्यांची परिस्थिती सुधारण्यास लागणारा पैसा उभारण्यासाठी स्त्रियांच्या सौंदर्यावर कर बसवावा—अन् तो किती द्यायचा हे त्या स्त्रियांनाच ठरवायला सांगावे. आता सौंदर्यावर कर बसविण्याची योजना सुंदर असली तरी सौंदर्याची सरकारी व्याख्या ठरविल्याखेरीज या कराचे मोजमाप कसे होऊ शकेल ? त्यासाठी स्वतःला सुंदर समजणाऱ्या स्त्रियांची—म्हणजेच सर्व स्त्रियांची—एक समिती नेमून नैसर्गिक सौंदर्यात किती टक्के लिप्स्टिक व किती टक्के रूजची भेसळ चालू शकेल याचे तपशीलवार कोष्टक तयार करण्याचे काम या समितीकडे सोपवावे लागेल. शिवाय टॅक्स-फ्री कुरूपतेच्या मर्यादाही प्रस्तुत समितीला स्पष्टपणे घालून द्याव्या लागतील.

मात्र कोणत्याही स्त्रीने स्वतःच्या सौंदर्यावरील कराचा हिशेब लावताना नवऱ्याला "खरं सांगा गडे, कशी दिसते मी ?" असे विचारायची कायद्यानेच बंदी असावी ; कारण बायकोच्या सौंदर्याचे खरेखुरे मूल्यमापन तिच्या तोंडावर करण्याची हिंमत बाळगणारा नवरा आजपर्यंत झाला नाही व पुढे होणार नाही. शेवटी एक धोक्याची सूचना : कोणत्याही स्त्रीने दुसऱ्या स्त्रीच्या सौन्दर्याचा हिशेब लावू नये.—नाहीतर कर म्हणून एक दिडकीही वसूल व्हायची नाही.

सहासष्ट वर्षांच्या या अविवाहित मंत्रिमहाशयांची आणखी एक गंमत म्हणजे त्यांनी एका वधू-वरसूचक-मंडळाकडे "आदर्श" पत्नीसाठी अर्ज केला आहे ! आता बोला ! सुखासमाधानाने मंत्र्याचे जीवन कंठणाऱ्या या इसमाने नवऱ्याचे जिणे जगण्याची तयारी दर्शवावी म्हणज केवढे दु:साहस, नाही का ? शिवाय आदर्श पत्नी नक्की कशी असते, याची या अविवाहित मंत्र्याला कल्पना आहे काय?

त्याने शे-दोनशे विवाहित मित्रांना " तुमची पत्नी आदर्श आहे का ?" असा प्रश्न केला असेल तर एकाही मित्राची नकारार्थी उत्तर देण्याची छाती झाली नसेल हे आपण अनुभवाने सांगतो. म्हणजे प्रस्तुत मंत्रिमहाशयांसमोर शेकड्याने आदर्श उभे राहणार. तात्पर्य काय, आदर्श पत्नीचा शोध व्यर्थ आहे, कारण पत्नी ही आदर्शच असते.

## ☐ वृत्त-व्यवसायातले बैल

अमेरिकेतल्या एका विश्वविद्यालयाच्या शास्त्रज्ञांनी वर्तमानपत्राच्या रद्दीपासून एक नवीन वैरण तयार केली आहे, व ही वैरण खाणारी गुरे बरीच घष्टपुष्ट झाल्याचे त्यांना दिसून आले आहे. आता वर्तमानपत्रांचे अनेक सदुपयोग आहेत—दादर ते चर्चगेट या दैनंदिन प्रवासात निर्विकल्प समाधी लावण्यास मदत करण्यापासून नको असलेल्या माणसापासून लपण्यापर्यंत—हे मला ठाऊक होते, पण एक दिवस असा उजाडेल की उपसंपादक व बैल हे दोघेही वर्तमानपत्रावर उपजीविका करतील हे आपल्यादेखील बेटे लक्षात आले नव्हते. खरे म्हणजे वृत्त-व्यवसायात या ना त्या स्वरूपात अनेक बैलोबा वावरत असतात. तेव्हा त्यांच्यांत खऱ्याखुऱ्या परघाऱ्या-राजाच्या जोडीची भर पडली तर ते एका अर्थी योग्यच आहे. शिवाय डुलक्या घेणारा उपसंपादक आणि निश्चलपणे रवंथ करणारी म्हैस हे दोघेही सारख्याच ज्ञान-साधनेत मग्न झाल्यासारखे नाही का वाटत ?

परंतु वृत्त-व्यवसायाचा घाणा ओढणारे बैल ताज्या बातम्या व शिळ्या मल्लीनाथीवर पोसलेले असले तरी खऱ्या गुरांना संपादकीय वैरण पचेल की नाही याचा अधिक कसोशीने तपास व्हायला पाहिजे असे मला वाटते. कारण कोठलाही स्वाभिमानी अमेरिकन बैल रशियन सरकारी वर्तमानपत्र 'प्रावदा'ची वैरण खाऊन घष्टपुष्ट व्हायलाच काय पण जगायलाही तयार होईल असे मला वाटत नाही. त्याचप्रमाणे आपल्याकडे काँग्रेसच्या बैलजोडीपैकी एकही बैल साम्यवादी ते स्वतंत्र यापैकी एकाही विरोधी पक्षाच्या वर्तमानपत्रावर आपली गुजराण करायला तयार होणार नाही. खरी गोष्ट म्हणजे हिंदुस्थानातील गरीब गाईला जहाल साम्यवादी वैरण खायला घातली तर ती कितीशी गरीब राहील ? शेळपटपणा हा शेळीचा गुणधर्म खरा पण एखाद्या जळजळीत संपादकीयावर पोट भरल्यावर ती हा आपला भारतीय गुण कितपत टिकवू शकेल ? गुरांचे काही असो, माणसांच्या अंगातली माणुसकी वाढवायचा एक सोपा मार्ग मात्र आता उपलब्ध झाला आहे 'माणूस'च्या रद्दीचा खुराक. ○

# तुमचे भविष्य आमचा अंदाज

श्री. गो. जोशी
सायनाचार्य

दि. ११ ते १७ जानेवारी १९६९ चे राशि भविष्य

**मेष** : शनी-मंगळांची सहानुभूती आपणांस लाभत नाही हे मान्य. पण सूर्यशुक्रादी अनेक ग्रह आपले सारे सामर्थ्य तुमच्यासाठी खर्ची घालायला उद्युक्त झालेले आहेत, याचा निसर पडू देऊ नका. थोडीफार दगदग होईल, पण अंगीकृत कार्यात असे यश मिळेल की, आजवर कधीही न मिळाल्याप्रमाणे.

या आठवड्यात तुमच्या कार्यक्षेत्रात तुम्हांला प्रतिष्ठेचे स्थान लाभेल. जगासमोर येण्याचा मोका लाभेल, नोकरी-धंद्यात विशेष प्रगती घडून येऊ लागेल. या वेळी पैसा माफक मिळेल, पण प्रतिष्ठा अमाप लाभेल.

राजकीय क्षेत्रातही तुमच्या उपस्थितीची नितांत गरज भासू लागेल.

दि. १५ ते १७ हा विशेष अनुकूल काल.

**वृषभ** : गुरू पंचमात आणि सूर्य-बुध भाग्यात. इतकी सर्वोत्तम ग्रहस्थिती कित्येक दिवसांनी आपण अनुभवीत आहात. लौकिक, मानमान्यता, यश आणि पैसा सर्व काही मिळेल या वेळी. दूरचा प्रवास घडेल आणि या प्रवासामुळे आपले यश दुणावेल. राजकीय-सामाजिक क्षेत्रात आवाज उठविता येईल.

नोकरीधंद्यातील हुकलेली संधी पुन्हा लाभावी, स्थावराचा प्रश्न सोडविण्यात यश मिळावे. मंगलकार्यातही यश मिळावे.

तात्पर्य, हे दिवस अपेक्षेबाहेर अनुकूल आहेत. थोडासा जरी प्रयत्न केलात तरी ते अपेक्षेबाहेर यशस्वी ठरावेत.

दि. १४–१५–१७ या कालाचे महत्त्व विशेष जाणवेल.

**मिथुन :** मंगळाची अनिष्टता ओसरली, पण सूर्य-बुधांची प्रतिकूलता सुरू झाली; धावपळ, धडपड काही तुमच्या नशिबाची चुकत नाही. काही दिवस सहन करण्यावाचून गत्यंतर नाही. शुक्र भाग्यात आहे तेवढेच एक आशास्थान.

तो तुमच्या कला-साहित्यिक प्रवृत्तीला उत्थान देईल. प्रतिकूल कालातही आपण आवाज उठवू शकाल. मंगलकार्यासाठी प्रवास घडेल, थोरांचे सहकार्य लाभेल. सांपत्तिक योगही थोडेफार सुधारू लागतील.

सुंदर, आकर्षक, मोहक वस्तू खरेदी केल्या जातील.

दि. १५ ते १७ या कालाची नोंद ठेवा.

**कर्क :** दि. १४ जानेवारीला मकरसंक्रमण घडताच चौथ्या मंगळाच्या कारवायांना पायबंद बसेल आणि सूर्य-गुरू त्रिकोण घडेल तेव्हा तर आपण आपला सारा अनिष्ट काल विसरून जाल.

आपण प्रगतीकडे वाटचाल करू लागला आहात पण फारच मंदगतीने. अधोगती नाही हे काय कमी आहे? व्यावसायिक वातावरण निवळण्याची लक्षणे दिसू लागतील. सांपत्तिक पेचप्रसंग सुटण्याची शक्यता वाटू लागेल आणि लौकरच अनारोग्यही मिळेल.

आगामी ८–१५ दिवसांतच नव्या योजना आखू लागाल. त्या योजना यशस्वी व्हाव्यात म्हणून अनेकांची अभिवचनेही मिळू लागतील.

दि. १५ ते १७ अपेक्षेप्रमाणे अनेक गोष्टी घडाव्यात.

**सिंह :** सिंहराशी व्यक्तींचा विधिलेख मंगळच लिहीत असतो असे म्हणणे अतिशयोक्तीचे ठरू नये. तो मंगळ तुमच्या पराक्रमस्थानी आल्यापासून प्रगतीकडे तुमची पावले वेगाने पडू लागतील. आता तुमचा मार्ग कोणीही रोखू शकणार नाही. तुमच्यातील सुप्त कर्तृत्वाचे दर्शन येथूनच घडायला लागेल.

यांत्रिक व्यवहारात, नोकरीधंद्यात काही लोकविलक्षण करून दाखविण्याची तुमची इच्छा आताच आकार घेऊ लागेल.

स्थावराचा-वाहनाचा प्रश्न सुटेल. नव्या योजना यशस्वी ठरू लागतील.

दि. १२–१५–१७ या कालावर लक्ष केंद्रित करा.

**कन्या :** मंगळ तुमच्या राशीतून पूर्वीच पसार झालेला आहे. आता या आठवड्यात सूर्याचे पंचमात आगमन घडताच आपल्या मागच्या अनेक विवंचना मिटायला लागतील.

कौटुंबिक विरोधाची धार बोथट बनेल, व्यावसायिक पेचप्रसंग सुटू लागतील. केलेले प्रयत्न कारणी लागतील, विरोधी वातावरण बऱ्याच प्रमाणात निवळेल.

हे दिवस संपूर्ण सुखासमाधानाचे नसले तरी आपल्या व्यावसायिक क्षेत्रात अपयश

देणारे खास नाहीत. नजीकच्या भविष्यात ज्या उत्क्रांतीपूर्ण घटना घडून येणार आहेत त्यांचा प्रारंभ याच काली घडून यावा.

दि. १५ ते १७ या काली अनेक अनुकूल घटना घडून याव्यात.

**तूळ :** अजुनीही दि. १४ जानेवारीपर्यंत सूर्य पराक्रमस्थानी आहे. तो आपणांस अनेक कामांत हार्दिक सहकार्य करील. मंगळ आता फारसा बाधणार नाही.

गुरूची सहानुभूती लाभणार नसल्यामुळे अपेक्षेप्रमाणे लाभ उठवता येणार नाहीच पण पूर्वीप्रमाणे सतत माघार घ्यावी लागणार नाही हे काय कमी आहे ? अनेकांचे साहाय्य आणखी काही काल घ्यावे लागणार आहे. आणि ते मिळेलही !

पंचमातील शुक्र कलात्मक प्रवृत्तींना उत्थान देईल. चित्रपट क्षेत्रांतील व्यक्तींना तर हा एक सर्वोत्तम प्रगतीचा काल जाणवेल.

दि. १२–१६–१७ या वेळी आपल्या योजना आकार घेऊ लागतील.

**वृश्चिक :** व्यावसायिक प्रगती व सांपत्तिक सुस्थिती लाभत असूनही स्वास्थ्य हरवल्यासारखे सतत जाणवायला लागेल. बारावा मंगळ असेपर्यंत थोडेफार हे असेच अनुभवावे लागेल. हितशत्रूंची कारस्थाने वाढू लागतील, मधून मधून अनारोग्याचे प्रकारही सहन करावे लागतील.

एकच एक समाधान गुरू अकरावा आहे हेच. तो प्रतिष्ठेला धक्का लागू देणार नाही.

जबाबदाऱ्या खूप वाढू लागतील, राजकीय कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अविश्रांत परिश्रम करावे लागतील. आगामी कालात प्रवासाचे योग वरचेवर येतील.

दि. १५ ते १७ या कालात आशादायक वातावरण निर्माण होईल.

**धनू :** अनेक ग्रहांची साथ मिळू लागल्यामुळे शनीची अनिष्टता आपणांस बाधू शकणार नाही. एकटा एकादशस्थ मंगळही तुमचे जीवन उत्साही व यशस्वी करयला समर्थ आहे. दशमातील गुरूही तुमचे महत्त्व वाढविण्याचा प्रयत्न करील.

नजीकच्या भविष्यकालात आपणांस फार मोठ्या कामास हात घालावा लागेल आणि ते यशस्वी करून दाखवालही. पण खूपच धावपळ–धडपड करावी लागणार आहे.

प्रवासाचे बेत ठरू लागतील, नव्या व्यवसायक्षेत्रांशी संबंध जुळून यावा. सांपत्तिक लाभही थोड्याफार प्रमाणांत पदरी पडू लागतील.

दि. ११ ते १४ हा काल अनुकूल जाणवेल.

**मकर :** तुमच्या अनिर्बंध प्रगतीची घोडदौड सुरूच आहे–पुढेही सुरू राहील. यापुढे दशमस्थ मंगळाचीही साथ आपणांस मिळत राहील.

व्यावसायिक साहस करायला आता मुळीच कचरू नका. जीवनात जे काही करता येणे शक्य आहे ते याच वेळी ! ही वेळ वाया घालवू नका. मंगलकार्याचे

ठरेल, नव्या व्यवसायक्षेत्रात पाऊल पडेल. कला–काव्यशास्त्र या क्षेत्रांशी आपला घनिष्ट संबंध असेल तर त्या बाबतीतही आपल्या हातून नेत्रदीपक कार्य घडावे.

दि. १४ ते १७ संस्मरणीय प्रगतीचा काल.

**कुंभ** : भाग्यस्थ मंगळामुळे तुमच्यात आत्मविश्वास निर्माण झाला आणि ती शक्तीच तुम्हांला प्रगतीकडे नेण्यास कारणीभूत ठरेल. यांत्रिक-वैज्ञानिक क्षेत्रांत अनन्यसाधारण अश मिळविणे आता सहजशक्य असल्याचा आपणांस प्रत्यय यावा.


उद्योगधंद्याचे नवे तंत्र आत्मसात कराल. त्या आपल्या व्यवसायास सहाय्य मिळेल. जवळपासचे प्रवास सतत घडतील, व्यवसाय क्षेत्रातील उच्च स्थान आता आपणांस सहज मिळू शकेल.

दि. १३ ते १५ अनुकूल काल.

**मीन** : दि. १४ जानेवारीला सूर्याचे राशीसंक्रमण घडताच तुमच्याही आचार-विचारांत उत्क्रांती घडून येईल अशी आशा करायला जागा आहे. शनी–मंगळांचा हृदयपालट झाल्यासारखा जाणवेल. साडेसाती आता ओसरल्यासारखीच आहे. तुमच्या दैवाची सूत्रे आता गुरूच्या हाती आलेली असल्यामुळे निर्धारनिष्ठेचे व्रत आचरलेत तर अपयशाची यत्किंचितही धास्ती बाळगण्याचे कारण नाही.

भागीदारीचे व्यवहार सुधारू लागतील, अपेक्षित लाभ पदरी पाडून घेता येईल, नोकरीधंद्यासाठी केलेले प्रयत्न यशस्वी ठरायला लागतील.

दि. १४ ते १७ या कालावर लक्ष केंद्रित करा. ○


● रु. १२ पाठवून लिट्क्विझ वीक्लीचे ५० अंक मिळवा

**ॲन्युअल सब्स्क्रायबर्स ' क्वीझ '** मध्ये भाग घ्या.

# चित्रपट

'गौरव चित्र ' या संस्थेचा नवीन मराठी चित्रपट 'घरची राणी ' हा सर्वसाधारण मराठी चित्रपटांपेक्षा अनेक दृष्टींनी–विशेषत: निर्मितीमूल्याच्या व तांत्रिक यशाच्या दृष्टीने--सरस वाटला.

भालजी पेंढारकर यांच्या लेखणीतून उतरलेली ही कथा राज दत्त या तरुण उत्साही दिग्दर्शकाने पडद्यावर आणली आहे.

गोव्यात जाऊन खाणमालक झालेले राजमाने मूळचे सरनोबतवाडीचे. बाळासाहेब सरनोबतांच्या वडिलांनी केलेल्या साहाय्याची त्यांना जाणीव आहे. जयवन्ती ही राजमान्यांची एकुलती एक कन्या. आपल्या या कन्येने सरनोबतांच्या घरात सून म्हणून प्रवेश करावा, अशी राजमाने यांची इच्छा. सुधीर हा राजमाने यांच्या

## घरची राणी

खाणीचा मॅनेजर. (कथेतील त्याचे स्थान सुज्ञ प्रेक्षकांना सांगावयास नकोच.) जयवंतीबरोबर त्याची मैत्री आहे. आपले प्रेमही त्याने तिच्याजवळ बोलून दाखवले आहे. पण वाडीला जाऊन बाळासाहेबांच्या दिलदार स्वभावाचा परिचय झालेली जयू त्यांच्या मर्यादशील वागणुकीने त्यांच्याकडे आकर्षित झाली आहे. बाळासाहेब आणि जयू यांच्या विवाहाला सर्वतोपरी अनुकूलता असल्याने सुधीरने निर्माण केलेल्या अडथळयांचा परिणाम न होता दोघे विवाहबद्ध होतात. आशा-आकांक्षांवर पाणी पडल्याच्या सूडाने संतप्त झालेला सुधीर आपल्या फोटोग्राफर मित्राच्या साहाय्याने जयू आणि बाळासाहेब यांचा सुखी संसार उद्ध्वस्त करण्याचा प्रयत्न

करतो. (नेहमीप्रमाणे त्याचा प्रयत्न असफल होतो.), पेल्यातील वादळ विरून जाते आणि सुखी संसाराची अधिक सुखाकडे वाटचाल चालू राहते.

भालजी पेंढारकर यांच्या लेखणीतून उतरलेली कथा त्यांच्याच परंपरेत बसणारी आहे. विशेषत: कथेचा संघर्षबिंदू फार कमकुवत आहे. कथेतील दोष पटकथेतही कायम असले तरी भालजींच्या संवादांमध्ये मात्र चमक आहे.

दुबळ्या कथेवर खरी मेहनत घेतली आहे ती दिग्दर्शक राज दत्त, त्यांचे तरुण कलाकार आणि छायाचित्रकार दत्ता गोर्ले यांनी. 'बाह्य-चित्रीकरण' मराठी चित्रपटाला परवडणारे नाही. त्या दृष्टीने या मंडळींनी गोव्यापर्यन्त मारलेली उडी अभिमानास्पद आहे. दत्ता गोर्ले यांच्या सुंदर छायाचित्रणाने गोव्याच्या बाह्य-चित्रीकरणाचे सोने झाले आहे. निसर्गसौंदर्याने मोहरलेल्या गोव्याची काही दृश्ये त्यांनी अप्रतिम रीतीने टिपली आहेत. काही वेळा तर आपण हिन्दी चित्रपट तर पाहत नाही ना, असा भास होतो. राजा परांजपे यांनी जवळजवळ निवृत्ती स्वीकारल्याने काहीसे स्वस्थ असणारे गोर्ले, परांजपे यांच्याच साहाय्यकाबरोबर नवीन तडफेने काम करताना पाहून समाधान वाटते.

राज दत्त हेही तसे नवेच. परंतु भूमिकांसाठी त्यांनी निवडलेले नवीन चेहरे त्यांच्या आत्मविश्वासाची चुणूक दाखवतात. अनुपमा (जयू), सुधीरकुमार (बाळा-साहेब) व पद्माकर गोवईकर (सुधीर) या तिन्ही कलावंतांनी मन लावून काम केले आहे. तरी प्रभाव पडतो तो अनुपमाचा. कॅमेऱ्यासमोरील तिचा मनमोकळा अभिनय तिच्या उज्ज्वल भवितव्याची ग्वाही देतो. सुलोचनाबाईंनी आईसाहेबांची भूमिका मन लावून केली आहे.

दिग्दर्शक या नात्याने राज दत्त यांनी बाळासाहेब व आईसाहेब यांच्यामधील भांडणाचा प्रसंग, तसेच बाळासाहेब व जयू यांच्या पुनर्मीलनाचा प्रसंग त्यातील नात्याला योग्य तऱ्हेने उठाव येईल अशा तऱ्हेने चित्रीत केले आहेत. सुधीर व फोटोग्राफर यांच्यामध्ये कटाचे कपटी कारस्थान शिजले जात असताना पार्श्वभूमी-वर चाललेल्या 'बोअरिंग साउंड'चा वापर त्यांनी कलात्मक पद्धतीने केला आहे.


लताबाईंच्या गोड गळ्यातून उतरलेल्या चारही गीतांना डावजेकरांनी उत्तम चाली दिल्या आहेत. तरीही

**संसार हा सुखाचा मी अमृतात न्हाते ।**
**माझ्या मनात कोणी अंगाई गीत गाते ।।**

हे गीत विशेष लक्षात राहते.

मराठी चित्रपटाला प्रेक्षक मिळत नाही, अशी सध्या ओरड आहे. असलेला प्रेक्षक मराठी चित्रपटांनी आपल्या करणीने घालविला ही वस्तुस्थिती असली तरी प्रामाणिक हेतूने बनवलेल्या मराठी चित्रपटांना आपण आपुलकीच्या भावनेने (पैसेवसुलीच्या भावनेने नव्हे !) उपस्थिती लावली पाहिजे, असे हा चित्रपट पाहिल्यावर वाटते.

**–'माणूस' प्रतिनिधी**




# पहिल्या डाकेने जाण्यासाठी पत्रे पेटीत लवकर टाका

कामाच्या शेवटच्या तासात, सध्याकाळीच जास्त पत्रे टपाल पेटयांत टाकली जातात ही टपाल कचेऱ्यांपुढील एक मोठी समस्या आहे. त्यामुळे डाकेची गर्दी होते व विलंबही संभवतो.

टपालात पत्रे लवकर टाकल्याने ती त्याच दिवशीच्या डाकेने रवाना होण्याची खात्री असते. तसे केल्याने इष्ट स्थळी ती *उशीर न होता* पोहचतात.

**पत्रे आताच टाका; संध्याकाळपर्यंत कशाला थांबता ?**

**भारतीय टपाल व तार खाते**




## कुलजित पॉलचे साचेबंद चित्र

# वासना

ज्या चित्राबद्दल रसिकांत बऱ्याच मोठ्या अपेक्षा होत्या, ज्याच्याबद्दल बरेच दिवस चर्चा चालू होती असे कुलजीत पॉल यांचे ' वासना ' हे चित्र नुकतेच मुंबईत प्रसिद्ध झाले. थोडक्यात म्हणजे एक बडे चित्र म्हणून त्याबद्दल खूप आकांक्षा होत्या पण ? पण काय, ' बडा घर अन् पोकळ वासा ' अशीच काहीशी स्थिती ! गल्ल्यावर नजर ठेवून एका चांगल्या, दमदार विषयाचा नाश केला हे दुःख फार मोठे आहे.

गल्लाभरू चित्र काढणाऱ्या कुणाही इतर निर्मात्यांपेक्षा कुलजीत पॉल हे चित्र वेगळ्या तऱ्हेने, आकर्षक पद्धतीने काढतील असे वाटले होते; कारण पॉल यांनी इंजिनियरिंगचे शिक्षण घ्यायचे सोडून ब्रिटनमध्ये जाऊन मुद्दाम सिनेमाफोटोग्राफीचे शिक्षण घेतले आहे. साहजिकच हे शिक्षण, हा अभ्यास या गोष्टींचे प्रतिबिंब वासना मध्ये दिसेल असे वाटले होते. पण कुलजीत पॉल यांना मूळ कथा सोडून आचरट विनोद, अनाठायी नाच घालण्याचा मोह काही सुटला नाही.

चित्राची कथा तशी नवी नाही. एका दारूच्या व्यवसानाच्या आहारी गेलेल्या माणसाची ! कैलाश हा लक्षाधीश माणूस. एकाएकी कफल्लक बनतो. हा धक्का त्याला इतका जबरदस्त असतो की, बायको-मुलांना वाऱ्यावर सोडून देऊन त्यांच्यापासून तोंड लपवून राहू लागतो. या काळात त्याला पूर्वी असणारे दारूचे व्यसन अधिक वळावते. इतके की ते त्याच्या नाशाला कारण ठरते. बस्स ! दारू पिणे किती घातक आहे हे सांगणारे हे चित्र ! विषय तसा नवीन मुळीच नाही. जुनाच, गडकऱ्यांच्या ' एकच प्याला 'तही अगदी हेच नाही का सांगितले ? ते तसेच जरा वेगळ्या वळणाने इथे मांडले आहे एवढेच ! पण गंमत अशी ' एकचप्याल्या 'तली सुधाकरची ट्रॅजेडी अंगावर शहारे आणणारी, हृदयाला पीळ पाडणारी आणि डोळ्यांत आसवे आणणारी झाली आहे तर इथे तशाच एका उमद्या, कर्तबगार माणसाचा नाश दाखवूनही त्याचा मनावर फारसा परिणामच होत नाही. का म्हणून विचारा ? उत्तर अगदी स्पष्ट आहे. गडकऱ्यांनी त्याच एक विषयावर लक्ष केंद्रीत केले होते तर इथे निर्माते पॉल यांनी या कथेत उपकथानके, बाष्कळ-आचरट विनोद घालून विषयाची तीव्रता कमी केली आहे. गल्लाभरू सामान्य प्रेक्षकांना ते सारे ठीक असले तरी काही नवे पाहायला आसुसलेल्या प्रेक्षकांना त्यातून नवीन काही मिळत नाही.

कैलाश आणि त्याची पत्नी वयाने मोठे आहेत, एक मुलाचे आईवडील आहेत. त्यामुळे नायक नायिकेचे प्रेम, ती बागेतली धावाधाव, बोटीतले प्रेम कसे दाखविणार ? पण त्याचीही तरतूद आहे. कैलाशची धाकटी बहीण गीता आणि नवीन पदवी घतलेला डॉ. शेखर यांचे प्रेम, ती धावाधाव पळापळ घालून प्रेक्षकांची सोय केलीय, काही मर्यादेपर्यंत ह्या दोन्हीही पात्रांचे प्रणयचाळे खपले असते पण पुढे पुढे मूळ विषय सोडून जेव्हा दोघांचे प्रेम ऊतू जाताना दाखविले आहे ना ? ते पाहून संताप येतो. बरं विनोद ? तोही आहे. डॉक्टर आला की कंपाऊंडर आलाच. हा कंपाऊंडर आचरट दाखवला, त्याचे एखाद्या गुलजार तरुणीवर प्रेम दाखविले की झाले काम ! ह्या बाबतीतही निर्माते पटकथाकार यांनी बॅलन्स राखलेले नाही. अनेक रिळे या अचरट, फालतू विनोदासाठी खर्च केली आहेत. दारू आली म्हणजे बाई आलीच. तिची नृत्ये आलीच, तेही आहे. त्यालाही काही रिळे आहेत. तुम्ही विचाराल, हे जर सगळे भरपूर आहे तर मग मुख्य कथा ती कधी ? उत्तर स्पष्ट आहे यातून जेवढी फिल्म राहिली तेवढ्यात मुख्य कथावस्तू रेखाटली आहे. हे सारे चित्रपट निर्मितीचे खास शिक्षण घेतलेल्या निर्मात्याने द्यावे यापरते दुर्दैव ते कोणते ?

कथा आणि पटकथा गुलशननंदा या प्रसिद्ध लेखकाची ! हा मालमसाला नंदा यांना जबरदस्तीने चित्रपटात कोंबायला लावला आहे हे वारंवार जाणवते. कारण जेव्हा कथा मुख्य विषयावर येते तेव्हा काही थोडे समाधान लाभते, इतर वेळी सारा आनंद ! संवाद–लेखक इंद्रराज आनंद यांचेही असेच. कैलाशच्या तोंडी, त्याच्या पत्नीच्या तोंडी असलेले संवाद वहाव्वाची दाद द्यावी असे होते, हे जरी असले तरी इतर वेळी आनंद यांचेच हे संवाद का ? असा भ्रम पडतो. यातच सारे कळून येईल.

निर्माते पॉल हे या दोषाला कारण तर आहेतच पण त्यांच्याइतकेच दिग्दर्शक टी. प्रकाशराव जबाबदार आहेत. राव हे एक ख्यातनाम दिग्दर्शक. पण सरळसोट, धोपटमार्गाने चित्र घेण्यापलीकडे त्यांनी काहीही केलेले नाही. काही वेळा तर टी. प्रकाशरावांनी केलेला विनोद पाहून हसू येते. कैलाश धंद्यात बुडतो व त्याच्या बायकामुलांना घराबाहेर निष्कांचन स्थितीत पडावे लागते असे दाखविले आहे. इतका करोडोपती माणूस एका दणक्यात फकीर होईल हे आधी संभवत नाही. तो एक विनोद आहेच, ते असो ! पण नंतर कैलाशची पत्नी, बहीण, शालू उंची पातळे नेसून वावरताना पाहून हसावे का रडावे कळत नाही. गीता शेखरबरोबर प्रेमाचे चाळे करायला जातांना जो ड्रेस घालते तो निष्कांचन माणसांना परवडेल का ? त्यांनी येताना बरोबर पूर्वीचे कपडे आणले म्हणावेत तर ते घालताना त्यांना त्या वेळी लाज कशी वाटली नाही, असा प्रश्न पडतो. इतर अनेक अशाच चुका आहेत. त्याबद्दल काय बोलावे ? बोलून चालून मद्रासी दिग्दर्शक, तो प्रेक्षकांच्या मनाला

न पटणाऱ्या गोष्टी चित्रपटात कोंबणारच !! त्यांना ती सवयच असते त्याला काय करणार ?

चित्राची तांत्रिक बाजू मात्र लाजबाब, अप्रतीत आहे. भव्य, आलिशान सेटिंग्ज, नयनरम्य, आल्हादकारी रंगसंगती, कॅमेराचे कौशल्य या बाबतीत चित्राची प्रगती खरोखरच दर्जेदारच आहे. जी. एल. जाधव यांचे सेटिंग्ज, आणि मदन सिन्हा यांचे छायाचित्रण ही दोन विशेष अंगे ! विविध अँगलसमधून प्रसंग टिपण्याची किमया वाखणणी करावी तेवढी थोडीच !

संगीतकार चित्रगुप्त यांचा कल्पनाविलास फारा दिवसांनी ऐकायला मिळाला. साथीच्या वाद्यांचा कर्णकर्कशपणा सोडला तर चाली मोठ्या मधुर, आणि दीर्घकाळ स्मरणात राहतील अशा आहेत.

आता अभिनय! या बाबतीत राजकुमार चित्रपटाचा सम्राट ठरला आहे. त्याच्या वाट्याला कैलाशची दमदार भूमिका आलेली. ती त्याने आपल्या समजदार, सहज अभिनयाने, बोलण्याने अविस्मरणीय अशीच केली आहे. व्यसनी माणसाची व्यसनासक्तता, त्याची असहाय्यता, धंद्यात खोट बसल्याने मनावर होणारा आघात, त्याच्या मनाचा सरळपणा, दारू पिणे वाईट, अहितकारक हे समजणे, पत्नी मुलांवरील प्रेम या आणि अशा तऱ्हेचे कितीतरी बारकावे राजकुमार ज्या तऱ्हेने साकार करतो ते पाहून प्रेक्षक धन्य होतो. राजकुमारचे प्रेमी प्रेक्षक तर त्याच्या या भूमिवेडावून जातीलच, पण ज्यांना राजकुमारच्या गुणांची कल्पना नाही ते त्याचे भक्त बनतील अशी ही भूमिका आहे. कैलाशच्या तोंडचे संवाद ही एक खास उल्लेखनीय गोष्ट, राजकुमारच्या तोंडून बाहेर पडल्यामुळे त्यांचे मूळचे सौंदर्य शतपटीने वाढते. हेच दर्जेदार संवाद इतरांच्या तोंडी सपक वाटतात. नीरस ठरतात. हा राजकुमारचा मोठा विजय ! पद्मिनी ही समर्थ, गुणी अभिनेत्री, पण तिचे काम लक्षातही राहत नाही एवढा राजकुमारचा प्रभाव पडतो. पद्मिनीने आपले लक्ष्मीचे काम समजून, प्रामाणिकपणे केले. राजकुमारच्या पाठोपाठ डेव्हिडची वृद्धनोकराची भूमिका तशीच लक्षात राहणारी आहे. कुमुद छुगानी (गीता),विश्वजीत (शेखर) हे दोघे कलाकार फक्त दिसले छान, अभिनयाच्या बाबतीत आनंदच ! मास्टर रिपल हा बालकलाकार त्याच्या धीट बोलण्याने, अभिनयाने प्रेक्षकांना आकर्षित करून घेतो.

चित्र पाहायचेच असेल तर राजकुमारच्या कामासाठीच पाहा. एरव्ही त्यात काहीही नवे, चांगले, स्मरणीय नाही. दारूबंदीचा प्रचार करणारे चित्र म्हणून कदाचित राष्ट्रपतिपदकाचे मानकरी चित्र ठरेल, करमाफ चित्र ठरेल पण म्हणून ते फार उत्कृष्ट आहे, अविस्मरणीय आहे; पाहिलेच पाहिजे अशा योग्यतेचे आहे असे कुणी समजू नये.

**– सुधीर दामले**

...पृष्ठ ३ वरून

विजेते सर सी. व्ही. रामन ह्यांचे विचार सहजच आठवून जातात. ते म्हणतात, "ही अवकाशयाने, ह्या स्पर्धा परस्परांविरुद्ध हेरगिरी करण्यासाठी योजलेली राजकीय साधने आहेत. निव्वळ वैज्ञानिक प्रतिष्ठेपायी किंवा मानवी दृष्टिकोणातून हे घडत नाही!"

हे काही असले तरी आजच्या ह्या यशाचे अनन्यसाधारण महत्त्व वादातीत आहे. त्यातून सर्व स्पर्धा दूर सारून विज्ञान मानवाला काही तरी अमोल देणगी देऊन जाईल! 'अणुशक्ति'ने सर्व विनाशाचा शाप देतादेताच, अनेक वरही मानवाला दिले आहेत. अवकाशसंशोधनही, त्यातील राजकीय स्पर्धेतील वर्चस्वाचा भाग सोडूनही, मानवाला काही उपकारक वर देईलच! आज तरी अमेरिकेने ह्याबाबतीत निःसंशयपणे रशियावर वर्चस्व संपादले आहे. १९५७ मधल्या पहिल्या स्पुटनिकपासून तो अगदी अलीकडच्या झोंड ५ च्या विक्रमापर्यंतच्या संपूर्ण कालात रशिया आघाडीवर राहिला आहे. आज रशियात अंतर्गत कटकटी आहेत. साम्यवादी राजवटीची अंमलबजावणी, आर्थिक समस्या, साम्यवादी जगातल्या रशियाच्या नेतृत्वाला मिळालेला शह ह्यामुळे आज रशिया मागे पडला आहे. कुणी सांगावे ह्या साऱ्या कटकटींना दूर सारून तो पुन्हा अमेरिकेवर मात करीलही!

ह्या सर्व प्रकरणांत ज्यूल व्हर्न ह्या फ्रेंच कादंबरीकाराने १८६५ साली आपल्या "From the Earth to the Moon" ह्या पुस्तकात चंद्रसफरीचे जे वर्णन केले आहे ते वर्णन अ‍ॅपोलो ८ च्या सफरी वृत्तांताशी तंतोतंत मिळते जुळते आहे. उड्डाणाचे ठिकाण व्हर्नने केप केनेडीपासून १६० किलो मीटर अंतरावर असलेले दाखवले आहे. उतरण्याची जागा पॅसिफिक हीच होती. यानाचा वेग, यानाचा आकार, त्याचे वजन ह्यांचेही आकडे तंतोतंत मिळते जुळते आहेत. बोर्मन, लॉव्हेल व अ‍ॅन्डर्स ह्यांनी वर्णिलेला चंद्र व ज्यूल व्हर्नचे चंद्राबाबतचे वर्णन ह्यात तपशीलातही आश्चर्यकारक साम्य आहे! फार काय ज्यूल व्हर्नने आपल्या चंद्रसफरीसाठी डिसेंबर महिनाच व बरोबर तीनच प्रवासी कल्पिले होते! ज्यूल व्हर्नचे भविष्य अगदी अचूक ठरले आहे!

---

## राजाजी व साथीजी

---

चक्रवर्ती राजगोपालाचारी आणि साथी जयप्रकाश नारायण ह्या दोन्ही भारतीय स्वातंत्र्य लढ्याच्या काळातल्या मान्यवर व्यक्ती! ह्यांनी केलेल्या सूचनांना बरेच वजन प्राप्त होत असे. कारण ह्या ज्येष्ठ-श्रेष्ठ व्यक्ती! आजही ह्या वयोवृद्ध नेत्यांविषयी जनमानसांत आदराचे स्थान आहे. जयप्रकाश जरी प्रत्यक्ष राजकारणा-

पासून अलिप्त असले, तरी अजूनही ते राजाजींइतके थकलेले नाहीत. क्वचित् अजूनही काहीजण त्यांच्याकडे देशाच्या नेतृत्वाच्या दृष्टीने अपेक्षेने पाहतात. अलीकडे अलीकडे ह्या दोन्ही, एकेकाळी उदंड लोकप्रियता लाभलेल्या नेत्यांना भारत-पाक संबंध व कश्मीर प्रश्नाविषयी खूपच चिंता लागून राहिलेली आहेसे वाटते व त्याविषयी ते दोघेही मधून मधून अनेक सूचना करीत असतात. अलीकडे ह्या सूचनांचा त्या दोन्ही नेत्यांच्या अमोल कामगिरीबद्दल संपूर्ण आदर बाळगूनही, कोणी फारसा खोल विचार करीत नसत. मध्यंतरी १९६५ च्या भारत-पाक संघर्षानंतर ह्या सूचना तर खूपच कमी झाल्या होत्या व कश्मीर प्रश्न भारताच्या दृष्टीने तरी शिल्लक नाही हाच विचार बव्हंशी सर्व भारतीयांत दृढमूल झाला होता. पण शेख अब्दुल्लांच्या सुटकेनंतर पुन्हा परिस्थिती पालटली. अब्दुल्ला उडत उडत निघाले ते थेट मद्रासला राजाजींच्या घरी ! राजाजींनी घोषणा केली की, कश्मीरविषयक काही निश्चित तोडगा आपण लवकरच शोधून काढू आणि पुन्हा एकदा कश्मीर निरनिराळया वृत्तपत्रांमधील प्रथमपानी मथळयाचा विषय बनला. नोव्हेंबरच्या पहिल्या आठवडयात शेख अब्दुलांनी श्रीनगरात मेळावा भरवला. उद्घाटन करताना जयप्रकाशांनी, अत्यंत अनपेक्षितपणे अब्दुल्लांना ठणकावले, " कश्मीरविषयक कुठलीही चर्चा, तडतोड भारतीय संघराज्याच्या चौकटीतच व्हायला पाहिजे !" वाटले आता तरी सर्व भारतीयांचे ह्या प्रश्नावर एकमत झालेले दिसतेय. पण नाही ! गेल्याच आठवडयात आपल्या ' स्वराज्य 'मधून लिहिताना राजाजींनी कश्मीरविषयक एक अत्यंत आत्मघातकी तोडगा सुचवला. हेही मत कदाचित् दुर्लक्षिले गेले असते, परंतु त्यांनी केलेली सूचनाच अशी आहे की, ती दुर्लक्षिता येणारच नाही. राजाजींचे विचार ऐकताच कुठलाही तटस्थ निरीक्षक असेच म्हणेल की, ज्या अर्थी भारताच्या कश्मीरविषयक भूमिकेला देशातल्याच एका मान्यवर गटाचा निश्चित विरोध आहे, त्या अर्थी कश्मीर प्रश्न सोडवला गेलेला नाही व त्यामुळेच पाकिस्तानी भूमिका विचारात घेण्याजोगी आहे. पाकिस्तान व अन्य हितसंबंधीय ह्या राजाजींच्या विचारांचा फायदा तर उठवतीलच, पण ज्या काही मोजक्या राष्ट्रांनी भारताचा पाठपुरावा केला किंवा ज्यांनी तटस्थता बाळगली त्यांचा नक्कीच बुद्धिभेदही होऊ शकेल !

आपल्या ह्या चमत्कारिक उद्गारांत राजाजी म्हणतात की, दहा वर्षेपर्यंत इंग्लंड, अमेरिका व रशिया ह्या तीन बडया राष्ट्रांच्या संयुक्त अधिपत्याखाली कश्मीर राहावा; नंतर कश्मीरमध्ये सार्वमत घेण्यात येऊन ज्या बाजूने कौल लागेल त्या राष्ट्रात कश्मीर सामील केला जावा. १९४२ च्या आंदोलनात भाग घेऊ नका असे आवाहन ह्याच राजाजींनी केले होते. त्यानंतर राजाजींनी एवढी घातकी सूचना कधीही केली नसावी ! तीन बडयांच्या हातांत कश्मीरचे भवितव्य म्हणजे चोरांच्या हातांत जामदारखान्याच्या चाव्या देण्यासारखेच आहे. राजाजी म्हणतात,

" कश्मीर प्रश्न सोडवण्याचा हाच एक मार्ग आहे; व कश्मीर प्रश्न सुटला की, भारतीय उपखंडात शांतता नांदू लागून दोन्ही राष्ट्रांच्या विकास योजनांना गती मिळेल. " पण ह्याच वेळी राजाजी हे विसरतात, की हिंदू-मुसलमानांमधील झगडे कायमचे मिटावेत म्हणून, लीगच्या पाकिस्तानच्या मागणीला, फाळणीचा मार्ग माझ्या प्रेतावरूनच जाईल असे म्हणणाऱ्यांनीही मान्यता दिली; नंतर शांतता नांदावी म्हणून बेचाळीस कोटी रुपये पाकिस्तानला दिले; सिंधूच्या पाण्याचा प्रश्न मिटवला; आणि तरीही ही तेढ कायम आहे ! कच्छच्या रणात रक्त सांडले व नंतर आंतरराष्ट्रीय निवाडामंडळाच्या अनुसार काही भागाचे पाकला भूदान केले, तरीही झगडा कायम आहे; असे असताना संपूर्ण कश्मीर जरी पाकला मिळाला तरी भारताबरोबरचे त्याचे शत्रुत्व संपेलच असे राजाजी कशाच्या आधारावर म्हणू शकतात ? कश्मीर संपला तरी फराक्का आहे; फराक्काबाबतही अशीच तडजोड झाली तर उद्या प्रश्न येऊ शकेल राजस्थान-कच्छ वगैरे अनेक सरहद्दीं-वरील अनेक भूभागांचा ! राजाजी ह्या प्रत्येक वेळी काय सुचवणार ?–ह्या संभाव्य धोक्यांचा ते जोपर्यंत समाचार घेत नाहीत तोपर्यंत त्यांनी असली घातकी सूचना करू नये ! पाकिस्तानचे भारताबरोबरचे शत्रुत्व राजाजी–मार्गांनी संपवायचे असले तर एकच उपाय आहे नि तो म्हणजे कश्मीर ते कन्याकुमारी-पर्यंतचा सर्व भारतीय भूभाग पाकिस्तानात सामील करून घ्यायचा ! आणि ते नको असेल तर राजाजींसारख्यांच्या वक्तव्यावर सर्वांनी कडाडून हल्ला तरी चढवला पाहिजे किंवा त्यांना केराची टोपली तरी दाखवली पाहिजे ! पाकिस्तान्यांचे एक वाक्य लक्षात नेहमीच ठेवले पाहिजे–" हँसके लिया पाकिस्तान लड़के लेंगे हिंदुस्थान ! "

राजाजींप्रमाणेच श्री. जयप्रकाशांनी एक सूचना भारत सरकारला केलेली आहे. काही दिवसांपूर्वी पंतप्रधान श्री. इंदिरा गांधींनी 'युद्ध नको' कराराची पाकिस्तानला सूचना केली होती. ही सूचना अध्यक्ष आयुबखानांनी प्रथम साफच फेटाळून लावली होती. परंतु परवा 'युनो दिना'च्या दिवशी भाषण करताना त्यांनी एका अटीवर 'युद्ध नको' करार भारताशी करायला तयारी दर्शविली. ती अट म्हणजे हा करार होत असतानाच, दुसराही एक करार केला जावा व त्या अन्वये भारत–पाक दरम्यानचे प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने काही निश्चित तत्त्वे स्वीकारण्यात यावीत. ही सूचना अर्थातच श्रीमती गांधींनी फेटाळून लावली आणि हेच साथींना आवडलेले नाही. ते म्हणतात, ह्या वेळी प्रथमच प्रे. आयुबखानांनी कश्मीरविषयक कुठलीही अट 'युद्ध नको' कराराच्या स्वीकारासाठी घातलेली नाही, तेव्हा पाकिस्तानच्या मनातून अशा तऱ्हेचा करार राबवण्याचे असावे. भारताने आयुबखानांची सूचना तडकाफडकी फेटाळून लावण्यापेक्षा, तिचा नीट अभ्यास करायला हवा होता; पाकिस्तानच्या मनात खरोखर काय आहे ह्याचा शोध घ्यायला हवा होता

व ह्या करार करण्याच्या दृष्टीने प्रयत्नशील राहायला हवे होते. युद्ध नको करार ह्या उभय राष्ट्रांनी विनाअट प्रथम अंमलात आणावा म्हणजे पुढील प्रश्नांचा विचार करणे अधिक सोयीचे जाईल, ही भारताची भूमिका! अर्थातच दोन्ही भूमिका परस्परविरोधी आहेत. अटी लादून 'युद्ध नको' करार ह्या भूमिकेतच वास्तविक पाहता प्रामाणिकपणा नाही. शिवाय जयप्रकाश हेही विसरतात की, समजा काही तत्त्वे आखली गेलीच तर ती राबवली जातीलच ह्याचाही विश्वास नाही, कारण परंपरा तशी आहे. १९४८ च्या आक्रमणानंतर युनो आदेशानुसार दोन्ही राष्ट्रांनी कश्मीरमधून संपूर्ण फौजा काढून घ्यायल्या हव्या होत्या, पण पाकव्याप्त आझाद कश्मीरातून पाक फौजा कधीच काढून घेण्यात आल्या नाहीत. ताश्कंद कराराची काय वाट लागली आहे तेही सर्वज्ञातच आहे आणि म्हणूनच असे वाटते, भारताने आजवर खूप प्रामाणिक प्रयत्न केले आहेत, तेव्हा सार्थीनी आता आपल्या पाकिस्तानी मित्रांना सांगावे की 'युद्ध नको' कराराविषयीचा तुमचा प्रामाणिक हेतू, त्या कराराच्या विनाअट स्वीकारानेच शक्य होईल व मगच पुढचे सारे प्रश्न विचारात घेतले जातील!

---

## सेक्युलॅरिझम

---

आजकाल प्रत्येक व्याख्यात्याला सेक्युलॅरिझमविषयी बोलल्याशिवाय चैनच पडत नाही. त्याशिवाय त्याला त्याचे भाषण अपूर्ण वाटते! पण अद्याप एक गोंधळ बाकीच आहे. सेक्युलॅरिझम म्हणजे निधर्मीपणा की सर्वधर्मसहिष्णुता? धर्म नकोच म्हणणे वेगळे व सर्व धर्मांचे सहजीवन आणि त्यांना शासकीय पातळीवर समान वागणूक असे म्हणणे वेगळे. आमचे राज्य धर्मातीत आहे असे म्हणणे म्हणजे काय ह्याचाही धड उलगडा कुणालाच होत नाही. वास्तविक धर्म हा शब्द, धर्मसंस्था हे सारे मानवनिर्मित आहे. मानवाने दुसऱ्या मानवाशी वागताना काही संकेत पाळले पाहिजेत, त्याच्यावर काही नैतिक बंधने असली पाहिजेत ह्या कल्पनेतून धर्मसंस्था उभ्या राहिल्या. मूळ मानवता हा सर्व धर्मांचा समान पाया व त्यावर पुढल्या इमारती त्या त्या वेळच्या लोकांनी आपापल्या तर्कशक्तिनुसार, विचारांनुसार उभारल्या. त्यांत पुढ विशिष्ट प्रदेशांतल्या जनतेच्या रूढींची भर पडली व आजच्या धर्माचे स्वरूप उभे राहिले. बहुसंख्य धार्मिक आचार-विचार मानवाच्या आत्मिक कल्याणाच्या हेतूनेच मानवाने स्वतःवर लादून घेतलेले आहेत. तेव्हा ह्या धार्मिक आचारा-विचारांना फेकून द्या, असे सांगणे कितपत योग्य आहे? सर्वधर्मसहिष्णुता योग्य असली व भारतीय आचारा-विचारांत त्यांना नेहमीच मानाचे स्थान असले तरी, ही विचारसरणी जेव्हा एका विशिष्ट धर्मापुरतीच राबवली जाते

तेव्हा तशा अर्थाने सेक्युलॅरिझमच्या प्रचारकांच्या सद्‌हेतूबद्दल शंका यऊ लागते. म्हणूनच सेक्युलर फोरम जेव्हा रेडिओवरून होणाऱ्या भजनांबद्दल ओरड करते, तेव्हा त्यांना विचारावेसे वाटते की, बाबांनो भजने-कीर्तनामुळे सेक्युलॅरिझमला कसा काय धोका पोचणार ? बव्हंशी भजने कीर्तने हिंदू देवदेवतांना आळवत असली तरी त्यातून हिंदुधर्म श्रेष्ठत्वाची किंवा अन्य धर्मांविषयीच्या निंदेची आळवणूक नक्कीच होत नाही. मग त्यावर ह्यांचा रोष का ? त्यापेक्षा धर्मांतरावर हे लोक झोड का उठवत नाहीत ? संततिनियमनाला विरोध करणाऱ्या पोपचे जाहीर निषेध का करत नाहीत ? सेक्युलॅरिझमच्या घोषणा करणारे केंद्रीय मंत्रीगण युकॅरिस्टिक काँग्रेसच्या वेळच्या सर्वच मंत्र्यांच्या वर्तनाचा कोणता खुलासा करणार ? विशषत: नेपाळच्या राजांना संघाच्या समारंभाला हजर राहू नका असा उपदेश करताना किंवा विश्व हिंदू परिषदेच्या हेतूंबद्दल शंका घेताना त्यांना स्वत:च्या युकॅरिस्टिक काँग्रेसच्या वेळच्या वर्तनाचा मेळ, त्यांच्या सेक्युलॅरिझमच्या व्याख्येतून बसवता येतो का ? ह्या प्रश्नांकडे प्रा. शहांची फोरम वळली तर भजनांच्या मागे लागण्यापेक्षा ते अधिक योग्य होईल. निदान आता एका गोष्टीचा तरी त्यांनी विचार करावा. अनंतपूर येथे मागास जातींच्या परिषदेत बोलताना २९ डिसेंबरला केंद्रीय अन्नमंत्री श्री. जगजीवनराम म्हणाले की, हरिजनांच्या धर्मांतराला वेळीच आळा घातला गेला नाही तर स्वतंत्र ख्रिस्तिस्थानची मागणी लौकरच पुढे येईल. अर्थात सेक्युलर फोरमइतकेच केंद्रीय शासन, भारतीय समाज व हिंदू धर्माभिमान्यांनाही हे आव्हान आहे ! ○


संगीत शास्त्रावरील नवीन ग्रंथ

**गायनी कळा**

लेखक : हरि विनायक दात्ये प्रस्तावना : डॉ. रा. शं. वाळिंबे

पृष्ठे २४ + १८४ + ८ ( आर्टप्लेट्स् )

मूल्य बारा रुपये

( डाक व्यय : दीड रुपया )

प्राप्तिस्थान : हिन्दुस्थान साहित्य

३०९ शनिवार पेठ, पुणे २

MANOOS (Weekly) : 40 Paise : Regd No. M H-649

## "सारे जग श्वास रोखून बसेल"

असे बेगुमानपणे सांगणाऱ्या हिटलरच्या

झंझावाती पुरुषार्थाची कहाणी

# नाझी भस्मासुराचा उदयास्त

वि. ग. कानिटकर

मूल्य : पंचवीस रुपये फक्त

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी संगम प्रेस प्रा. लि., १७-बी, कोथरूड, पुणे ४, येथे छापून, ४१९. नारायण पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर.